म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भूगोल
सं. क्र ६६३

RFFBK-0024502

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

27 FEB 1985

6 MAR 1985

MAR 1985

20 MAR 1985

28 APR 1985

12 JUN 1985

27 APR 1986

21 MAY 1986

25 MAY 19

19 OCT 1986

7 FEB

( कृ. मा. पत्ता )

५०००-३-८४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
शाखा

संदर्भ भूप्रवास [युरोप]
६६३
24502
३०।१।८५

# असे रंग! असे ढंग!!

प्र. शं. गोखले

REFBK-0024502

इंद्रायणी साहित्य
पुणे

* मूल्य सतरा रुपये तीस पैसे

* प्रकाशक .
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३, शनवार पेठ, पुणे ३०

* मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

* प्रकाशन दिनांक
७ डिसेंबर १९८४

* © सौ मालती प्रभाकर गोखले
विजयश्री सोसायटी
विष्णूनगर, नौपाडा, ठाणा

---

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळालेले आहे

चि चेतना यास,

ज्याने मला हे पुस्तक
लिहावयास उद्युक्त केले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.
संदर्भ शाखा (स्थल प्रत)

## प्रकरण पहिले

# आल्प्सच्या पायथ्याशी

"तुम्ही अजून फॉरीनला एकदाही गेला नाहीत ?" या प्रश्नान मी नेहमी बेजार व्हायचो पण माझ्या नशिबी फॉरीन नाही आणि हातावर तशी रेषाही नाही हे ज्योतिषाकडून बरेच वेळा ऐकल्याने फॉरीनला जायला मिळणार नाही या विचाराची खत मला वाटेनाशी झाली होती तशात अलीकडे बायकोला कोणीतरी भविष्य सांगितले होते की नवरा फॉरीनला गेला तर त्याला अपघात संभवतो त्यामुळेच माझ्या हातावर फॉरीनची रेषा न उमटवण्याची कृपा देवाने केली असावी असं म्हणून मी देवाचे आभार मानायचो फॉरीनला जायच्या आधी करावयाचे सोपस्कार किती भयकर असतात याची रसभरीत वर्णनं ऐकल्याने ऑपरेशनच्या आधी वाटते तशी धास्ती मी फॉरीनची घेतली होती.

पण एक दिवस अचानक साहेबानी सागितल की तुम्हाला सहा महिन्यासाठी जर्मनीला जायचे आहे मी जरा घाबरलोच हातावरच्या रेषांची शोधाशोध सुरू झाली कुडलीतल्या ग्रहांना पुन्हा गणिताच्या चौकटीत मांडण्यात आल जे झाल ते चागल की वाईट ते तपासण्यात घरच्या मडळीची तारांबळ उडाली हातावरच्या रेषांना बोटातील निरनिराळ्या अगठ्यांचा आधार देण्यात आला कोणी सागितले, हिरव्या खड्याची अगठी घाला म्हणजे सुखरूप परत याल कोणी सुचवले, त्यापेक्षा साईबाबाचा फोटो असलेला ताईत बाधा एक ना दोन, नाना सूचना आल्या. जायच्या अगोदरच परत येण्याची काळजी वाटू लागली

हे फॉरीनला जाणे म्हणजे लग्नापेक्षाही गुतागुतीचे लग्नात फक्त वधू किंवा वरपक्षाचीच काळजी घ्यायची येथे काळजी सोडून बाकी काही घ्यायचच नाही

प्रथम जर्मनीला जायच म्हणजे भाषेची काळजी त्यासाठी आधी दोन महिने जर्मन क्लासला जायचं. एवढ करूनही पास होऊ की नाही याची काळजी गेली वीस-पंचवीस वर्षे दुसऱ्याची परीक्षा घेण्यात गेलेली आणि त्याचा केव्हा केव्हा नापास झाल्यावर होणारा रडवा चेहरा पाहताना, हसू आवरण्यात गेलेली आता पुन्हा परीक्षा या विचाराने माझा चेहरा काळवंडला.

साहेबांनी सांगितलेली कोणतीही गोष्ट 'यस् सर !' म्हणून करण्याची सवय लागलेला मी 'नाही' म्हणू शकत नव्हतो भेदरलेल्या काळजाने निरनिराळ्या फॉर्मवर सह्या केल्या तस पाहिल तर पासपोर्ट, व्हिसा वगैरे गोष्टी "आता कोठे सही करायची ?" एवढा प्रश्न विचारण्यापलीकडे जाऊन कधी मिळवल्या नाहीत पण पासपोर्ट, व्हिसा, फ्लाईट नबर वगैरे न पेलवणाऱ्या शब्दानी मला उगीचच धडकी भरायची लहानपणी मी मुंबईला जायचो तेव्हा ड्रायव्हेर बसमधल्या बसीत पुढच्या सीटवर एखादा काका किंवा मामा आम्हाला बसवायचा आणि मुंबईला अलगद उतरवून घेण्यासाठी एखादी काकू किंवा मामी यावयाची इतकंच प्रवासाच ज्ञान मिळवलेला मी एकदम आकाशातून प्रवास करायचा या कल्पनेन भेदरून गेलो होतो

एकदाचा क्लास सुरू झाला ऑपरेशनच्या आदल्या दिवशी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करताना वाटते त्या धास्तीने मी क्लासला जाऊ लागलो दुपारी कपनीच्या गाडीने क्लासला जाताना कसेसेच वाटायचे लहानपणी मराठीचा तास सुरू व्हायच्या आधी वर्गाबाहेर आम्ही आधळी कोशिबीर खेळायचो मास्तर येत आहेतसे वाटले की वर्गात पळावयाचो वर्गात मास्तरानी कविता पाठ आहे का म्हणून पडताळून पाहावयाचे ठरविल्यावर शिल्लक राहिलेली कडवी व आपल्यापुढील मुले यांचे गणित बरोबर जमवून तेवढेच कडवे आपला नबर येईपर्यंत पाठ करावयाचे आणि मग म्हणून दाखवावयाचे त्यातून गणित चुकले तर एक दोन छड्या खाऊन घरी रवानगी व्हायची शाळा सुटल्यावर खेळावयास मिळणार नाही म्हणून दुःख वाटायचे पण आता हे गाडीत बसून क्लासला जाण म्हणजे सूटबूट घालून श्रावणी करण्यासारख वाटायच दोन माहिने मोठ खडतर होते जर्मनच व्याकरण अजून त्या लोकांनी तसंच क्लिष्ट का ठेवलय या एका विचाराने बेजार होऊन व्याकरण सोडून सर्व शिकण्याची मनाची तयारी केली होती संस्कृतमधले व्याकरण कठीण म्हणून आम्ही धर्त मराठी माणसानी त्याचं प्राकृत केल नतर त्याच काळ वेळ ओळखून मऱ्हाठी केल नतर मराठी आणि आता शासकीय मराठी क्लासची कसरत करताना जीव मेटाकुटीस आला बायकोने घातलेल्या मगळागौरीच्या धुडगुसाखेरीज किंवा पोरानी लावलेल्या फिल्मी आरडाओरडीखेरीज इतर कारणासाठी रात्री अकरा-नतर जागल्याच आठवत नव्हत ते या क्लासमुळे जागाव लागल या क्लासमध्ये

माझ्यासारखे, मिशीत पांढरा केस डोकावत नाही ना याची काळजी करणारे एक-दोघेजण सोडले तर बाकी सर्व विशीच्या आसपासची मुलं होती जास्त खटकावयाचे ते जेव्हा त्यातली एखादी सुरेख मुलगी विचारायची, " अंकल, व्हॉट इज द मीनिंग ऑफ थिस वर्ड ?" मी रोज माझी बसावयाची जागा बदलत असे

आता फक्त आठ दिवस राहिले होते घरात पाहुण्यांची वर्दळ वाढली होती ' कसलं कार्य काढलं आहे ' अशी आजूबाजूची लोकं चौकशी करू लागली होती केळवणासदृश बोलावण्यांचा ताळेबंद आखताना बायकोची तारांबळ उडत होती सामानाच्या यादीला प्रत्येकाचा हातभार लागत होता मागे लग्नाच्या सामानाच्या यादीतील मीठ, एका अधिकारी माणसाच्या सागण्यावरून, पन्नास किलोऐवजी पाचशे किलो आणलं गेलं होतं आणि संसाराची आमची पुढची दहा वर्षं ते संपवण्यात खर्ची पडली होती तिखट, मीठ, साखर यांची जागा आता गळपट्टे, पायमोजे, हात-मोजे, यांनी घेतली होती मात्र विलायती थंडीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वतंत्रपणे उचलली होती आणि पुढे या सर्व वस्तूंच कसरीपासून रक्षण कसं करावं याची मला चिंता लागून राहिली होती फॉरीनला जड जाऊ नये म्हणून आमच्या आजीनं तर चक्क औषधाकरता आणलेली ब्रँडीची बाटली मला रिकामी करायला लावली सूचनांचा तर चौफेर हल्ला सुरू झाला होता

" प्रभाकरपंत ! असं करा, स्वेटरपेक्षा कबजा शिवा तो अंगाबरोबर बसतो " —एक पोक्त सूचना

(कदाचित विलायती थंडीचा कबजा घेण्याचं सामर्थ्य याच एका वस्त्र-प्रकारात असावं )

" अरे प्रभाकरा, अंटरपॅन्टला चोरखिसा शिवलास का ? प्रवासात कोण कसा असेल याचा काही नेम सांगता येत नाही "

—एका, तळकोकणातून आलेल्या आजोबांचा अनुभव

" काहो, दर आठवड्याला पत्र पाठवाल ना ? ' एक काळजी

" सूनबाई ! सोमवारी शंकरावर एकादशणी सांग हो ! म्हणजे सगळं व्यवस्थित पार पडेल " —एक अभय

' अरे तू एवढ्या लांब जातोसच तर पुढे अमेरिका-बिमेरिका करून ये "—एका चौथी इयत्तेला भूगोल शिकवणाऱ्या शिक्षकाचा सल्ला

" प्रभ्या, वेंधळेपणा करू नकोस रस्त्यानं नीट जपून चालत जा तिथं वाहनं फार भरधाव नेतात "— एक इशारा

" प्रभ्या, साल्या, बरोबर एक चांगला दोर घेऊन जा ह्या खतरूड बॅगा कधी दगा देतील सांगता येत नाही "— एक अपशकून

" ह्या लेकाचा कसला परत येतोय राहील तिथं एखाद्या मडमेबरोबर झालं "

एक टवाळी.

"फुकट मिळते म्हणून वाटेल तशी ढोसू नकोस. आपल्या देशाची लाज राख "—एक देशभक्त

"ह्या राडेच्यांना अकला आहेत का म्हणे फॉरीनला जातायंत जरा कोटाची बटण नीट लावायला शिका"— एक अकलेचा मक्तेदार

"काही विशेष नाही, आम्ही सुद्धा गेलो असतो. स्वतःच्या पैशानी नाही ना जात"— एक मनाची समजूत

माझ्या कानांवर सूचना आणि शेरे (बरेच वेळा ताशेरे) पडत होते आणि बॅगेत निरनिराळ्या वस्तू कोंबल्या जात होत्या डोक्यावरच्या तेलापासून ते एरंडेलच्या बाटलीपर्यंत सर्व वस्तूनी या बॅगेत जागा मिळविली होती. मला त्याची काही फिकीर नव्हती मी फक्त नवरदेवाप्रमाणे हातातली माळ आणि धोतराचा कासोटा सावरत होतो काळजी करण्यासारख माझ्याजवळ फक्त प्लेनच तिकीट आणि पासपोर्ट एवढच होत ते मात्र मी इतक जपत असे की विमानात पाय ठेवायच्या आधीच ते जुन, घामटलेल दिसू लागल होत.

दोन एप्रिल १९७९ ! तो सोनियाचा दिवस उजाडला सकाळपासून धावपळ सुरू झाली पण वेळच इतका भरपूर होता की निघायच्या आधी तब्बल दोन तास तयार होऊन येरझारा करण्यापलीकडे काही शिल्लक नव्हते. लोकल गाडीचा प्रवास सोडला तर बाकी सर्वच प्रवासाच्या वेळी एक दोन तास वेळेच्या आधी हजर राहण्याची खोड आम्हाला लागलेली होती. बरेच वेळा वाटे, आपले घडयाळ बरोबर नसले तर किंवा गाडी अगोदरच सुटून गेली तर पचाईत नको बहुतेक वेळा नेमक उलटं व्हायच "ठीक समयपर आनेवाली" गाडी बहुतेक लेट यायची आणि शेवटी स्टेशनवर येरझारा घालण्याची पाळी यायची त्या दृष्टीने बॉम्बे एअरपोर्टवर बरीच सोय आहे. तेथे येरझारा घालणाऱ्या आम्हा मंडळींकरता त्यांनी जागाच शिल्लक ठेवली नाही त्यामुळे आम्ही वेळेवर निघून वेळेवर पोचलो. बऱ्याच वर्षांनी लग्नात ग्रुप फोटो काढताना करावयाच्या कसरतीची फेरउजळणी झाली हारतुरे झाले विमान सुटायला आता थोडाच अवकाश होता.

"जावईबापू, विमानातून बाहेर पडेपर्यंत अंगाऱ्याची पुडी कोटाच्या खिशातच ठेवा हो !"

"अरे प्रभाकर, बॅग नीट लावलेली नाही आण बघू इकडे"

"काका, तुम्ही लवकर येणार ना ?"

"प्रभ्या, येताना माझ्यासाठी कॅलक्युलेटर आणावयास विसरू नकोस"

"बिचाऱ्याचे आज आईवडील जिवंत असते तर, किती आनंद झाला असता त्यांना."

" अरे नीघ आता विमान सुटेल "

" जरा थांब रामरक्षा म्हटलीस का पाच वेळा "

एवढया हलकल्लोळात हुदक्याचा आवाज माझ्याखेरीज कोणालाच ऐकू आला नाही तो हिरमुसलेला चेहरा, ते मुसमुसणार रडू पदराआड गेल होत कढत हाताचा स्पर्श मला जाळून काढत होता

मोठ्या कष्टान मी बॅग उचलली आणि विमानतळाच्या सरक्षण कक्षेत शिरलो डोळ्यांपुढे क्षणभर अंधेरी आली

विमान ठीक २ वाजता सुटले आणि दिल्लीमार्गे फ्रँकफुर्टच्या दिशेने मार्गस्थ झाले विमान ३०,००० फूट उचीवरून जात आहे असे सागण्यात आल्यावर आपण एव्हरेस्टवरूनही जात असल्याचा सुखद आनद झाला म्हणून जरा बाहेर डोकावून पाहिले तर खाली कापसाची गठडी अस्ताव्यस्त फेकलेली पाहिली आणि लाबवर निळी पोकळी पसरलेली दिसली तेव्हा वाटले की आपण राहतो त्या पृथ्वीचे निरनिराळे पैलूच अधिक मोहक असताल एवढ्या वेळात मातृभूमी सोडताना होणाऱ्या यातना, आप्तस्वकीयांविषयीची ओढ वगैरे भावनांची कदर करण्याचे राहूनच गेले

दुसऱ्या दिवशी सकाळी ठीक ९-४० वाजता आमचे विमान फ्रँकफुर्ट विमानतळावर उतरले विमानाला अत्यत आधुनिक अशा न्यूमॅटिक शिड्या लावण्यात आल्या आणि ' सरकत्या ' वाटेने (Walkways) व ' चालत्या ' जिन्याने (Escalator) बाहेर पडलो हा विमानतळ इतका भव्य व आधुनिक आहे की आपण एखाद्या मायानगरीतच असल्यासारखे वाटावे विमानाच्या सुटण्याच्या व येण्याच्या वेळा दाखवणारे इलेक्ट्रॉनिक्स बोर्डस्, जागोजाग टेलिव्हिजन सेटस् आणि त्यात निरनिराळ्या सूचना सभोवती कॅमेरे, टेपरेकार्डर्स वगैरे वस्तूची सुदर दुकाने वगैरे पाहताना डोळे चक्रावून जातात २०–२५ वर्षांपूर्वी मी जेव्हा मुबईत प्रथम आलो होत त्यावेळी मला असेच आश्चर्य वाटले होते आम्हाला लगेच म्युनिकला जाणारे दुसरे विमान पकडावयाचे असल्याने तेथे जास्त वेळ बघण्यात घालवता येण्यासारखा नव्हता शेवटी निघताना आम्ही सर्वांत वरच्या मजल्यावर असलेल्या रेस्टारटमध्ये कॉफी घेतली तेथून विमानांचा टेकऑफ सुरेख दिसत होता अक्षरश विमाने एका मागोमाग एक अशी टेकऑफ घेण्यासाठी सज्ज होऊन येत होती व दर दोन ते तीन मिनिटांनी एक एक विमान टेकऑफ घेत होते परदेशात पाय ठेवल्यावर पहिल्या काही क्षणामध्येच ' प्रगती ' म्हणजे काय याची सुस्पष्ट कल्पना मला येत होती आतापर्यंत मी नुसतेच ' आपल्याला प्रगती करावयाची आहे, राष्ट्राला पुढे न्यायचे आहे ' वगैरे पुढाऱ्यांच्या तोंडून ऐकले होते किंवा रेल्वे व बसच्या खोक्यांवर लिहिलेले वाचले होते

दुपारी दोनच्या सुमारास आम्ही म्युनिकला पोचलो गेस्टहाऊसवर जाण्यासाठी टॅक्सी केली प्रथमच मर्सीडीजमध्ये बसण्याचा योग येत होता जर्मनीत सर्व टॅक्सीज् मर्सीडीज आहेत टॅक्सीमध्ये हीटिंग/कूलिंगची व्यवस्था रेडिओ । टेपरेकॉर्डरसारख्या आधुनिक सोई आहेत आम्ही सामान टॅक्सीमध्ये ठेवण्याचा विचार करू लागलो तोच आश्चर्याचा दुसरा धक्का बसला आमचे सामान टॅक्सीमध्ये ठेवणारा ड्रायव्हर हा 'तो' नसून 'ती' होता पेहराव किंवा रुबाब पाहिला तर तो मुंबईतल्या टॅक्सीड्रायव्हरलाही खूप मागे टाकणारा

म्युनिकला एक दिवस राहून आम्हाला तेथून १०० कि मी अंतरावरच्या प्रीन या गावी जावयाचे होते दुसऱ्या दिवशी दुपारी ४ च्या ट्रेनने प्रीनला जाण्यासाठी म्युनिक रेल्वेस्टेशनवर आलो आतापर्यंत व्ही टी स्टेशन किती भव्य आहे या भावनेने मी ते पाहत असे पण येथे आल्यावर भव्यतेच्या कल्पना साफ बदलून गेल्या या स्टेशनला ४० प्लॅटफॉर्म असून कुठेही गडबड, आरडाओरड पाहिली नाही ट्रेन ठीक चारला सुरू होऊन एका तासात प्रीनला पोचली ट्रेनचा सेकंड क्लास आपल्याकडल्या फर्स्टलाही लाजवील असा होता प्रीनला एका प्रायव्हेट स्कूलमध्ये मला ६ आठवड्यांसाठी 'खरे जर्मन' शिकायचे होते हे स्कूल म्हणजे एका अतिउत्साही बाईने चालवलेले जर्मन क्लासेसच म्हटले तरी चालतील मी तेथे गेल्यावर माझे बीअरच्या पेल्याने स्वागत झाले लगेच तिने मी जेथे ६ आठवड्यासाठी राहणार होतो त्या शूफिगर बाईकडे मला पोचवले व दुसऱ्या दिवशीपासून सकाळी ठीक आठ वाजता क्लासला यायचे सांगून तिने निरोप घेतला

माझी राहण्याची व्यवस्था शूफिगर बाईच्या दुमजली घरामध्ये वरच्या मजल्यावरील एका खोलीत करण्यात आली घर अतिशय सुरेख, पुढे बाग असलेले म्हणजे साधारण आपण हिंदी चित्रपटात पाहतो तसे होते गॅरेजच्या बाहेर फोर्ड आणि फोक्सवॅगन अशा दोन लक्झरी कारस् होत्या नवरा-बायको व एक आठ वर्षांचा मुलगा असे छोटेसेच कुटुंब मुलगा मोठा गोड होता रोजचे १५ मार्क (८० रु ) भाडे ठरले आणि मी माझ्या खोलीवर येऊन पडलो आतापर्यंत प्रवास इतका लांबलचक झाला होता आणि विशेषत जर्मनीत पाऊल ठेवल्यावर इथली स्वच्छता, श्रीमती, टापटीप पाहून मी इतका भारावून गेलो होतो की त्यात मला केव्हा झोप लागली ते कळलेच नाही

साधारण रात्री नऊच्या सुमारास पोटात कावळे कोकलावयास लागल्याने जाग आली आणि म्हणून बाहेर हॉटेलमध्ये जाऊन थोडेफार खाऊन घ्यावयाचे ठरवून बाहेर पडलो दहा वाजता परत आलो घरी आल्यावर मला पुढचे दारच उघडता येईना माझ्याजवळ किल्ल्या होत्या पण येथील 'डबल लॉक सिस्टीम' मला नवीन होती मी खूप प्रयत्न केला बेलसुद्धा दाबून पाहिली पण आतून कोणी

प्रतिसाद देईना घरची मडळी बहुतेक बाहेर गेली असावी. बाहेर कडाक्याची थडी होती अशा अवस्थेत मला घाम फुटला रात्र असल्यामुळे व रस्ते माहीत नसल्या-मुळे कोणाकडे जावे हा प्रश्न होता तशातच कोणाकडे गेलो तर सांगणार काय ? कारण प्रश्नाचा सदर्भ लक्षात घेऊन यस्, नो (या, नाईन) असे उत्तर देऊन वेळ मारून नेण्याइतपतच जर्मनची इडियात प्रगती झाली होती शेवटी मनाचा हिय्या करून त्याच ओळीत असलेल्या शेजारील एक, दोन बगल्याच्या दारावरची बेल वाजवली तरी कोणी प्रतिसाद देईना मी घाबरलो माझ्यात पुन्हा ती चावी घेऊन दार उघडण्याइतपतही शक्ती राहिली नव्हती मी आणखी एका बगल्याच्या फाटकापाशी उभा राहिलो मी फाटकाला नुसता स्पर्श करताच त्या फाटकामधून आवाज आला 'आपल्याला काय पाहिजे ?' मी दचकलो काही भुताटकीचा प्रकार तर नव्हे ना असे क्षणभर वाटले पण भुते इडियातून जर्मनीत येण्याची शक्यता कमी असल्यामुळे मी हिय्या करून Help ! Help ! असे ओरडलो तोच दरवाजा उघडला गेला मी आवारात शिरून बंगल्याच्या मुख्य दरवाजात पोहोचेपर्यंत एक वयस्कर बाई बाहेर आली तिने मला आत बोलावले माझे नाव विचारले मला कसलासा ज्यूस प्यावयास दिला माझा बावळट चेहरा पाहून तिला कदाचित दया आली असावी मग मी हातवारे करून व एक दोन इग्रजीवजा जर्मन शब्दाच्या सहाय्याने माझी अडचण सांगितली. तिने लगेच क्षणाचाही विलब न लावता शूफिगरबाईला फोन करून पाहिला पण प्रतिसाद मिळाला नाही मग ती स्वत माझ्याबरोबर आली व मला तिने दरवाजा उघडून दिला माझ्याकडून दोनतीन वेळा प्रात्यक्षिक करून घेतले व वर सांगितले की, तुला केव्हाही कसलीही अडचण पडली तरी तू माझ्याकडे सकोच न बाळगता ये ! रात्री अकरा वाजता आलेला तो अनुभव माझे जर्मन लोकांविषयी मत बनवण्यास पुरेसा होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी ठीक आठ वाजता मी क्लासमध्ये गेलो आमच्या घरापासून क्लास दहा मिनिटांवर होता जाण्यासाठी रस्ता थोडा लाबचा होता पण जवळची अशी सुरेख पाऊलवाट होती या पाऊलवाटेने जाताना मला महाबळेश्वर, माथेरानची आठवण होई क्लासमध्ये आम्ही फक्त २२ विद्यार्थी होतो ते जवळ-जवळ पधरा निरनिराळ्या देशांतून आले होते पहिल्याच दिवशी चाचणी परीक्षा घेतली गेली व त्याप्रमाणे चारपाच मुलांची एक अशा पाच तुकड्या पाडण्यात आल्या म्हणजे एका क्लासमध्ये एका वेळी फक्त चार-पाच मुलेच माझ्या जोडीला कोलबिया, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना व साऊथ आफ्रिका येथला एक एक विद्यार्थी होता रोज सकाळी बराचसा वेळ ग्रामर शिकण्यात जाई दुपारी निरनिराळ्या विषयांवर सभाषण चालावयाचे सभाषणात हिंदू सस्कृतीपासून ते थेट अतराळक्षेप यापर्यंत कोणताही विषय यायचा अजूनही बऱ्याच लोकांच्या भारताविषयीच्या

कल्पना खुळचा असल्याचे पाहून मला नवल वाटावयाचे तुमच्या देशात बरीच लोक झाडावर राहतात ना ? किंवा तुम्ही जादूटोण्याने पाण्यावर किंवा विस्तवावर सुद्धा चालू शकता ना ? किंवा मुंबईत जागोजागी साधू लोक ध्यानस्थ बसलेले असतात ना ? असे विचित्र प्रश्न विचारून हैराण करीत असत पण एवढे असून-सुद्धा जेव्हा आम्ही भुताखेताच्या गोष्टी करावयाचो तेव्हा प्रत्येकजण आपल्या देशातला अनुभव सागावयाचा व साहेबाच्या मानगुटीवरही भूत बसते हे ऐकून मला बरे वाटायचे

मूळ इटालियन असलेल्या व साऊथ आफ्रिकेमध्ये स्थायिक झालेल्या सेनाटोरे या विद्यार्थ्याशी माझी खूपच मैत्री झाली त्याच्याबरोबर त्याची बायकोही जर्मन शिकत होती कारण त्याना दोन वर्षे तेथे रहावयाचे होते क्लासमध्ये बायकोची उडालेली तारांबळ पाहून बिचारा खजिल होत असे पुन्हा हसण्याची पण चोरी नवराबायकोने एकाचवेळी कोणतीही गोष्ट शिकू नये, मग ड्रायव्हिंग असो, स्वीमिंग असो की हिंदी असो कारण मास्तरनी विद्यार्थ्याला शिकवण्याऐवजी बायकोने नवऱ्याला शिकवावे की नवऱ्याने बायकोला शिकवावे हे ठरवण्यातच सर्व श्रम खर्च पडतात

दुपारी बारा ते दोन जेवणाची सुट्टी असे मग आम्ही जवळील चार-सहा रेस्टॉरंटमध्ये आलटून पालटून जावयाचो प्रथम प्रथम मेनू वाचून काहीच बोध होत नसल्याने रोज निरनिराळ्या डिश घेऊन पहायच्या पण ते नुसते मासाचे गोळे किंवा उकडलेल्या बटाट्याचे लगदे खाताना कटाळा यायचा आणि मग बायकोची आठवण यायची बायकोने विश्रांती घेण्याचे निमित्त पुढे करून केलेला पिठल-भात-सुद्धा यापेक्षा किती रुचकर असू शकतो याची आठवण व्हायची आठ-दहा दिवसानी आम्ही एका हॉटेल मालकाशी दोस्ती केली आतापर्यंत तो मालक आहे याची आम्हाला कल्पना नव्हती आम्ही तो किचनमधला कुक आहे असेच समजावयाचो. कारण बाहेर सर्व्ह करायला बायका असत व काऊटरवरही बाई असे आपल्या-कडे काऊंटरची जागा ही सदैव हॉटेल मालकाने अडवली असल्याने आम्ही त्याच दृष्टीने त्या बाईकडे पहात असू मालकऐवजी कुकबरोबर किचनमध्ये जाण्यापर्यंत आम्ही मजल मारली व तेथील उपलब्ध असलेल्या सर्व घटकांची तपासणी करून तेथे आलेल्या काही पुणेकर मित्राच्या मदतीने गॅम्युझे राईस (Gemuse Rice) नावाची नवी डिश तयार करवून घेतली पुढे पुढे आम्ही हॉटेलमध्ये शिरतो तोच 'गेम्युझे राईस'ने आमचे स्वागत व्हायचे

जर्मनीमध्ये किंवा युरोपमध्ये खूप छोटी छोटी हॉटेले असतात त्याना जर्म-नीत 'लोकल' असे म्हणतात ही हॉटेले साधारणपणे एक फॅमिली चालवते त्यामुळे सर्व्हिसमधील तत्परता, गिऱ्हाईकाशी बोलण्याची पद्धत यात खूप फरक

आढळतो अलीकडील काळात मुंबईसारख्या ठिकाणी झालेली उडपी हॉटेलांची गर्दी पाहून आपल्या हॉटेलविषयीच्या कल्पना साफ बदलून गेल्या आहेत त्यामुळे येथे भांडयाच्या आदळआपटीचा आवाज, पिण्याच्या पाण्यात बोटे बुचकळून पुढे केलेला पेला, एकावेळी चार टेबलांवरच्या बहिरटासारख्या घेतलेल्या ऑर्डरी आणि चटणीत साबार किंवा चहात कॉफी घडल्याची तमा न बाळगता मारुतवेगाने पुढे केलेल्या डिशेस आणि कधी एकदा खाऊन बाहेर पडता हे आतुरतेने वाट पाहत मागे उभी असलेली नवीन गिऱ्हाईके हे काहीच न आढळल्याने यांना हॉटेल म्हणावे की चक्क सासरेबुवांनी जावईबापूना घातलेले अधिकमासाचे जेवण हेच कळत नसे. इतका आग्रह ! इतकी प्रत्येकाची स्वतंत्र विचारपूस ! ! जेवायला बसताना 'या बसा की' अशा थाटात सांगितलेलं 'मॉर्गेन', किंवा जेवताना 'बरा जमलाय का थाट ? या शब्दात सामावलेलं 'स्मेक्ट गुट' आणि जेवण झाल्यावर 'या पुन्हा असेच' अशा अर्थी म्हटलेलं 'विडरझेहन' वगैरे ऐकून जेवण करते होते ते आम्ही विसरूनच जायचो

तस पाहिलं तर ग्रीन हे छोटेखानी सात हजार वस्तीचे गाव सभोवती बर्फाच्छादित पांढरी शुभ्र आल्पस् पर्वताची शिखर त्याच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणार चर्चच उंच शिखर छोटेसे स्टेशन, छोटीशी बाजारपेठ आणि छोटी छोटी घर ! घरासमोर सुरेख बाग, बगीचा, एका बाजूला आपल्याला लक्झरी कार-सारखी वाटणारी गाडी, सुरेख रस्ते, रस्त्याला दुतर्फा फूटपाथ, जागोजागी ट्रॅफिक सिग्नल्स आणि सिग्नल नसला तर रस्ता क्रॉस करताना थांबणारी माणस रस्त्यातून जाताना येणारा जाणारा माणूस आपल्याला 'ग्रुस गॉट' (गॉड इज ग्रेट) असे म्हणणार आणि पुढे जाणार मी मनात म्हणायचो की 'यू आर ग्रेट' आणि नुसतेच हसून पुढे जायचो

आता एक आठवडा होऊन गेला होता. तेथील जीवनाच्या मी अधिक जवळ आलो होतो. शूफिंगरबाई माझ्याशी निरनिराळ्या विषयावर चर्चा करावयाची तेथे महिला मंडळे आहेत का ? बायकांना दागिन्यांची आवड किती, नातेवाईकांचे संबंध कितपत जवळचे, वगैरे ढोबळ प्रश्न विचारण्याचे धाडस मी करू लागलो होतो महिला मंडळ नसली तरी बायका शिळोप्याच्या गप्पा मारावयास कधी कधी एकत्र जमतात हे मला समजले होते नातेवाईकांचा घुडगुस नसला तरी एखाद-दिवशी एखादी काकी, एखाददिवशी एखादी मामी येऊन गेल्याचे मी ऐकले होते अंगावर दागिने घालून सौंदर्य वाढवण्यापेक्षा दुसऱ्याशी अदबीने बोलून छाप पाडण्याचे कसब यांनी अंगी बाणले आहे हे दिसत होत.

पण गेल्या आठ-दहा दिवसात या बाईचा नवरा कोण आहे हे जाणून घेण्यास मी उत्सुक होतो भारतातून निघताना 'अभक्ष्य भक्षण करू नकोस, महारवाडा-

ळाच्या संगती राहू नकोस असा पोक्त सल्ला आमच्या नात सागण कठीण असलेल्या पण उपदेश करण एवढच काम राहिलेल्या कुठल्याशा पचाहत्तरी गाठलेल्या आजीने मला दिला होता त्यामुळे आपण कोणाकडे राहतो एवढं तरी माहीत असाव अस मला वाटत होत शेवटी एक रविवार गाठून मी शूफिगरबाईच्या हॉलमध्ये T V पाहण्याचे निमित्त काढून शिरलो तेथे आपल्या नवऱ्याशी तिने ओळख करून दिली चागला सहा फूट उचीचा पण तेवढाच अदबीने बोलणारा, आपल्याकडील रूबाबदार समजल्या जाणाऱ्या नटांनाही मागे टाकील असे व्यक्तिमत्व असलेला तो माणूस मी पाहिला आणि मनात अदाज बांधू लागलो मनाशीच त्याच्यावर मी एखाद्या डायरेक्टरचा पोषाख चढवून पाहिला तो अधिक 'इप्रेसिव्ह' वाटला त्याला आधुनिक हीरोचा पोषाख चढवून पाहिला तेव्हा तो अधिक देखणा वाटला शेवटी मी हिय्या करून विचारले की, 'आपला व्यवसाय काय ?' तेव्हा काहीही आढेवेढे न घेता त्याने सुतार असल्याचे सांगितले मला कसेसेच वाटले सुतार म्हटला की कानावर पेन्सिल, कमरेला खोचलेली फुटपट्टी आणि कधीही न जुळणारी माप घेताना त्याची चाललेली धडपड, ह्या गोष्टी माझ्या डोळ्यासमोर आल्या. नतर मी त्याला प्रत्यक्ष काम करतानाच पाहिले त्याच्या घराच्या शेजारी छोट गॅरेज होत त्याच त्यानं कार्पेंटरी शॉप केलं होत सर्व आधुनिक उपकरणाने सज्ज असलेल्या शॉपमध्ये तो घराच्या बांधकामाला लागणाऱ्या सामानाची तयारी करत असे आणि घरे उभारून देत असे तेथे घरं बरीचसी लाकडाची केवळ पाया किंवा भिंतीचा काही भाग हा विटा दगडाचा या माणसाकडे मदतनीस म्हणून कोणीही नव्हत. पण मदतनीसाच्या जागी त्याने आधुनिक साधन उपयोगात आणली होती

काही दिवसानी माझ्या शेजारची खोली अशीच भाड्याने देण्यासाठी त्याने सजवली होती तेव्हा सकाळी आठपासून ते रात्री आठपर्यंत मिटल्या तोंडाने केलेले काम मी पाहिले होते ही माणसे काम करताना इतकी एकाग्र असतात की त्यांना काही प्रश्न विचारण्याचे मनात येऊनही धीर होत नाही तीच गोष्ट घरातील बाईची चाळीशीला आलेली पण पंचविशीच्या ताठ्याने घरातील, बागेतील काम करणारी सकाळी लवकर उठून वाटेतील बर्फ पडलेल काढाव आपल्या समोरील रस्त्याचा भाग झाडावा, घराच्या काचा स्वच्छ असल्या तरी पुसून काढाव्यात, गालीचे मशीनने साफ करावेत ही स्वयपाकाव्यतिरिक्तची कामे मला आश्चर्य वाटायचे ते ती माझी खोली साफ करावयाची तेव्हा पोर्चमध्ये असलेल्या फोर्ड गाडी मध्ये रुबाबदारपणे बसणारी ही बाई जेव्हा झाडूवजा यत्राने माझी खोली साफ करावयाची, गादी सारखी करून ठेवायची व वर कपडे आहेत का धुण्यासाठी ? असे विचारायची तेव्हा मला कळमळायला लागायच 'जरा गाद्या आवरून ठेवा ' या सकाळी म्हटलेल्या ओवीला साद देणारा मी किंवा तेवढ दळण घेऊन येता

का ? या सध्याकाळच्या नागरक्षेच रक्षण करणारा मी अशा प्रश्नाने सर्दच व्हायचो

बोलण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अहभाव नाही, कपाळावर कोठलीही आठी नाही, अस तिच वागण पाहून 'लाखात अशी देखणी नव्हे शहाणी' अशी मनाची समजूत करून मी डोक्याला अधिक त्रास देण्याचे सोडून देत असे आता बराचसा गाव पालथा घालून झाला होता गावातील छोटया दुकानांचे मालक ओळखीचे झाले होते एखाद दिवशी छत्री, एखाद दिवशी कॅसेट अशा खरेद्या चालू होत्या त्याच्या बोलण्याच्या, वागण्याच्या पद्धतीतील साम्य लक्षात येत होत. आपल्याकडील पुढाऱ्यान आश्वासन देण्याच्या थाटातच बोलल पाहिजे का ? टॅक्सी-वाल्याने उर्मटपणेच वागल पाहिजे का ? किंवा गाडी चालवणाऱ्या माणसाने रस्ता हा फक्त गाडीवाल्याचाच आहे अशा थाटात पुढ गेल पाहिजे का याच शिक्षण येथील लोकाना मिळालेल दिसत नव्हत'

हळूहळू मी नाण टाकून स्टॅंपस् मिळणाऱ्या मशीनशी खेळावयास लागलो होतो हॉटेलात घेतलेल्या कॉफीपेक्षा नाण टाकून पेल्यात पडलेली कॉफी मला अधिक गोड लागायची पण सर्वांत आकर्षून घेतल ते तेथल्या फोनन येथील पब्लिक टेलीफोनवरून देखील युरोपमधल्या कोणत्याही देशात फोन करता येतो आणि तो सुद्धा नाण टाकून ! मी लंडनला माझ्या एका नातेवाईकाना फोन करून पाहिला आणि सर्दच झालो प्रथम रिसीव्हर उचलायचा की 'आता पैसे टाका अशी पाटी झळकते मग मी एक एक मार्कची दोन नाणी टाकली ती नाणी फोनमध्ये कशी व कुठून एका मागोमाग एक अशी सरकत जात आहेत हे मला चक्क बाहेरून दिसत होते मग मी मला हवे असलेल्या नंबरचे आकडे दाबले फिरवले नाहीत कॅलक्यु-लेटर किंवा टाइपरायटरवर जशी बटणे असतात तशी फोनच्या डेस्कला येथे बटणे होती नंबरचा एक एक आकडा दाबताना जर मधेच एंगेजटोन आला तर रिसीव्हर खाली ठेवायचा की आपले पैसे परत येतात अरे, येथील फोनसुद्धा किती प्रामाणिक नाहीतर कितीही बदडला तरी दाद न देणारा आपल्याकडील पब्लिक टेलीफोन !

मी नबर फिरवला, नव्हे, दाबला रिंग वाजावयास लागली मला आनद झाला तिकडून प्रतिसाद मिळाला मग केव्हा आलात, कुठे राहता, जर्मनीत कस वाटतंय वगैरे गोष्टी बोलता बोलता वेळेचे भानच राहिले नाही आणि आवाज-सुद्धा किती स्पष्ट असे वाटावे की आपण पलीकडच्या बिल्डिंगमधील माणसाशीच बोलत आहोत इतक्यात माझ्या मित्राने मला खुणावले की पैसे संपत आले आहेत कारण फोनवर आपण किती पैशाचे बोललो ते बोलत असतानाच कळते त्यासाठी एक इंडिकेटर असतो आपण बोलावयास सुरुवात केली की किती पैशाचे बोलायचे शिल्लक राहिले ते त्या इंडीकेटरवर कळते म्हणजे थोडया वेळाने दोन मार्कचे

एक पन्नास, मग एक चाळीस, एक तीस वगैरे आणि जेव्हा दहा फेनिग उरतात तेव्हा पुन्हा 'पैसे टाका' असा इंडिकेटर येतो. मी लगेच आणखी एक मार्क टाकला व आणखी एक मार्कचे बोलून घेतले

आता परीक्षेला एक आठवडा राहिला होता आता थोडाफार अभ्यास करायला हवा होता गेले काही आठवडे बर्फ पडत असल्याने बाहेर पडायचाही कंटाळा यायचा ते कोट, टोपी, हातमोजे, पायमोजे, गुडघ्यापर्यंतचे बूट एवढे पाच-दहा किलो वजन अंगाव' घेऊन बर्फ तुडवीत जाण्याचं कौतुक राहिलं नव्हतं वर्गात 'गोखले कसं जर्मन लिहितो बघा !' असं इतर विद्यार्थ्यांना सांगणाऱ्या बाईंचा परीक्षेनंतरही समज कायम राहावा असा प्रयत्न करणं आवश्यक होतं शेवटी एकदाची परीक्षा झाली दुसऱ्या दिवशी सर्टिफिकेट व सेंडऑफ मिळाला आणि सर्वांचा प्रेमाचा निरोप घेऊन मी न्युरेनबर्गमार्गे बडनॉयस्टॅड या, आमचा कारखाना असलेल्या दुसऱ्या एका छोट्या गावी जाण्यासाठी निघालो

८

प्रकरण दुसरे

# हसरे गुलाब

१८ मे १९७९ ग्रीन सोडून आता मी बडनॉयस्टॅडला आलो होतो न्युरेन-बर्गपासून दोनशे किलोमीटरवर असलेले हे ग्रीनसारखेच १०,००० वस्तीचे छोटे-खानी गाव होते माझी राहण्याची व्यवस्था एका स्टुर्म नावाच्या आमच्याच कारखान्यात काम करणाऱ्या गृहस्थाकडे करण्यात आली होती त्याला आठ ते बारा वर्षांतल्या तीन मुली होत्या नवरा बायको, आजी व तीन मुली असा त्याचा परिवार राहायची व्यवस्था ग्रीनसारखीच म्हणजे स्वतन्त्र खोली, सडासबाथरूम, किचन, फ्रीज, कुकिंगरेंज, टेलीव्हीजन वगैरे वगैरे स्टुर्म हा माणूससुद्धा ६ फूट उंचीचा, देखणा व फुटबॉल शौकीन त्यामुळे टीव्हीवर फुटबॉलची मॅच असली की ती सक्तीने पहावी लागायची तो तेथील फुटबॉल टीमचा कोच असल्याने मधून मधून मॅच पहावयास जावे लागायचे त्याला फुटबॉलचे इतके वेड होते की राज-कीय, सामाजिक, आर्थिक घडामोडी म्हणजे त्याला केवळ फुटबॉल वाटायच्या एखादी मॅच हरलो तर तो राजकीय पराभव झाल्यासारखा मनाला लावून घ्यायचा टीममध्ये काही फेरफार केले तर त्याला सामाजिक क्रांती झाल्यासारखे वाटायचे एखाद्या मॅचची तिकीटे खूप खपली तर देशाला आर्थिक स्थैर्य आल्याचे तो बोलून दाखवायचा

याच्या अंगाखांद्यावर त्याची पोरं खेळत असल्याचं पाहून मला बरं वाटायचं. आतापर्यंत युरोपिअन माणूस म्हणजे तोंड बंद करून, हाताच्या मुठी वळून पोरांना शिस्तीचे धडे देणारा असा माझा उगाचच समज झाला होता तो साफ चुकीचा ठरला म्हणून मला बरे वाटले होते. मुलांशी सध्याकाळी रस्त्यावर फुटबॉल खेळ-

ताना मलाही तो सामावून घेत असे रात्री जेवण झाल्यावर वाईन घेताना रमीचे एक दोन डाव पडत असत मग म्हातारी आजी आता झोपा' म्हणून मुलांना सांगायची तेव्हा मुले आजींनी झोपवावं म्हणून आग्रह करून तिला आपल्या खोलीत बोलावून नेत असत हे सगळं बाळबोध वळण पाहून आपण वाड्यावरच्या मावशी-कडे किंवा खालच्या पाडावरच्या आत्याकडे तर आलो नाही ना, असे मला क्षणभर वाटायचे एखाद्या रविवारी मला दुपारी जेवणाचा आग्रह व्हायचा जेवा-यला बसण्याच्या आधी 'वदनी कवळ घेता सारखे श्लोक म्हटले जायचे देवाचे स्मरण करून जेवायला सुरवात व्हायची जेवताना आग्रह व्हायचा इतक्या सुखसोई असूनही यांना अजून देवाचा विसर पडला नाही याचे मला आश्चर्य वाटायचे

माझे ऑफिसमधील काम सुरू होऊन आता एक आठवडा झाला होता या ऑफिसमध्ये चारपाचशे स्टाफ असेल माझी बसण्याची व्यवस्था दुसऱ्या मजल्यावर असलेल्या प्लॅनिंग डिपार्टमेंटमध्ये केली होती मला स्वतंत्र टेबल होते या मजल्या-वर जवळजवळ एकशेवीस स्टाफ होता पण एकही केबिन नव्हते— साहेबालासुद्धा फक्त दर चारपाच माणसांच्या ग्रुपला एक कमरेएवढे उंच पार्टीशन मधूनमधून सुरेख झाडांच्या वेली किंवा ताटवे ठेवले होते ऑफिसमध्ये आरडाओरडा, गोंधळ अजिबात नव्हता बोलण्याची पद्धतसुद्धा अगदी हळू व अदबीने. पलीकडच्या टेबलावरही ऐकू जाणार नाही येथे देशोदेशीचे लोक इनफर्मेशनसाठी वरचेवर येत असल्याने सर्वांना इनफर्मेशन प्रोग्रॅम आखून दिला होता त्याप्रमाणे तो व्हायचा स्टाफमधील एखाद्या माणसाला अचानक काम निघाले तर तो अपराध्यासारखा परवानगी मागून बदल करून घ्यायचा पण असं क्वचितच घडायचं माणूस माहिती देताना आपल्या टेबलापुरतेच बोलायचा पलीकडच्या टेबलावरचा माणूस किती कामचुकार आहे आणि त्यामुळे मला किती त्रास होतो वगैरे पुराण तो सांगत नसे माझी बसण्याची जागा अशी होती की रोज जवळजवळ शंभर लोकांना सकाळी मॉर्गेन करावयाचे व सध्याकाळी 'विडरझेन' किंवा चुस (म्हणजे गुडनाईट या अर्थी) आणि संबंध दिवस कुठेही किंवा केव्हाही म्हणजे टॉयलेटमध्ये भेटल्या-वरसुद्धा 'मालझाईट म्हणावयाचे या मालझाइटची मला मोठी गंमत वाटा-यची मालझाइट म्हणजे जेवायची वेळ पण येथे कोठेही आणि केव्हाही ती येते टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेला सँडविच खाताना दिसणारा जर्मन पाहि ला की या मालझाईटचा अर्थ कळावयाचा ऑफिसमध्ये आज बॉसनी कशी फजिती झाली किंवा घरातून लवकर निघूनही मी उशिरा कसा पोचलो किंवा गावसकरची कशी सुरेख सेंचुरी झाली वगैरे गोष्टींवर चर्चा व्हायची पण ती स्वतःच्या टेबलावर चार टाळकी गोळा करून नसे त्यासाठी स्वतःसाठी स्वतःच बनवलेल्या कॉफीच्या वेळी किंवा रांगेत उभे राहून मिळवलेल्या जेवणाची थाळी खाताना मला आश्चर्य वाटा-

यचे ते सर्वांत मोठ्या साहेबापासून ते थेट खालच्या कामगारापर्यंत जेवणाची जागा, मेनू, नियम सारखेच पण खाण्याच्या बाबतीत जर्मन माणूस तेवढा चोखंदळ नसावा मेनूमध्ये इतका ढोबळपणा असे की एक मटन डिश (म्हणजे मटणाचा गोळा) एक पोटॅटो डिश (म्हणजे उकडलेल्या बटाट्यांचा गोळा) आणि एक सालाट डिश (म्हणजे पालापाचोळा) हा पाला खाताना मोठं कर्मकठीण तो घशात कोंबायचा म्हणजे गाई-म्हशींच्या शिताफीने खावा लागायचा पुन्हा रवथ करण्याची कला अवगत नसल्याने इतर जर्मन माणस जेवण संपवून केक फस्त करीपर्यन्त माझे सालाडसुद्धा खाऊन होत नसे

मला मात्र कधी कधी आमटीत कांदा, कांद्यात भजी, भज्यात वांग, वांग्यात भरीत, भरतात मिरची, मिरचीत ठेचा हे काहीच नसल्याच पाहून दुःख होई असे वाटे की आत्ताच्या आता आपल्याकडील काही आचारी इकडे एक्सपोर्ट करावेत व भारतात आम्ही लोकसंख्येबरोबर वाढलेल्या जिभाना तृप्त ठेवण्यासाठी किती कष्ट घेतो ते दाखवून द्यावे

घोषणा, झेंडे यांचा अभाव असल्याने कारखाना चटकन ओळखता येत नसे चोपन सालपासून त्याना संप माहीत नव्हता रोज कामावर यावे, आपले उत्पादन इंडेक्सबरहुकूम आहे ना याची खात्री करावी आणि बिअर पिता पिता कामावर नेअरिंग ध्याव इतकच त्याना माहीत माझ्या मते जर्मन माणूस बराचसा आत्म-केन्द्रित असावा त्यामुळे माझे काम कसे चोख आहे किंवा माझी उत्पादनक्षमता किती अधिक आहे याच्यावर त्याचे सर्व लक्ष केंद्रित होत असावे आपल्याकडे बहु-ताशी हे उलट होते आपण दुसऱ्याच्या अडचणींची उठाठेव अधिक करतो मालक धद्यातील पैशाचा योग्य वापर कसा करीत नाही हे आपल्याकडील मजूर सांगत असतो तर मजूर किती कामचुकार आहे हे सिद्ध करण्यासाठी मालक धडपडत असतो प्रत्येकाने आपले काम चोख आहे का असा प्रश्न स्वतःला विचारला व त्या-प्रमाणे सुधारणा केली तर मला वाटते, बहुतेक सर्व प्रश्न आपोआप सुटतील हे नेमके त्यांनी ओळखले आहे त्यामुळे खाजगी उद्योगातला कामगार किंवा सार्व-जनिक उद्योगातला कर्मचारी हे दोन्ही तेवढ्याच तत्परतेने किंवा प्रामाणिकपणे काम करताना दिसतात

मला विशेष आश्चर्य वाटले ते पोस्टात किंवा रेल्वेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना काम करताना पाहून पोस्टातला माणूससुद्धा रुबाबदार असू शकतो, तो सुद्धा सुटबूटात कामावर जाऊ शकतो हे मला येथे पहावयास मिळाले. कार्ड पाकीट देणं किंवा मनीऑर्डरी स्वीकारणं हेसुद्धा बँकेत पैसे भरण्या-इतक महत्त्वाच असत अशा जाणिवेने पोस्टातले लोक काम करताना पाहिले की मला त्याच कौतुक वाटायच पोस्टसुद्धा बँकेइतकच नीटनेटक आणि स्वच्छ होतं

रेल्वेची ' खिडकी ' बँकेच्या काऊंटरशी बरोबरी करत होती. अमूक अमूक ठिकाणी जायला किती वाजता गाडी आहे, असे खिडकीशी विचारले तर ट्रेन नंबर, सुटण्याची वेळ, फलाट नंबर वगैरे सर्व एका कागदावर लिहून सुद्धा मिळायचे. बँकेत नवीन खाते उघडताना आपल्याकडे गिऱ्हाईकाची जी काळजी घेतली जाते ती येथे रेल्वे प्रवास करताना घेतली जात होती. अर्थात हे सर्व शक्य होतं ते प्रवाशांच्या गर्दीचा अभाव असल्यामुळे. आपल्याकडील बऱ्याचशा प्रश्नाचं मूळ या गर्दीत असाव.

आता हळूहळू थंडी कमी होऊन उन्हाळ्याला सुरवात होत होती. तपमान १५ टक्के झाल होत. येथील लोकाना नागपूरचा उन्हाळा झाल्यासारख वाटत होत. अति उत्साही तरुण नुसत्या शॉर्टस घालून गाडीतून भरधाव जाताना दिसत होते. तशातच घरासमोरील बागा गुलाबाच्या फुलानी हसताना दिसत होत्या. सगळ वातावरण धुंद झाल होत. आता जर्मन फेस्टचा सीझन आला होता. आपल्याकडे मे महिन्यात जसा सार्वजनिक सत्यनारायणांना ऊत येतो तसा येथे बीअर फेस्टना ऊत आला होता. या रविवारी 'स्ट्रासनफेस्ट' तर पुढच्या रविवारी 'फुटबॉल फेस्ट' तर त्याच्या पुढच्या 'किंडरफेस्ट' अशी काहीतरी नावे देऊन मनसोक्त बिअर प्यायची आणि बँडच्या तालावर गाणी गायची. आपल्याकडे लहान मुलींचा भोंडल्याचा उत्साह तोच येथे म्हाताऱ्या माणसांपर्यंत सर्वांना फेस्टचा उत्साह. मग त्यासाठी आबालवृद्ध रस्त्यावर बाके टाकून सुद्धा ती साजरी करणार. सार्वजनिक सत्यनारायणांना जशी नावे वेगळी– आज काय पानवाल्यांचा सत्यनारायण, उद्या काय टांगेवाल्यांचा सत्यनारायण, परवा काय एस. टी. वाल्यांचा सत्यनारायण पण साचा एकच. मग एखादा 'पांडू हवालदार'सारखा सिनेमा किंवा फार तर 'मेलडी मेकर्स' चा ऑर्केस्ट्रा–तसं या फेस्टच. रस्त्यावर किंवा एखाद्या ग्राउंडवर बाके टाकावयाची, एका पिंपात बिअर ठेवायची आणि बँडच्या तालावर गाणी म्हणत ती चिनीमातीच्या मगने मनसोक्त प्यावयाची. मग कधी त्याला 'किंडर फेस्ट' म्हणजे 'मुलांची फीस्ट' म्हणावे तर कधी 'स्ट्रासन फेस्ट' म्हणजे 'रस्त्यावरची फीस्ट' म्हणावे. सर्वांत कळस व्हायचा तो आपल्यासारखी जत्रा भरावयाची तेव्हा. ही जत्रा आठ-दहा दिवस चालायची. मग त्यात जोरजोराने फिरणारे, फिरताना वरखाली वाकडेतिकडे होणारे पाळणे असायचे. मुलासाठी नाणे टाकून एकमेकांना टकरा देत चालणाऱ्या मोटारी असायच्या. राक्षसाचे सांगाडे असणारी आणि अकाळविकाळ आवाज करणारी एखादी भयशाळा असायची. असे नानाप्रकारे असत. आधुनिक यन्त्रज्ञानाने बनवलेली मायानगरीच ती. आणि हे सर्व खेळ करून झाले की शेवटी मोठ्या मांडवात जायचे आणि आपल्याकडे जशी सगळ्या कार्यक्रमाची सांगता जेवणावळीत होते तशी येथे पुन्हा मनसोक्त बिअर प्यायची. माणूस स्वतःचा मोठेपणा, लहानपणा, शूरपणा, भ्याडपणा वगैरे सर्व येथे पणाला लावून जेव्हा मनसोक्त बिअर

पितो तेव्हा तो पावन झाल्यासारखा वाटतो मग तो नाचतो काय, गातो काय, हसतो काय, खिदळतो काय सर्व पाहण्यासारखे असते जेव्हा एखादाच माणूस रस्त्याने झिंगत जाताना दिसतो तेव्हा त्याला आपण दारूड्या म्हणतो. जेव्हा एखादाच माणूस एकटाच हातवारे करून मोठमोठ्याने गाणी म्हणत जातो, तेव्हा त्याला आपण वेडा म्हणतो पण येथे सर्वजण वेड्यासारखे वागतात तेव्हा त्याला फेस्ट म्हणतात. हे सर्व रात्रभर चालते पुरुष आणि स्त्रिया सारख्याच उत्साहाने सर्व कार्यक्रमात भाग घेतात पण येवढे असूनही आपल्याकडची 'वाकडी नजर' येथे सहसा पहावयास मिळत नाही सर्व कसं मोकळ पण मर्यादा घातलेल

आज आम्हाला सुटी होती कसलासा ख्रिश्चन सण होता आपल्याकडे गुढी उभारतात तसे सर्वांनी आपआपल्या घरासमोर झेंडे उभे केले होते त्यासाठी आठ दिवस मेहनत करून सुदर रंगवलेला खांब प्रत्येकाने तयार केला होता त्या खांबाच्या बुध्याशी गौर माडावी तशी चित्रांची, फुलाची सजावट केली होती गावात सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसत होते आज मला आग्रह करून स्टुर्मने त्याच्याबरोबर सकाळी ९ वाजता चर्चमध्ये नेले होते आम्ही सर्वच स्टुर्म कुटुंबीय बरोबर गेलो होतो चर्चमध्ये गेल्यावर सर्वांप्रमाणे मी पण बाकावर बसलो प्रत्येकाच्या हातात पोथीसारखे काहीतरी होते त्यात बहुधा त्याचे श्लोक असावेत त्याच्याखाली नोटेशन्स पण होती मग दहाबारा वर्षांची लहान मुले हातात मेणबत्त्या, फुले वगैरे घेऊन ओळीने हळूहळू चालत आली त्याच्या मागून पाद्री आला मुलांनी पाढऱ्या कापडाचे पायघोळ झगे घातले होते त्यावेळी ऑर्गनवर मद म्युझिक वाजत होते सर्व जण उभे राहिले. मी पण उभा राहिलो .मग मुलानी सगीताच्या तालावर काही श्लोक म्हटले मग सर्वांनी मिळून श्लोक म्हटले व नतर सर्वजण खाली बसले. पाद्रयाने येशू ख्रिस्ताच्या काही गोष्टी सांगितल्या व मधेच पुन्हा एखादा श्लोक म्हटला सर्व माणसेपण पुस्तकात बघून श्लोक म्हणायची पाद्रयाने श्लोक म्हटल्यावर कीर्तनात आपण 'हारीविठ्ठल' म्हणतो तसे सर्व लोकांनी म्हटले

मला याच्या आणि आपल्या प्रथेमध्ये विलक्षण साम्य असल्यासारखे उगाचच वाटले मग बारा वर्षांच्या एका मुलाने पुस्तकातली एक गोष्ट वाचली व श्लोक म्हटला ते कीर्तनात साथीदाराने म्हटलेल्या गाण्यासारखे वाटले पूर्वरंग सपल्याप्रमाणे मध्यंतरी आरती व प्रसादाचा कार्यक्रम झाला आरती गोळा करण्यासाठी तबक फिरवतात तशी एक लहानशी टोपली एकाकडून दुसऱ्याकडे जात होती, व त्यांत दहा फेनिगपासून ते एक मार्कपर्यंत पैसे टाकले जात होते मी पण एक मार्क टाकला आरती गोळा केल्यावर एका प्रतिष्ठित माणसाने प्रसाद आणला व तो पाद्रयाच्या हातात दिला तो बत्तासासारखा होता मग प्रत्येकाने भाविकपणे रांगेत

उभे राहून तो पाद्र्याकडून घेऊन खाल्ला.

पूर्वरंगानंतरचा कार्यक्रम जरा कठीण होता पाच ते दहा मिनिटे गुडघे टेकून उभे रहावयाचे सर्व म्हातारी-कोतारी माणसेसुद्धा चुळबुळ न करता गुडघ्या-वर उभी होती मला सवय नसल्याने चुळबुळ केल्याशिवाय उभं राहणं अशक्य होत होत. हे झाल्यावर पुन्हा काही गोष्टी झाल्या संगीत, श्लोक झाले, हरीविठ्ठल झालं व चर्चमधला कार्यक्रम संपला मग आपल्याकडे पालखी काढतात तशी खूप मोठी मिरवणूक निघाली होती. पुढे बॅन्ड वाजत होता नंतर हातात मोठाले झेंडे घेऊन काही मंडळी चालत होती त्या पाठोपाठ पाद्र्यासारखे झगे घातलेल्या लहान मुलांचा ताडा होता त्याच्यामागे काही पांढरे स्वच्छ कपडे घातलेल्या लहान मुली चालत होत्या त्यांनी डोक्यात फुलांचे गजरे घातले होते सर्व मोठी माणसे सुटात होती मधे पालखीसारखे काहीतरी होते व तेथे पाद्री हातात एक सजवलेला क्रॉस घेऊन चालला होता सर्वच दृष्य रमणीय होते फुलांनी बहरलेल्या बागांच्यामधून जाणाऱ्या रस्त्यावरून चाललेली ती मिरवणूक मला गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीची आठवण करून देत होती

आम्ही एका रविवारी 'ग्लास हाऊस फार्मिंग' पहावयास गेलो होतो सभो-वार प्रचंड शेती, शेतांच्या पलीकडे शिस्तीत उभी असलेली जंगल आणि मधेच डोकावणारं काचेच्या छपराचं ग्लास हाऊस मला त्याच कुतुहल होत सहा महिने बर्फ पडत असल्यानं अशावेळी उघड्यावर शेती, भाजीपाला करता येत नाही म्हणून ग्लास हाऊस फार्मिंगचा खटाटोप. आम्ही शेतावर गेलो ते शेत स्टुमंच्या नातेवाई-काचं होत एका साध्या शेतकऱ्याने त्याच्या आवारात सुरेख शेती केली होती ती एक दोन एकराची वाडी असेल, पण तो हिवाळ्यात जवळजवळ सर्व गावाला पुरेल एवढी भाजी पिकवत होता शिवाय फुलझाडेही होती त्यासाठी त्याने पोल्ट्रीच्या शेडस असतात तशा मोठ्या पाच सहा शेडस् बांधल्या होत्या वरचे छप्पर काचेचे होते. त्याला आपोआप उघडमीट होणाऱ्या झडपा होत्या बाहेर थंडी पडावयास लागली की या झडपा बंद होऊन आतील हीटर चालू व्हायचे व बाहेरचे तपमान वाढले तर त्या आपोआप उघडून आतील हीटर बंद व्हायचे व आतील हवा हीटर-शिवाय गरम रहायची बरीचशी भाजी व फुलझाडे, मातीच्या पसरट कुंड्यामधे लावली होती फॅक्टरीमध्ये 'हवेतील जागा' (Air Space) वापरण्यासाठी जसे ऊंच रॅक्स असलेले स्टोअर असते तसे शेल्फ तयार करून या शेडमधील जास्तीत जास्त जागा शेतीसाठी वापरली होती 'शेतीला भरपूर सूर्यप्रकाश, पाऊस, सुपीक माती फार आवश्यक असते' वगैरे लहानपणी पाठ केलेले नियम धाब्यावर बसवून यांची शेती समजावून घ्यावी लागत होती ही सगळी शेती तो साठ वर्षांचा म्हातारा गृहस्थ दोन पधरा वर्षांच्या अप्रेंटिस मुलाच्या मदतीने करत होता मला वाटते,

त्याच्याकडे असलेला मनुष्यबळाचा अभाव हेच त्याचे बळ वाढविण्यास कारणीभूत झाले आहे

लांबवर पसरलेल्या साध्या शेतावरसुद्धा नवराबायको, एकदोन मुले आणि पेरणीपासून ते कापणीपर्यंत काम करणारा ट्रॅक्टर याशिवाय कोणी दिसत नाही पुन्हा शेतानी कुठे सपायच, जंगलांनी कुठे वाढायचं हे ठरवून दिलेल आपल्या जगला कडे पाहून आपण एखाद्याला जेव्हा ' जगली ' म्हणतो तेव्हा त्याचा बेतालपणा पटवून देण्यासाठी दुसऱ्या शब्दाची मदत घ्यावी लागत नाही पण येथली जगलसुद्धा इतकी शिस्तीत उभी असतात की आपण एखाद्या सुपारीच्या बागेत गेल्यासारखे वाटावे थडीमुळे आखूड आणि टोकदार पानांची झाडे जास्त तशात त्यांची वाढ सरळ व उच होण्यासाठी एका यत्राच्या साहृयाने खालच्या भागाच्या वीस-पचवीस फूट उचीपर्यंतच्या फांद्या कापून काढतात. झाड जुने झाले की साठीच्या पुढच्या माणसाना वृद्धाश्रमात पाठवावे तशी या झाडाची जगलातून उचलबागडी करतात पण काही वेळा मला वाटायचे की जगलांनी तरी थोडस ' जगली ' असाव सगळीकडे सगळ सुरळीत पाहून काहीवेळा कटाळा यायचा

मनमुराद भटकण्यासाठी ठेवलेल्या जगलांत बाणानी दिशा दाखवलेल्या पाऊलवाटा, पाऊलवाटेवरून जाताना पायांना माती लागू नये म्हणून त्यावर घातलेल्या लाकडाच्या फळ्या, मुद्दाम राखून ठेवलेली कुत्र्याची मुतारी हे सगळ पाहून जगलात भटकण्याचा मला अभिप्रेत असलेला आनद कधीच मिळत नसे. जगलातून जाताना पायात काटा जाण किंवा वाट चुकण, कधी कधी कुत्रा मागे लागल्यान जीव मुठीत धरून पळत असताना पॅन्ट झुडपात अडकून फाटण, पिण्यायोग्य पाणी न मिळाल्यानं तहानेन घसा कोरडा पडण वगैरे काहीच अनुभव न आल्याने आपण ' जगलांत भटकून आलो ' अस धाडस केल्याच वाटत नसे

मला कुत्र्यावरून आठवण झाली येथील कुत्रीसुद्धा माणसाळलेली जगलात हिंस्र श्वापद तर नाहीच, पण जगलचा राजा म्हणवून घेण्याचा चान्स कुत्र्याना मिळण्याची शक्यता असतानासुद्धा कुत्री ऐषारामात वाढल्याने स्वत्व गमावून बसलेली आपल्याला कुत्रा म्हटलं की अखड भुकणारा, कारण नसताना अगावर येणारा, सदानकदा हिडीस करून घेणारा, बरेच वेळा ' ××त ' शेपूट घालून पळणारा वगैरे नजरेसमोर येतो, पण येथील कुत्र्याना ' कुतरडा ' म्हणवून घेण्याचे सुद्धा भाग्य नाही. मन मानेल तेथे प्रातर्विधी किंवा तत्सम विधी करण्याचे स्वातत्र्य नाही मालकाच्या पुढे किंवा मागे पळत जाण्याचे सोडून मालकाच्या बरोबरीने मोटारीत बसून काचेच्या आडून जग बघावयाचे रस्त्यावर कोणाची पर्वा न करता प्रेम ' करण्याचे भाग्य त्याच्या नशिबी नाही, मानेला कायम साखळदड स्वातत्र्याकरता सर्वस्वाची कुर्बानी करणाऱ्या देशात कुत्र्याच पारतत्र्य पाहून मला दुःख व्हायच स्वातत्र्यपूर्व काळात

' साहेब ' जसा आपल्या देशात ' शिपायाला ' वागवत असे तसं येथील कुत्र्याचं जिणं त्याने नेहमी मालकाबरोबर असावयाचे फारतर ' सलाम साहेब ' केल्या-सारखे गुरगुरावयाचे मोठ्याने ओरडण्याची चोरी रात्री तीनलासुद्धा सभा भरवून मोठ्याने ओरडून सर्व प्रश्न सोडवण्याची आपल्याकडे असलेली मुभा याना नाही

कुत्र्याने कोचावर येऊन बसाव, मर्सीडीजसारख्या आलीशान मोटारीत हिंडाव, केसाळ कुत्र्यानी आधुनिक तरुणींसारखी केशभूषा करावी आणि साहेबा-भोवती लाळ घोटाळत फिराव, हा पोषाखीपणा आमच्या कुत्र्यांत तरी नाही याचं मला समाधान वाटायच शिवाय येथील कुत्र्यांना आपल्या संस्कृतीची कदर नाही आंतरजातीय विवाहाचे याना वावडे नाही कोणी ऑस्ट्रेलिअन तर कोणी आफ्रिकन, कोणी कॅनेडिअन तर कोणी मलेशिअन, कोणाचा बाप रशियन तर आई इंग्लिश कमीत कमी कम्युनिस्ट देशातल्या कुत्र्यांनी डेमॉक्रेटिक देशातल्या कुत्र्यांशी मैत्रीचे संबंध ठेवू नयेत, असे मला उगाचच वाटायचे

माझा बडनॉयस्टॅडचा मुक्काम आता संपत आला होता। मी आता बराचसा जर्मन झालो होतो कुत्र्याविषयी वाटणारी किळस आता कमी झाली होती भर रस्त्यावरून जाताना एखाद्या युवकाने त्याच्या प्रेयसीचे घेतलेले चुंबन मी कबुतरानी केलेल्या प्रेमाच्या चाळ्याइतकंच निर्विकारपणे पाहू शकत होतो रस्त्याने उंच टाचांचे बूट घालून भरभर चालणाऱ्या जर्मन तरुणी पडणार नाहीत ना अशी प्रथम वाटणारी भीती आता नाहीशी झाली होती स्टुर्मच्या बायकोने ओढलेल्या सिगा-रेटच्या वासाने माझं डोक आता उठत नसे टीव्हीसमोर तासनतास बसण्याची मला सवय झाली होती जेवताना, ' हे नको ', ' ते आवडत नाही ', ' यात मीठ कमी आहे ', त्यात मसाला जास्त पडलाय ' वगैरे खोड्या काढण्याची माझी सवय नाहीशी झाली होती फुटबॉलचा चेंडू मला क्रिकेटच्या चेंडूसारखा प्रिय वाटू लागला होता ऑफिसमध्ये गेल्यावर सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ' स्वत:चे काम ' हे साहेबाने न सांगताच मला कळू लागले होते नवीन कपडा मुद्दाम खराब करून बनवलेल्या जीनच्या पॅंटस आणि स्वस्त मिळतात म्हणून घेतलेले आयते ढगळ शर्ट घालून बाहेर पडताना ' लोक काय म्हणतील ' याची काळजी करण्याचे मी सोडून दिले होते मी आता पार बदलून गेलो होतो

प्रकरण तिसरे

# वुंडेरबान

मी बडनॉयस्टॅडला असताना एकदा डोर्स्टन या गावी गेलो होतो तेथे माझ्या बायकोचा चुलत भाऊ आज वीस-पचवीस वर्षं राहत होता डोर्स्टन हे गाव एसेन या मोठ्या शहराच्या जवळ आहे 'मी येत्या रविवारी येतो' असे त्याला फोनवर कळवले होते डोर्स्टनला जाण्यासाठी अगोदर बसने श्वाईनफुर्ट या गावी जावयाचे व मग तेथून ट्रेन पकडायची बसस्टॅड गावापासून तसा लाब होता माझ्याजवळ सामान बरेच होते 'सकाळी साडेसहा वाजता तुला गाडीने स्टॅडवर सोडतो' असे स्टुर्मने मला आग्रहाने बजावले होते मी सकाळी उठलो व सव्वासहापर्यंत तयार झालो

माझ्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे मला चैन पडेना समजा 'साडेसहा वाजता स्टुर्म बसस्टॅडवर सोडावयास आला नाही तर' या नेहमीच्या शकेने मला ग्रासले शेवटी असह्य होऊन मी सव्वासहा वाजता एकटाच पायी निघालो बसस्टॅडवर जाईपर्यंत पावणेसात वाजले. बस सात वाजताची होती मी आतापर्यंत बराचसा प्रवास एस् टी बसने केला असल्यामुळे, एस् टी स्टॅडसारख येथे काहीच न दिसल्याने जरा बावचळलो 'खारे शेंगदाणे! उसाचा ताजा रस!' वगैरे आरोळ्या ऐकू येत नव्हत्या कोणती एसटी कोणत्या फलाटावर येईल हे कधीही न समजणाऱ्या भाषेत कोणीच ओरडून सांगत नव्हते गोंटू वळकटी वगैरे एसटी प्रवासासाठी जन्माला आलेले सामान कुठेच दिसत नव्हत 'अरे ए वश्या, म्हातारीला नीट पोचीव ! ' 'इचा भयना, रिझर्व्ह शीटात कुठ घुसतोस !' अस कुठेच ऐकू येत नव्हत पावन खिंडीत बाजीप्रभूने अडवलेल्या गनिमासारखी प्रवाशांची गत

करणारा कंडक्टर प्राणी कुठेच दिसत नव्हता नुसता सिमेंट-विटांनी उभा केलेला, काचेच्या तावदानांनी सजवलेला, रंगरंगोटी केलेला निर्जीव स्टँड सातला दोन मिनिट होती तरी अजून बस आली नाही म्हणून मी जरा खुशीत होतो वेळेवर न येण्याच एका बशीनं तरी ठरवाव अस मला मनोमन वाटत होत इतक्यात बरोबर सात वाजता बस आली माझा विरस झाला कोणतीही गाडी किंवा बस आल्यावर ती थांबेपर्यंत तिच्याबरोबर धावत जाणार कोणीच न दिसल्यानं येथील लोकांना या बसविषयी काहीच जिव्हाळा वाटत नाही अस मला वाटल आई सध्याकाळी ऑफिसमधून दमून आल्यावर मुलांनी ती दरवाजात दिसताच धावत जाऊन मिठी मारावी, अस प्रेम करणारा मी सोडून एकही प्रवासी येथे हजर नव्हता, याचं मला वाईट वाटल माझ्या मनात असूनही मला माझ मन आवराव लागल

बसमध्ये चार-पाच प्रवासी होते बाहेरील बटण दाबल्यावर बसचे दरवाजे आपोआप उघडले आम्ही दहा-बारा प्रवासी आत चढलो ड्रायव्हरने पैसे घेऊन तिकीट दिली बसचे दरवाजे त्याच्या जवळच एक बटण दाबून त्याने बद केले बस चालू झाली बसमधले सगळे प्रवासी शोकसभेला आल्यासारखे चुपचाप बसले होते वर्तमानपत्राच्या पेपराची पान वाटली जात नव्हती शेंगांची टरफल बाहेर टाकताना वाऱ्याबरोबर आत येत नव्हती पायाखाली सरकवलेल्या बॅगा बसबरोबर प्रवास करीत नव्हत्या ब्रेक दाबला तरी समोर बसलेले प्रवासी एकमेकावर आदळत नव्हते कोणालाही डुलकी न आल्याने एकमेकाला सावरून घेण्याचा प्रश्नच नव्हता

आता बस भरधाव निघाली बसने बडनॉयस्टँड सोडले रस्त्याच्या दुतर्फा वाऱ्यान डोलणारी शेत भराभर मागे जात होती. मधूनच एखाद पिवळ धमक शेत लागायच तर मध्येच एखादा हिरवागार पट्टा लागायचा या गोऱ्या गोऱ्या लोकांच्या देशातली शेतीसुद्धा तितकीच मोहक होती कुठे पडीक जमीन नाही, की ओसाड पठार नाहीत शेतीची जणू राखण करण्याचच काम हाती घेतलेली हिरवी-गार झाड शेतांच्या मागे सैन्यासारखी शिस्तीत उभी असायची ही शेती केव्हा आणि कोण लावत, कोण कापत असा प्रश्न पडायचा कारण मैलोगणती पसरलेल्या शेतांमध्ये काम करताना क्वचितच एखादा ट्रॅक्टर दिसायचा बस भरधाव जात होती. रस्त्याच्या कडेला असलेल्या बांधावर सुंदर फुले आली होती त्यांच्या रंगी-बेरंगी छटा मन मोहून टाकत होत्या 'जरा बाईच मारून घेता का ?' 'कोणच्या टाइमाला येणार हो आवासचा फाटा ?' अस विचारणार कोणीच नसल्याने माझी तंद्री लागली होती सगळ्याच अनुकूल ग्रहांनी एकाच वेळी या देशावर का मुक्काम केला आहे याचं मला आश्चर्य वाटत होत

आता बसन एक मोठ वळण घेतल व ती हायवे– नव्हे, आटोबानला– लागली होती. आम्ही ताशी शभर कि मी वेगाने चाललो होतो आमच्या उजव्या बाजूने

ट्रेलर जोडलेले मोठे ट्रक धावत होते त्याना मागे टाकताना आमच्या ज्ञानात काहीच भर पडत नव्हती ट्रकच्या मागे नबरप्लेटशिवाय काहीच वाचण्यासारख नव्हतं 'बूरी नजरवाले तेरा मुह काला' न म्हणताच आम्ही त्या ट्रकच्या पुढे जात होतो 'बचेंगे तो और भी लढेंगे' या ईर्ष्येनी कोणीच एकमेकाना मागे टाकत नव्हत आमच्या डाव्या बाजूने मर्सीडीज, बी एम वे सारख्या गाड्या सुसाट पुढे जायच्या त्यांचा वेग ताशी दीडशे कि मी च्या पुढे असावा गाड्यांच्या डोक्यावर कधी स्कीइगच्या फळ्या असत, तर कधी मागे होडी नाहीतर तबू असलेला ट्रेलर असे. प्रत्येक गाडीच्या मागे काहीतरी 'लचाड' लावलेल असे आतापर्यंत गाडीवर केनच्या खुर्च्या किवा फार तर बेडिग एवढ ठेवलेल भारतात मी पाहिल होत. गाडीने जाणाऱ्या माणसाला ऐषाराम करायला उणीव भासू नये म्हणून गाडीवर टाकून नेलेल्या खुर्च्यांचे महत्व मी समजू शकत होतो पण सुखाने गाडीत बसून जाताना बर्फात धडपडण्यासाठी घेतलेल्या फळ्या पाहून माझ मन कासावीस व्हायच 'होडी उलटली तर' असा विचार मनात येऊन नकळत मी पाण्यात पोहल्यासारखे हातवारे करू लागलो तेव्हा जवळच्या म्हाताऱ्याने 'शायझे' अशी शिवी हासडली व मी भानावर आलो इतक्यात बसमधल्या रेडिओत अनाउन्समेंट झाली की, न्युरेनबर्ग– म्युन्शेन आटोबानवर धुक पडल्यान प्रवाशांनी साल्सबुर्ग– म्युन्शेन या आटोबानने जाव मला नवल वाटल आपल्या येथे घाटात पाच तास अडकून पडल्यावर दुसऱ्या दिवशी पेपरात आल तरच कळायच की अमूक अमूक मत्री पुण्याला यायचे असल्याने ट्रॅफिक बद होता

हायवेने भरधाव जाताना पोटातल पाणी हलत नव्हत वाटेतील खड्ड्यानी दिलेल्या हिसक्यांमुळे डोक शाबूत रहाव म्हणून जीव मुठीत धरून प्रवास करणारा मी उगाचच अवघडून बसलो होतो एकही गचका न मिळाल्यानं अवघडलेल शरीर तसच अवघडलेल राहिल होत त्यामुळे मुग्या आल्या होत्या अशा गुळमुळीत प्रवासाची सवय नसल्यान माझ अग दुखू लागल होत मधल्या एका स्थानकावर बस थाबली होती कोणतही स्थानक आल की उतरावयाच या सवयीने मी खाली उतरलो होतो 'श्वाईनफुर्ट आल का ?' हा प्रश्न मी जवळजवळ सर्व प्रवाशाना विचारला होता त्यामुळे 'याला श्वाईनफुर्टला जावयाचे आहे' हे सर्व प्रवाशांना माहीत होते श्वाईनफुर्ट आल नसतानाही मी खाली उतरलो हे पाहून सर्वजण कुतूहलान माझ्याकडे पाहत होते मी पुन्हा बसमध्ये चढलो तेव्हा त्यानी सुस्कारा सोडला

बस पुन्हा सुरू झाली हायवेवरून जाताना दर एक कि. मी वर टेलिफोन होता आपली गाडी नादुरुस्त झाली किंवा काही अपघात झाला व आपल्याला मदत लागली तर तो फोन उचलावयाचा की नबर न फिरवताच पोलिस कट्रोल रूमशी

आपला संपर्क साधतो मग आपली अडचण सांगावयाची व मदत मागावयाची जर वाटेत गाडी बंद पडली तर डिकीमध्ये असलेली विशिष्ट खुणेची पाटी गाडीच्या मागे धावत जाऊन एक फर्लांग अंतरावर ठेवायची म्हणजे मागून येणाऱ्या गाड्यांना पुढे अडथळा असल्याचे कळते आपल्या हायवेवरही कधीतरी अडथळा झाला होता हे ओळीने मांडलेल्या दगडांनी जागोजाग कळते फरक एवढाच की येथे ठेवलेल्या अडथळ्याच्या खुणा मागून येणाऱ्या बऱ्याच गाड्या वाचवण्यासाठी असतात. तर आपल्याकडील अडथळे बऱ्याच गाड्यांपासून एका गाडीला वाचवण्यासाठी असतात. स्वाईनफुर्ट आलं मी खाली उतरलो आता मला ट्रेनने पुढे जावयाचे होते ट्रेनला थोडा वेळ होता म्हणून मी रेस्टॉरंटमध्ये शिरलो तो कॅसिनो होता मंडळी बिअर पीत बसली होती कोणी पैसे टाकून जुगार खेळत होती संध्याकाळी करावयाच्या गोष्टी येथे सकाळपासूनच सुरू होत असल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले सकाळी अघोळ, मग देवपूजा व पोटपूजा, दुपारी वामकुक्षी आणि संध्याकाळी रमी, बिअर किंवा आणखी काही या क्रमाने सुरू होणारा दिवस मी पाहिला होता बिअर आणि जुगाराने सुरू होणारी सकाळ मला नवीन होती मी कॉफी मागवली तेव्हा सर्व्हे करणारी बाई खुदकन हसली माझं घड्याळ येथील जगाच्या चांगलं बारा तास मागं आहे असं मला वाटलं

येथे रेल्वेने प्रवास करणारे थोडे त्यामुळे रेल्वे जास्तीत जास्त प्रिय व्हावी म्हणून नानाप्रकारची आकर्षणं परतीचं तिकीट काढलं तर तिकीटात जवळजवळ ३० टक्के सूट एकदम चारजणांनी प्रवास केला तर आणखी सूट गाडी यायला वेळ असला तर वेळ (आणि पैसा) घालवण्यासाठी कॅसिनोपासून सेक्स किनोपर्यंत सर्व सोयी. मी परतीचे तिकीट काढले ते चार दिवस चालणार होते तिकीटाचे पैसे खिडकीबाहेर असलेल्या खोलगट भागात ठेवले आतील बाईने ते खोलगट भांडे नुसते फिरवले, पैसे आत गेले नंतर त्याच्यातच तिकीट व उरलेले सुटे पैसे तिने ठेवले व भांडे पुन्हा फिरवले मी तिकीट व पैसे घेतले तिकीट घेताना आपल्याकडे कराव्या लागणाऱ्या सर्कशीची आठवण झाली तिकीटासाठी समजा दहा रुपये दिले तर सर्व गोष्टी एकदम मिळणार नाहीत पहिल्यांदा तिकीट देणार ते अशा बेताने ठेवणार की खिडकीच्या भोकातून हात घालून तिकीट हाताला लागेपर्यंत हात कामातून जाईल की काय अशी भीती मग तिकीट तपासून घ्यायचे इतक्यात तिकीट देणारा उरलेल्या चार रुपयांपैकी पाच, दहा पैशांची दोन-चार नाणी अगोदर इतस्तत टाकणार ती गोळा करून खिडकीच्या भोकातून बाहेर काढीपर्यंत 'अरे ए तिकीट काढतोस की रेल्वेची अब्रू' अशा थाटात मागील मंडळी खेकसणार एवढं सगळं होईपर्यंत डोकं शाबूत असेल तर उरलेले पैसे मागून घ्यायचे मला उगाचच येथील प्रत्येक गोष्ट वेगळी व आपल्यापेक्षा चांगली वाटत होती

मी तिकीट घेऊन स्टेशनात शिरलो. फलाटावर वीस-पचवीसच मंडळी पाहून गाडीला खूप अवकाश असणार असं वाटलं. नेहमीच्या सवयीन मी जवळच्या माणसाला गाडी केव्हा व कुठल्या फलाटावर येणार ते विचारले. त्याने इंडिकेटरकडे बोट दाखवले. 'कुठं जाणार ? मग तुम्ही असं का नाही करत ? कल्याणला न जाता ठाण्याहून दादरला जा व सिंहगड पकडा. हमालाला दोन रुपये व चादर द्या म्हणजे आरामात जागा मिळेल ' वगैरे काही एक न सांगता त्याने फक्त इंडिकेटर दाखवला. मी प्रथमच इंडिकेटर पाहत होतो. त्याच्यावर किती नंबरची गाडी, कोणत्या वेळी, इतकंच काय पण कोणत्या फलाटावर येणार ते वर्षाचे टाईम टेबल मोठ्या अक्षरात लावले होते. तसं हे स्टेशन मला रूक्ष वाटत होतं. गर्दीतून वाट काढून सामानासकट फलाटावर पोचल्याचा आनंद मिळत नव्हता. ती हमालांची घाई, चादरींची देवाण, घेवाण, सामानाचं रक्षण करण्याकरता चिंगीबड्यानी गोंटू वळकटीला दिलेला वेढा, बेवारशी कुत्री, हात, पाय, डोळे वगैरे काहीतरी गमावल्याचा भास होणारे भिकारी, इंजिनाच्या धुराने काळी झालेली फलाटावरची शोकेस. बटाटावडा, सामोसा, आम्लेट वगैरेच्या वासानं तयार झालेला नवा सुगंध वगैरे काहीच प्रत्ययास येत नव्हतं. स्टेशन मास्तर ' ठेसन मास्तर ' सारखा दिसत नव्हता. त्याने हातात कंदील, झेंडा वगैरेपैकी काहीच न घेता पोलिसऑफिसरच्या हातात क्वचित दिसणारा 'वॉकीटॉकी ' घेतला होता. त्यामुळं फलाटावर पाणी कुठं मिळतं, गाडी नेमकी केव्हा येईल, असे प्रश्न विचारण्याची सोय नव्हती. निरोप द्यायला आलेली मंडळी हुडकून काढावी लागत होती.

हमाल नसल्याने सामानासाठी मी छोटीशी ट्रॉली घेतली व चार नंबरच्या फलाटावर गेलो. गाडी वेळेवर आली. दारात कोणीच बसलं नसल्यानं व सगळी दारं बंद असल्यानं गाडी नुकतीच कारशेडमधून धुऊन वगैरे आली असावी असं वाटलं. गाडी थांबली. दारं उघडली गेली व आतील माणसं बाहेर आली.

नेहमी घरात दार लावून बसण्याची सवय झाल्यानं गाडीच्या दारात कुणी बसत नसावे असं मला वाटलं. मी सामान घेऊन आत शिरलो. गाडीत जागा भरपूर होती. त्यामुळे धावत जाऊन आधी बसायच्या जागी पिशवीला बसवून मग सामानाचा बंदोबस्त करण्यासारखे जोखमीचे काम नव्हते. आत गेल्यावर मी हसून कोणी प्रतिसाद देत आहे का पाहिले. सर्वजण डोळे उघडे असून आंधळे असल्यासारखे मला वाटले. मी खिडकीची जागा पकडली व बाहेर पाहू लागलो. गाडी सुरू होईपर्यंत चढावयाचे नाही असा विडा उचललेली पोरं दाराभोवती जमलेली दिसली नाहीत. गार्डने सर्व दारं बंद करून घेतली. गाडीची दारं बंद झाल्याशिवाय गाडी सुरू होत नाही, असं नंतर मला कळलं. गाडी सुरू होईपर्यंत मी खिडकीची काच खाली केली नाही. मागे मला एकदा नाशिकला जाताना ते भोवलं होतं. एका

भय्याने त्याच्या ट्रंक आणि ताब्यासकट खिडकीतून माझ्या अंगावर उडी घेतली होती आणि माकड हाड सरकल्यामुळे मला डॉक्टरचं चारशे रुपयांचं बिल भरावं लागलं होतं तेव्हापासून गाडी सुरू होईपर्यंत खिडकी उघडायची नाही, असं मी पक्कं लक्षात ठेवलं होतं गाडी सुटल्यावर काच खाली करून मी खिडकी उघडली

गाडी जोरानं पळू लागली खिडकीतून वाऱ्याचा एवढा मोठा झोत येऊ लागला की माझ्याजवळ बसलेल्या एका माणसाची हॅट उडाली व मागच्या सीटवर जाऊन पडली. त्याच्या हातातला पेपर टरकन फाटला व त्याचा चष्मा खाली पडून फुटला हे सगळं इतक्या झपाट्यानं घडलं की, मी खिडकी बंद करावयाची सोडून चष्म्याच्या काचा गोळा करू लागलो तो माणूस खूप संतापला पण त्याचा संताप त्याच्या हातातून किंवा जिभेतून बाहेर पडला नाही त्याचे डोळे लाल झाले होते ओठ थरथरत होते इतक्यात माझ्या लक्षात आलं की पलीकडे बसलेल्या माणसानं मी आधीच करावयास हवं असलेलं खिडकी बंद करण्याचं काम उरकलं होतं मग मी हॅट, पेपर वगैरे गोळा करून त्याला दिले व डबा बदलण्यासाठी पुढच्या स्टेश-नची वाट पाहत बसलो यापुढे जर्मनीत असेपर्यंत गाडीच्या खिडकीची काच खाली करावयाची नाही असा मी निश्चय केला

माझा केविलवाणा चेहरा पाहून समोरच्या माणसाला दया आली तो टर्की असावा त्यानं मला तू कोठून आलास, काय करतोस वगैरे माहिती विचारली मला जर्मन बोलता येत असल्याचं कळल्याबरोबर माझ्या शेजारी बसलेल्या जर्मन माणसानं माझ्याशी बोलावयास सुरुवात केली आता त्याचा राग थंड झाला होता मग त्याने खिडकीची काच केवळ एक ते दोन इंचच खाली केली तरी भरपूर वारा कसा येतो ते दाखवले शिवाय हवा गरम, थंड ठेवण्याची व्यवस्था असून हीटर कसा ऑन करायचा ते समजावून दिले मग आमची खूप दोस्ती झाली

ही येडे स्टुडे येडे क्लासे जाणारी बुंडेसबान वेगानं पळत होती सगळ्या खिडक्या बंद असल्यानं वेगाबरोबर वाढणारा खडखडाट जाणवत नव्हता गाडीला भिऊन मागे पळत जाणारी झाडं आणि शेतं लांबवर गेल्यावर थांबल्यासारखी वाटत होती मध्येच एखादं सुंदर गाव लागायचं त्याच्याजवळून एखादी नदी वहायची सभोवार शेती असायची जवळच एखादा कारखाना दिसायचा आपल्याकडे जशी सगळी गावं रेल्वे स्टेशनच्या आसपास वाढल्यासारखी वाटतात तशी येथील गावं एखाद्या छोट्या कारखान्याच्या शेजारी वसलेली असतात तो कारखाना एखाद्या नदीच्या काठी आश्रय घेतो मग गावातली लोकं कारखाना भरभराटीला आणतात आणि सगळं गाव श्रीमंत दिसतं सुंदर छोटी छोटी घरं घरासमोर सुंदर बाग, मध्येच एखादं चर्च, एखादं फुटबॉल ग्राऊंड किंवा एखादं टेनिस कोर्ट

मी विचार करू लागलो. याच गाडीत असंख्य 'पॅसिंजर' कोंबले असते व या

गावात आणून सोडले असते तर या गाडीच व गावाच काय झाल असत हीटर-शिवाय गाडी गरम राहिली असती आतील गोंगाटापुढे खिडकी उघडी टाकली असती तरी बाहेरचा खडखडाट ऐकू आला नसता गावाची गावगंगा झाली असती माझी तंद्री लागली होती इतक्यात गँगवेमधून एक रुबाबदार माणूस ट्रॉलीवर काही खाण्याच्या वस्तू विकावयास आला त्यात कोकाकोला, बीअरचे बंद डबे होते सुंदर सुंदर चॉकलेटस् होती मी एक कोकाकोलाचा डबा व तीन चॉकलेटबार विकत घेतले एक एक बार त्या जर्मन व टर्की माणसाला दिला व माझ्यामुळे फुटलेल्या चष्म्याच नुकसान भरून काढल्याच समाधान मिळवल

मलाही चॉकलेटस् खूप आवडायची पण चॉकलेट म्हटल की ती लहान मुलाच रड थांबवण्यासाठी विकत घ्यायची असतात अस मला वाटायच पण येथे म्हातारे-सुद्धा न लाजता चॉकलेट खाताना पाहिल्यावर चॉकलेटस् हे माझ मुख्य खाण बनल होत पुन्हा त्यांची चव व आकारही नानाप्रकारचे कधी त्याना जरदाळूच्या गोडीने खावे तर कधी खारकेच्या नुसत्या आठवणीनसुद्धा माझ्या तोंडाला पाणी सुटायच चिंचेनतर माझ्या जिभेवर प्रभुत्व मिळवणारा दुसरा पदार्थ जर्मनीतील चॉकलेटस्!

वाटेत वुर्सबर्गच्या किल्ल्याच्या उतारावर लावलेले द्राक्षाचे मळे लागले आता गाडी -हाईन नदीच्या कडेने चालली होती -हाईन नदीतून बोटीतून बोटीने फँकफुर्ट ते क्योलमपर्यंत केलेल्या प्रवासाची वर्णन मी वाचली होती शब्दाच्या पलीकडे निसर्गशोभा असलेला हा प्रदेश पाहताना डोळ्याचे पारणे फिटत होते आधुनिकतेबरोबर येणारा कृत्रिमपणा येथे जाणवत नव्हता

खेडेगावात दिसणारी निसर्गशोभा आणि जीवनातील स्वस्थपणा, शहरांतील आधुनिकता आणि श्रीमती याचा येथे सुंदर मिलाफ झाला होता शहराबरोबर वाढणारी गर्दी आणि त्यातून निर्माण झालेल्या गलिच्छ वस्त्या कोठेच दिसत नव्हत्या खेडेगावात दिसणारी गरिबी आणि त्यामुळे येणारा निरुत्साह जाणवत नव्हता नदीच्या पात्रांतून जाणाऱ्या बोटी, पलीकडील रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारी आणि त्याही पलीकडे असलेला दुसरा लोहमार्ग यामुळे येथील सर्व जग प्रवास करत असल्यासारख वाटायच जागोजाग असंख्य टूरिस्ट, त्याच्यासाठी असलेली छोटी छोटी हॉटेले नदीच्या दुतर्फा दिसत होती नदीच्या दोन्ही पात्रावर सुंदर सुंदर छोटी गाव वसल्याच दिसत होत मध्येच डोंगरावर एखादा छोटासा किल्ला दिसायचा लांबून सर्व एखाद सुंदर चित्र काढल्यासारख दिसायच आम्ही फ्रँकफुर्टच्या जवळ आलो होतो जर्मनीत अभावानेच दिसणाऱ्या गगनचुंबी इमारती हळूहळू दिसावयास लागल्या होत्या

मी माझ्या शेजारच्या जर्मन माणसाला विचारले की ही छोटी छोटी असंख्य घर व बागा कसल्या आहेत त्याने सांगितले की फॅन्कफुर्टसारख्या ठिकाणी जागेची

उंचाई असल्याने फ्लॅटमध्ये रहावे लागते म्हणून येथे लोक वीकएन्डसाठी छोटी घर घेतात ओळीने एकासारखी एक दिसणारी आणि प्रत्येक घराभोवती बाग असलेली असंख्य घर दिसत होती मोकळ्या वातावरणात राहण्यासाठी केवढी ही धडपड थोड्याच वेळात फ्रॅन्कफुर्ट आले गाडी येथे अर्धा तास थांबणार होती गाडी स्टेशनात शिरली गाडीचा दरवाजा जर्मन माणसाने उघडला व त्याला तिथेच उतरावयाचे असल्याचे त्याने निरोप घेतला त्याला रिसीव्ह करण्यासाठी हातात फुलांचा गुच्छ घेऊन त्याची प्रेयसी आली असावी मग त्याने माझी तिच्याशी ओळख करून दिली ती त्याची पत्नी होती पत्नीने पती येणार म्हणून लग्न झाल्यानतरही फुलांचा गुच्छ घेऊन स्टेशनवर यावे याचे मला आश्चर्य वाटले

मी रेस्टॉरंटमध्ये जाऊन माझी आवडती डिश 'पॉमफ्रेट' (म्हणजे मासा नव्हे, तर पोटॅटो चिप्स) व केक घेतला कॉफी प्यायली व पुन्हा गाडीत बसलो गाडी आता ऱ्हाईन नदीच्या काठाने भरधाव निघाली होती वाटेत बॉन, क्योल्न वगैरे पूर्वी नाव ऐकलेली मोठी शहर लागली क्योल्नच सर्वांत जुन व मोठ चर्च लाबूनच पाहिल बायर, बीएएस वगैरे ओळखीचे कारखाने दिसले. एका जागी बसून कटाळा आला म्हणून मी गाडीत थोडा फेरफटका मारला कोणी पेपर वाचत होते कोणी खिडकीच्या बाहेर टक लावून पाहत होते कोणी एकमेकाच्या कुशीत विसावले होते कोणी काही खात बसले होते पण एक दोन म्हाताऱ्या सोडल्या तर कोणी कोणाशी गप्पा मारताना दिसत नव्हते प्रवास म्हटला की पत्ते, गप्पा, वादविवाद झाल्याशिवाय तो पुरा कसा होतो हे मला कळत नसे 'राजनारायणनी अस करायला नको होत' ते थेट 'कार्टरनी इराणच्या शहांना आपल्या देशात ठेवण्यात मोठी चूक केली' वगैरे गोष्टींवर चर्चा होत नव्हती मी एकदा धुळ्याला जाताना 'अमूक अमूक विद्यापीठाच नाव अमूक अमूकच ठेवाव' या विषयावर विद्यापीठात कधीच पाऊल न ठेवलेल्या लोकानी केलेली मारामारी पाहिली होती 'तुमच्या बापान तरी विद्यापीठ पाहिल होत कां !' येथपासून सुरुवात झाली ती थेट 'पुढे बोललास तर बत्तीशी उतरवीन' इथपर्यंत पोचून दोन चार लोकाचा कपाळमोक्ष झाल्यावर थाबली

अलीकडे वादविवाद चर्चा ही तोकडी पडू लागल्याने बराच वेळ पुरणारी आणि बऱ्याच लोकाच्या सहनशीलतेला 'पुरून उरणारी भजन चालू झाली आहेत मग त्यात मराठी, गुजराथी, कानडी, हिंदी वगैरे सर्व भाषाचा चावून चोथा होईपर्यंत ती कुटतात तेव्हा कान तृप्त व्हायच्या आधी फुटतात की काय याची काळजी घ्यावी लागते. पण आमचे कान आता इतके किटले आहेत की ते बॉबचा स्फोट झाला तरी फुटणार नाहीत कोठेच कशात भाग घेता येण्यासारख नाही हे लक्षात आल्यावर मी गुपचुप माझ्या जागेवर येऊन बसलो प्रत्येक स्टेशनवरची

वेळ आणि टाईमटेबलात लिहिलेली वेळ ही इतकी तंतोतंत जुळत होती की गाडी स्टेशनात शिरायच्या आधी स्टेशनवरची घड्याळ 'ॲडजेस्ट' करतात की काय अशी शंका यावी हाच एक उपाय आपल्या येथे करून पाहिला तर मध्य रेल्वेच्या गाड्या वेळेबरहुकूम चाललेल्या पाहिल्याच भाग्य या जन्मात आपल्या नशिबी येईल अशी आशा करून एसेन यायची मी वाट पाहत होतो

एसेन ही व्यापारी बाजारपेठ असल्याच ऐकल होत पुन्हा गगनचुंबी इमारती दिसू लागल्या क्वचित् एखादी गाडी धडधडत विरुद्ध दिशेन जायची ती लाबवर जाईपर्यंत मी तिच्याकडे टक लावून पहायचो तिची दृष्टी काढावी असे वाटायचे. ती सुरेख दिसायची म्हणून नव्हे, तर वेळेवर यायची, वेळेवर जायची म्हणून तशी दिसायला ती बेताचीच. तुमच्या-आमच्यासारखीच पण फार वक्तशीर मला गमत वाटायची ती बाहेरून एवढी साधीभोळी दिसणारी गाडी आतून किती चांगली असायची त्याचे त्याच्या घराचेही तसेच बाहेरून एकासारखी एक, पांढरा स्वच्छ रग दिलेली, वर मगलोरी कौल असलेली, निमुळत्या छपरांची घर पण आतून इतकी सजवलेली तसच गाडीच बसायची बाकडी कोच होऊन आलेली पख्यांच काम करणाऱ्या हीटरची बटण 'रेग्युलेटर' होऊन आलेली पुन्हा हे सर्व सेकड क्लासमध्ये म्हणजे एक रेध पुसून 'थर्डचा' सेकड केलेल्या आपल्या क्लाससारख नव्हे

पाच वाजले गाडी एसेन स्टेशनात शिरली माझा मेव्हणा तेथे उतरवून घ्यावयास येणार होता दारात उभ रहायची किंवा खिडकीतून हात बाहेर काढायची सोय नसल्यान मी काचेच्या आडून त्याला पाहणार होतो तो पाच–दहा वर्षांनी मला दिसणार होता मी सामान घेऊन खाली उतरलो तोच तो मला समोरून येताना दिसला दोघ जातीने मला उतरवून घ्यावयास आली होती बरेच दिवसांनी मराठी माणूस भेटल्याचा आनद होत होता चमचमीत पदार्थ खावयास मिळणार म्हणून जीभ पाणावली होती एसेनहून त्याच्या मोटारने आम्ही डोर्स्टेन या गावी गेलो

।

## प्रकरण चौथे

# हवेतून संचार

डोर्स्टन हे छोटं गाव होतं तेथील एअर गॅस कंपनीत तो केमिकल इंजिनिअर म्हणून काम करत होता. तो एका बंगलेवजा घरात राहत होता. तळमजल्यावर एकटाच माणूस राहत असल्याने शेजार असा नव्हता रात्री कांदे-बटाट्याचा रस्सा आणि भात, काटेचमचे न वापरता, खाताना घरच्या जेवणाची मजा लुटल्यासारखे वाटत होते. जेवण झाल्यावर खूप गप्पा झाल्या देशाच्या राजकारणापासून ते गावच्या भानगडीपर्यंतचे विषय चिवडून झाले गोदूआत्या, काऊताई, जनूकाका, गजाभाऊ अशा निवडक पण अविस्मरणीय व्यक्तीरेखा भराभर नजरेसमोर येऊ लागल्या

मनुष्य कितीही दूर असला व कितीही मोठा झाला तरी त्याचं स्वतःचं असं छोटंसं विश्व असतं आणि सर्वांत अधिक आनंद मिळतो, तो या विश्वात फेरफटका मारल्यावर मला वाटतं, माणसाने वयाच्या पंचवीस वर्षांपर्यंत पाहिलेलं जग त्याला अधिक जवळचं व सतत आठवण करून देणारं असतं मग गोदुआत्याने आजारी असताना केलेली सेवा कुठल्याही आधुनिक हॉस्पिटलमध्ये मिळणाऱ्या सेवेपेक्षा मोलाची वाटते काऊताईसारख्या खाष्ट बाईला भुताचं सोंग घेऊन रात्री घाबरवल्याचं आठवतं तेव्हा हसून हसून मुरकुंडी वळते जनूकाकाने लक्कडगुडी दिली नाही म्हणून त्याच्या ओटीवर टाकलेल्या घाणीच्या टोपल्या आठवल्या की अजून घाण वास नाकात गेल्यासारखे वाटते गजाभाऊची बोबड्या आवाजात आवर्तन म्हणताना उडालेली तारांबळ आठवली की त्यांना पुन्हा एकदा आवर्तन म्हणायला सांगावीत व त्याची टेप तरी जर्मनीत वाजवून पहावी असं वाटतं मग ही टेप

बिअरफेस्टमध्ये ऐकलेल्या गाण्यांपेक्षाही अधिक गोड वाटले

आमच्या खूप गप्पा झाल्या गप्पाबरोबर वाईनचे ग्लास फस्त होत होते बाबाना गप्पा मारताना व हसता-खिदळताना न पाहिलेली गीता त्या ऐकता ऐकता झोपी गेली होती आमच्या गप्पानी शेजाऱ्याला त्रास होईल अशी शक्यता नसल्याने आम्ही निर्धास्त होतो नाहीतर मूल मोठ्याने रडले किंवा रेडिओ मोठ्याने लावला म्हणून पोलिसांत तक्रार करणारे महाभाग येथे असल्याच ऐकल होत वाईन अना-वर झाल्यान गप्पा आवरत आल्या होत्या मग केव्हा झोप लागली ते कळलेच नाही

दुसऱ्या दिवशी सुटी असल्याने गावात भटकून आलो दुपारी एक अजब कालवा पहावयास गेलो होतो जर्मनीमध्ये बोटीने वाहतूक करता येईल येवढे मोठे कालवे आहेत ह्या कालव्यातील पाणी नदीसारखे वाहत जाऊ नये म्हणून काल व्याची अशी रचना केली आहे की कालव्याचा एक भाग एकाच पातळीवर ठेवायचा म्हणजे वरच्या कालव्याचे पाणी खालच्या कालव्यात आपोआप वाहून न जाता ते पाहिजे असेल तेव्हाच सोडता यावे पण पाण्याची पातळी अशी भिन्न अस-ल्याने बोटी कशा जाणार ? त्यासाठी जर्मनांनी तयार केलेली अजस्र यान्त्रिक वाटी पहावयास आम्ही मुद्दाम गेलो होतो यासाठी जवळजवळ चारशे फूट लांब व दीडशे फूट रुद अशी धातूची वाटी तयार केली होती व ती वर व खाली करण्यासाठी यान्त्रिक व्यवस्था होती बोट आली की या वाटीत ती घ्यावयाची व वरच्या कालव्याचे पाणी एका मोठ्या झडपेने अडवावयाचे मग वाटीच्या खालच्या भागा-तले पाणी खालच्या कालव्यातील पातळीबरोबर येईल एवढे कमी करावयाचे व त्या कालव्याची झडप वर करून वाटीतील बोट खालच्या कालव्यात सोडायची

हे अजस्र काम केवळ दहा ते पधरा मिनिटांत व्हावयाचे पूर्वी ह्याच कामाला काही तास लागत असत सामान्य वाटणाऱ्या कल्पनाना मूर्त स्वरूप देऊन त्या प्रत्य-क्षात आणण्याच कसब व चिकाटी पाहून अचबा वाटायचा हा कालवा पाहून झाल्या-वर आम्ही ऐतिहासिक स्थळ पहावयास गेलो होतो तेथे किल्ल्याचे काही भग्न अव-शेष होते एक अर्धवट उभे असलेले स्टेडिअम होते व सभोवती तटासारखी पडकी भित होती तस पाहिल तर जर्मनीत ऐतिहासिक स्थळ कमीच आहेत ती सुद्धा शनिवारवाड्यात लावलेल्या पाट्यांसारखी पाट्यावरून ठरवायचे की येथे राज-महाल होता, येथे राघोबादादाला नजरकैदेत ठेवले होते, वगैरे दुसऱ्या दिवशी आम्ही हॉलडला जाणार होतो हॉलडची बॉर्डर येथून वीस कि मी अतरावर होती मी आतापर्यंत जेथे जेथे गेलो होतो तेथे कोणत्या ना कोणत्या देशाची बॉर्डर वीस पचवीस कि मी इतक्या अतरावर होती

पण दुसरा दिवस अशुभ असावा सगळ्या अशुभ ग्रहानी एकदमच स्वारी केल्यासारखे मला वाटले सकाळीच गीताची बाहेर ठेवलेली सायकल चोरीला गेली

आम्ही पोलीस स्टेशनात तक्रार नोंदवण्यास गेलो पोलीस स्टेशन म्हणजे चक्क एखाद्या विलायती कपनीचे ऑफिस वाटावे जिकडे तिकडे केबिन्स होत्या हवालदार नावाची जात पहावयास मिळत नव्हती मदत पाहिजे का ?' अशा अर्थी पाटी असलेल्या एका केबिनमध्ये आम्ही शिरलो तेथे एक रुबाबदार माणूस ऑफिसरच्या थाटात बसला होता पासपोर्ट काढताना भरावयाच्या फॉर्मसारखे आम्हाला दोन-तीन फॉर्म देण्यात आले तेथील रुबाबावरून असे वाटले की ' रीमोट कंट्रोल सीस्टीम 'सारख्या कशानेतरी काही मिनिटाच्या आत सायकल हुडकून काढतील आणि सध्याकाळी टीव्हीवर अनाउन्समेन्ट करून कशा शिटया मारल्या, कुठे पकडली, कशी पकडली वगैरे तपशील दाखवतील

माझ्या समजुतीप्रमाणे येथे चोऱ्या होत नसाव्यात मला वाटले, पोलिस खात्याला बरेच दिवसांनी मिळालेली चोरी चोरावर मोर झाल्याशिवाय पोलिसखाते सोडणार नाही उद्या पेपरात सायकलचा आणि तिला पकडणाऱ्या पोलिस ऑफिसरचा फोटो नक्की पहावयास मिळेल पण माझा विरस झाला येथे खूप मोठ्या चोऱ्या व दरोडे पडत असल्याने अशा किरकोळ चोऱ्याकडे लक्ष द्यावयास त्यांना वेळ नसल्याचे कळले

घरी येतो तो दोन इलेक्ट्रीशिअन्स डीफ्रीजचे नवीन कनेक्शन द्यावयास आले होते वयाने अप्रेंटीस वाटत होते फक्त ऊचीने आणि डोक्यावरच्या केसाने [illegible] [illegible] होते. वाहिनी बाहेर गेली होती म्हणून मलाच त्यांना सामोरे जावे लागले त्यांनी बरोबर आणलेल्या हत्यारावरून केवळ कनेक्शन देऊन भागेलसे वाटत नव्हते मला नक्की काय करावयाचे आहे ते माहीत नसल्याने मेव्हण्याच्या ऑफिसला फोन लावला व त्याला बोलावयास सांगितले

झाले, कामाला सुरवात झाली होत्या नव्हत्या तेवढ्या हत्यारानिशी भिंतीला भोक पाडावयास सुरवात झाली एकजण ड्रिलिंग मशीनने प्रयोग करत होता तर दुसरा हातोड्याने चेहऱ्यावरचे पावडरचे थर गळून पडल्यावर जसे वाटावे तसे भिंतीचे खरे रूप बाहेर येऊ लागले मी घाबरलो. भिंत जागेवर राहणार की नाही याची भीती वाटू लागली मी पुन्हा फोन लावला पुन्हा काहीतरी बोलणी झाली इतस्तत' पडलेल्या सिमेंट व विटांच्या कचऱ्याने घराची शान बिघडली मी कासावीस झालो एकदा वाटले, यांना हाकलून द्यावे पण जर्मन कारागीर कुशल असतात असे ऐकले असल्याने धीर धरला. पुन्हा कामाला सुरवात झाली त्यांच्यापैकी इलेक्ट्रीशियन कोण व हेल्पर कोण हे काहीच कळत नव्हते बहुतेक दोघेही हेल्पर असावेत पण एकमेकांना ' हेल्प करायला तयार नव्हते शेवटी बाचाबाचीला सुरवात झाली मला बरे वाटले बरेच दिवसात कोणी कोणाला मोठ्याने बोललेले ऐकले नव्हते जर्मन भाषेत भांडण कसे वाटते ते पहावयास मिळाले [illegible]

यानी सुरवात होणारी वाक्य आता ' साक्रमेंट ' ' शायझे ' यानी सुरू होत होती कोंबडयाची झुज पाहताना जसा चेव यावा तसा मला येत होता तरीपण मी हात-वारे करून प्रोत्साहन देण्याच टाळल शेवटी त्या महाभागानी एक जाड इलेक्ट्रीकची वायर काढून धुण वाळत घालायच्या तारेसारखी लटकवली मी सुस्कारा सोडला कशाबशा वायरी जोडल्या आणि विजय मिळवल्याच्या आविर्भावात स्विच ऑन केला. ' भक ' असा तोफ डागल्यासारखा आवाज झाला आणि पराभव झाल्याप्रमाणे बिचारे इतरही दिवे विझले इतक्यात वहिनी आली झालेला प्रकार पाहून तिच्या कपाळाची आग मस्तकात गेली मग दोन जर्मन आणि एक इडियन असे वाग्युद्ध सुरू झाले तोंडास तोंड लागली निकराची लढाई झाली परकीय भाषेतसुद्धा आम्ही इडियन माणसे किती सफाईने वाग्युद्ध जिकू शकतो हे कृष्णमेननतर पुन्हा सिद्ध झाले तशात ही पडली इडियन बाई मग कोणाची बरोबरी करू शकणार नाही । मी विचार केला की जर अणुयुद्ध रद्द करून केवळ वाग्युद्धेच खेळावयाची असे जर सर्व देशानी ठरवले तर सर्व जग पादाक्रांत करावयास भारतास फारसा वेळ लागणार नाही शिवाय सैन्यात स्त्रियाना वरच्या जागा मिळतील व समान हक्काची पाय-मल्ली आपोआपच थांबेल. मी तो विचार तेथेच सोडून दिला आणि पुन्हा मेव्हण्याला फोन केला त्याने येताना ऑफिसचा गवडी व इलेक्ट्रीशियन बरोबर आणला व आम्ही सुस्कारा सोडला

थोडया वेळाने याहूनही भयकर घटना घडली. ही घटना जर्मनीत घडावयास नको होती भारतात अशा घटना रोज घडल्याचे मी पेपरात वाचतो पण जर्मनीत सर्व लोक सुखी असतात अस येथील वैभवाकडे पाहून वाटतं. त्यामुळे हे अस काही घडेल यावर विश्वासच बसत नव्हता तो फोन आल्यान घरातील सर्वजण हादरून गेली होती काय कारण असेल या विचारान सर्वजण दिग्मूढ झाली होती तपशील विचारण्याच धाडस मला होत नव्हत घरातील वातावरण उदास झाल होत तेव-ढ्यात दारावरची बेल वाजली एक जर्मन गृहस्थ आत आला तो रडवेला चेहरा करून दोन मिनिट नुसता स्तब्ध बसला होता मी केविलवाण्या नजरेन त्याच्याकडे पाहिल हा कोण नवीन माणूस म्हणून त्यान माझ्याकडे पाहिल नसाव इतक्यात माझ्या मेव्हण्यान विचारल की हे सर्व झाल कस? तो सांगू लागला त्याच्या कार-खान्यात काम करणाऱ्या एका परदेशी सहकाऱ्याच्या बायकोने स्वत'ला पेटवून घेतल होत

ते कुटुब माझ्या मेव्हण्याच्या चांगल्या परिचयाच होत त्याचा चांगला घरोबा होता आदल्या दिवशी काहीतरी कुरबुर झाली होती रागाच्या भरात अगावर पेट्रोल ओतून बाथरूममध्ये आगीचा भडका उडाला होता. ती राहत असलेल्या

घरात स्फोटासारखा आवाज होऊन बाथरूमचे दार तिच्यासकट धाडकन कोसळले होते घरातील सर्व सामानाची नासधूस झाली होती संसार उद्‌ध्वस्त झाला होता घरातील धुरामुळे शेजारील फ्लॅटमधील लोक गुदमरली होती तिची दोन मुलं शाळेत गेल्याने वाचली होती नवरा कारखान्यातून घरी येईपर्यंत लोक जमली होती पोलिसही आले होते प्रेस रिपोर्टर धडाधड फोटो काढीत होते दुसऱ्या दिवशी पेपरात मोठी बातमी झळकली होती थोड्या वेळाने त्यांची दोन मुलं घेऊन आणखी एक जर्मन माणूस आला मुलाची गीताशी मैत्री असल्यान पुढची व्यवस्था होईपर्यंत त्यांना तेथेच ठेवण्याच ठरलं

संध्याकाळी आम्ही त्या जर्मन माणसाबरोबर त्याच्या घरी गेलो मुलांनाही बरोबर घेतल होत या मुलाच्या बरोबरीची त्या जर्मन माणसाचीही दोन मुलं होती नंतर आम्ही चर्चमध्ये गेलो मृताच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून आज खास 'प्रेअर्स' होत्या याच चर्चमध्ये ही दोन लहान परदेशी मुलं कोरसमध्ये गात असत ती इतकी सुरेख गायची की कोणत्याही परिस्थितीत या मुलानी हा गाव सोडून जाऊ नये अस सर्वांना वाटायच प्रेअर्स सुरू व्हायच्या आधी पाद्रयांनी आम्हाला आत बोलावले तुमच्या धर्मात कशा प्रेअर्स करतात ते विचारल आम्ही एकमेका-कडे पहावयास लागलो हा पहिलाच प्रसंग होता नक्की काय सांगावे ते कळेना शेवटी 'मृताच्या आत्म्यास शांती लाभो', 'मुलाची आम्ही चागली काळजी घेऊ' 'त्याना चागल शिक्षण देऊ' वगैरे सुचेल ते सांगितले व त्याप्रमाणे पाद्रयाने प्रेअर्स म्हटल्या

सगळे वातावरण अतिशय गंभीर होते गावातील खूप लोक चर्चमध्ये आली होती मुलाच्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पाहून सगळ्यांचेच काळीज भरून आले होते परदेशात असूनसुद्धा तेथे मिळालेल्या करुणेला तोड नव्हती त्या माणसाचा संसार उद्‌ध्वस्त झाला होता त्याला हरप्रकारे मदत करावी अस पाद्रयाने आव्हान केल होत आणि सर्वांत आश्चर्य म्हणजे काही दिवसांतच नवीन संसार उभा करून देण्यात आला होता कोणी फ्रिज दिला होता कोणी टीव्ही दिला होता कोणी संबंध स्वयपाकघर सजवून दिल होत कोणी बसायची खोली सजविली होती. त्याच्या साहेबान दाखविलेल्या सहानुभूतीने तर मी फारच भारावून गेलो होतो त्यानं त्या दोन लहान मुलाना आपल्या घरी ठेवण्याचं कबूल केल होत

मला आलेला अनुभव अविस्मरणीय होता परदेशीय माणसालासुद्धा मिळ-णाऱ्या वागणुकीला तोड नव्हती माणस मनानी जवळ आली की जाती, धर्मांची कोणतीही बंधन त्याला दूर ठेवू शकत नाहीत हे पुन्हा एकदा प्रत्ययास येत होते

मी विषण्ण मनान दुसऱ्या दिवशी बडनॉयस्टॅडला परतलो होतो

बडनॉयस्टॅडचा मुक्काम आता संपत आला होता घर सोडून आता जवळ-

जवळ चार महिने होत आले होते डोक्यावरचे केस इतके वाढले होते की त्याचा आता बोजा वाटू लागला होता आतापर्यंत कानालाही न शिवलेले केस आता कानाच्या पाळीपाशी चाळा करू लागले होते तशात सौ इकडे यायला आता फार दिवस शिल्लक नव्हते त्यामुळे ती यायच्या आत 'माझा होता तसा नवरा मला परत मिळाला अस भासवण मला आवश्यक होत म्हणून रुपया-आण्याचा हिशोब न करता नाईलाजान न्हाव्याच्या हातात डोक द्यायच ठरवल 'काय भाऊसाहेब ! आज करायची का ?' अस जवळजवळ दर आठवड्याला विचारून जाणाऱ्या पांडू न्हाव्यापासून तो 'येनरी स्वामी येड माड तिरी' अस काहीतरी बडबडणाऱ्या आधुनिक न्हाव्यापर्यंत सर्व समस्त न्हावी मडळी डोळ्यासमोर आली. आजपर्यंत तीन रुपयात घाऊक दराने दाढी, मिशी, डोक्यावरचे केस, खाकेतले केस वगैरे भादरून घेणारा मी साठ रुपये मोजावे लागणार म्हणून भेदरून गेलो होतो पण नाईलाज होता

मी ऑफिसात 'माझ्या योग्य' न्हाव्याची चौकशी केली पुष्कळ रेकमेन्डेशन्स आली पण त्यासाठी फोनन अॅपॉइंटमेंट घेण आवश्यक होत प्रत्यक्ष साहेबाला अपॉइंटमेंट न घेता भेटण्यात पुरुषार्थ वाटणाऱ्या मला येथे न्हाव्याची अपॉइंटमेंट घ्यावी लागते हे ऐकून कसेसेच वाटले त्यात कोणत्याही जर्मन माणसाशी फोनवर बोलायचे म्हणजे महाकर्मकठीण जस दोन जर्मन माणस जर एकमेकाशी बोलत असली तर त्यांच बोलण समजण दुरापास्त, तस हे फोनच काही दिवसांपूर्वी मी फोनवर असाच घोटाळा केला होता बुर्संबुर्गला राहणाऱ्या माझ्या एका जर्मन मित्राला 'या मगळवारी तुझ्याकडे येतो' असे फोनवर सांगितले होते आणि तो 'गुरुवारी' समजला होता डोनसराग आणि डीन्सराग याच्या उच्चारात काहीतरी घोटाळा झाला होता माझी फजिती होऊन स्टेशनवर खूप वेळ वाट पाहून मी त्या नवीन गावात पिशवी खांद्यावर लटकवून सबध दिवस भटकून काढला झालेली फजिती ऑफिसमध्ये कळू नये म्हणून कसा पाहुणचार झाला याच खोटच रसभरीत वर्णन केल अर्थात् शुक्रवारी ते बिंग फुटलं कारण त्यानेही गुरुवारी रेल्वेस्टेशनवर बायकोसहित येऊन खूप वाट पाहिली होती व भरपूर शिव्या दिल्या होत्या व शुक्रवारी फोनवरून ऑफिसमध्ये सर्वांना सागितलं होत 'अडला हरी ..पाय धरी या न्यायान मी फोनवर रविवारची अॅपॉइंटमेंट मागितली त्यान बराच वेळ विचार करून सव्वानऊला यायला मिळेल का अशी पृच्छा केली माझ्या वेळेपेक्षा त्याचा वेळ जास्त किंमती 'असल्यान मी होकार दिला 'बाहेर एखाद बाक दिसताय का ?' अशी खूण शोधण्यात वेळ गेल्याने सलून सापडावयास वेळ लागला गॉगल ग्लास असलेल्या दरवाजातून मी आत शिरलो समोर एक सुरेख मुलगी रिसेप्श-नीस्टसारखी बसली होती मी माझ नाव सांगितल तिन रजिस्टर उघडल काही-

तरी त्यात लिहिल. 'केस कापल्यावर पैसे न देता पळून गेला तर काय घ्या' अशा भावनेनं तर तिनं माझं नाव लिहून घेतलं नसेल ना अशी मला उगाचच शंका आली.

नऊ वाजून दहा मिनिटं झाली होती. बरोबर सव्वानऊ वाजता दुसरी, डॉक्टरसारखा अॅपरन घातलेली मुलगी आतील दालनातून बाहेर आली. मला आत नेण्यात आलं. एका दाताच्या डॉक्टरकडे असलेल्या खुर्चीसारख्या खुर्चीवर बसवण्यात आलं. आपण नक्की सलूनमध्येच आलो आहोत ना याची मला शंका आली. मी आजूबाजूला पाहिले. भिंतीवर बरीच सर्टिफिकेटस् लावली होती. दातांच्या डॉक्टरनं धंदा मंद झाला म्हणून सलून काढली असावी अशी सोईस्कर समजूत करून मी स्वत:ला धीर दिला. सभोवती कोठेही केसाची पुंजकी न दिसल्याने मन साशंक झालं. तशात एक अॅपरन घातलेली मुलगी हातात कात्र्या, सुऱ्या घेऊन आल्यानं नक्की काय कापणार आहेत ते कळेना. मग एक रुबाबदार माणूस आत आला. त्याने केस धुवावयाचे का, कापावयाचे का, सेट करावयाचे का वगैरे बरेच प्रश्न विचारले. मी बावचळून गेलो. फक्त कापावयाचे एवढेच सांगितले. त्यानं सुरवात केली. ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरच्यावर त्याचा थाट होता. डॉक्टरचा आपल्याकडे उत्तम नट होतो तसा तो न्हावी झाला असावा. दोन नर्सेससारख्या दिसणाऱ्या मुली कंगवा, कात्री वगैरे आयुधं घेऊन जय्यत उभ्या होत्या. अर्ध्या तासात केस कापून झाले. लहानपणी न्हाव्याच्या हातात डोकं दिल्यावर जीव मुठीत धरून बसावयाचो, त्याची आठवण झाली. केस कापून झाल्यावर डोक्यावर एकही केस न राहिल्यानं डोळ्यात पाणी येऊन विद्रुप झालेला चेहरा पाहताना वाटायचं तसंच काहीसं केस डोक्यावर असूनही आता वाटत होतं. पुन्हा या भूमीवर केस उतरवायचे नाहीत असं पक्कं ठरवलं व जड अंत:करणाने साठ रुपये मोजून बाहेर पडलो.

अलीकडे हवा चांगली होती. आकाश निरभ्र असे व चांगले ऊन पडत असे. बरेच वेळा आकाशात छोटी छोटी विमानं उडताना दिसायची. माझ्या विल्यम नावाच्या कोलंबियन मित्राला त्यासंबंधी विचारले. त्याने येथे फ्लाईंग क्लब असल्याचे सांगितले. एवढ्याशा लहान गावात फ्लाईंग क्लब असल्याचे ऐकून नवल वाटले.

एका रविवारी आम्ही विमान उडत असल्याचं पाहून फ्लाईंग क्लबवर गेलो. तेथे २० मार्क देऊन अर्धा तास उडावयास मिळत असल्याचं कळलं. तो हौशी लोकांचा खासगी क्लब होता. तीन-चार दोन सीटर विमानं होती. विमानाच्या खालच्या बाजूला एक हुक असे. त्याला लोखंडी तार अडकवायची. ही तार लांबवर असलेल्या लॉरीवरील वाइंडिंग मशीनने गुंडाळली जायची. म्हणजे विमान जोराने खेचले जायचे व हवेत तरंगायला लागायचे. वर गेल्यावर ती तार हुकातून

सुटाव्रयाची व मग वैमानिक विमानाचा ताबा घ्यायचा व हवेत मुक्त संचार करायचा मी वीस मार्क भरून एका विमानात मागच्या सीटवर बसलो पट्टा बांधण्यात आला वैमानिक बसला वरचं प्लॅस्टिकचं कव्हर बंद करण्यात आलं व तार खेचण्यात आली क्षणार्धात आम्ही उंच उडालो तार हुकावून सुटल्याबरोबर विमान धबकन् थोडं खाली आलं पोटात चर्रर्र झालं. पण निमिषार्धात वैमानिकान विमानाचा ताबा घेऊन गोल फेऱ्या मारावयास सुरुवात केली

थोड्याच वेळात एक हजार फूट उंचीवरून उडताना खालची घरं, शेतं, मार्केट, चर्च, स्वीमिंगपुल छान दिसत होतं खूप मजा वाटली वर उडताना वाट-णारी भीती कुठेच पळून गेली होती व आता अर्धा तास संपूच नये असे वाटले मी पन्द्रा वीस मार्क भरले. त्यावेळी रुपयात हिशाब करण्याचं भानच राहिलं नाही.

आता एकच आठवडा बाकी राहिल्यानं सेंटऑफ पार्टीचा धामधूम सुरू होता. असेच एकदा संध्याकाळी माझ्या एका ऑफिसमधल्या जर्मन मित्रानं घरी पार्टीला बोलावले होते तो गावापासून पधरा कि. मी लांब राहत होता. जर्मन माणूस सहसा कोणाला घरी बोलवत नाही पण एकदा बोलावल की त्याचं तो मनापासून स्वागत करतो आमच्याकडे पाहुणे यायचे झाले तर मी 'केव्हाही या, मी घरीच असतो' अशी बिनधास्त ग्वाही देतो. व बिचाऱ्यांना कुलूप पाहून परत जावे लागते. 'काय चहाबिहा घेणार ना ?' अशी 'बहुतेक घेणार नाहीत' अशी खात्री बाळगून मी पृच्छा करतो कदाचित् त्याला बायकोचा स्वभाव कारणीभूत झाला असेल. बायको नेहमी 'दारावरची बेल वाजते कधी व मी चहा देते कधी' अशा पवित्र्यात घरात वावरत असते त्यामुळे घरच्या वातावरणात समतोल राखण्यासाठी आळवा-वरच्या पाण्यासारखी भूमिका मला बजावयास लागते.

तो संध्याकाळी मला घरी न्यावयास आला. मी त्याच्या बायकोला देण्या-साठी फुलांचा गुच्छ विकत घेतला घरी गेल्यावर त्याच्या बायकोने दारात येऊन स्वागत केले बिअरने सुरुवात झाली तो भारतात पूर्वी आलेला असताना त्याने घेतलेले फोटो प्रोजेक्टरवर दाखवले हे फोटो पाहून भारत म्हणजे माशा, झुरळ यांचा देश असल्यासारखे वाटलं या बेट्याने मी पाहिल्या नसतील एवढ्या झोपड-पट्ट्या जवळून पाहिल्या होत्या भिकाऱ्यांचे नाना प्रकार त्याच्या संग्रही होते याची भारतभेट फुकट गेल्यासारखं मला वाटलं माणसाला सौंदर्यदृष्टी नसली तर त्याचं आयुष्य सौदर्यातली घाण शोधण्यातच फुकट जातं, असं मला वाटलं लहान गोडस मुलाचा वागडताना फोटो न घेता त्याच्या तोंडातून गळणाऱ्या लाळेचाच फोटो घ्यावा तसं काहीस मला याने घेतलेले फोटो पाहून वाटलं

एकीकडे झुरळ, माश्यांचे फोटो पाहताना आणि दुसरीकडे सॉसेजेस खाताना पटकन आपण झुरळंच तोंडात टाकत नाही ना अशी शंका येऊन ती झुरळासारखी

दिसणारी सॉसेजेस मी तपासून खायचो फोटो संपले होते जेवणाचा फडशा पाडायचा होता टेबलावर अनेक पदार्थ मांडले होते सुपरमार्केटमध्ये दिसणाऱ्या प्रत्येक पदार्थाने हजेरी लावली होती पण ते काटे-चमचे सुऱ्या या पदार्थांपेक्षा जास्त भयानक असलेल्या आयुधांनी कसरत करताना माझ्या सहनशीलतेचा फडशा पडत होता मी हळूच कोणी बघत नाही असं पाहून हाताने दोन चार पदार्थ घशात कोंबले व वर बिअरचे दोन ग्लास पिऊन ढेकर दिली

आमच्या गप्पा रंगात आल्या होत्या बायकोने केलेल्या पदार्थांची नवरा स्तुती करत होता बायकोने केलेल्या प्रत्येक गोष्टीची या देशात स्तुती केलीच पाहिजे का हे मी पडताळून पहायचे ठरवले आम्ही बायकांविषयी बोलू लागलो भारतातल्या बायकांविषयी मी आपले अनुभव सांगत होतो एवढ्यात त्याची बायको स्वयंपाकघरात गेली बोलता बोलता मी म्हटले की बारीक सारीक गोष्टीने बायका उगाचच डोक्याला त्रास करून घेतात त्याला ते पटले वीस वर्षांपूर्वी मंगळागौरीच्या दिवशी जिन्याच्या तिसऱ्या पायरीवर बसून नणंद मला कशी बोलली, तुमच्या मोठ्या भावाने पंधरा वर्षांपूर्वी आपल्या पप्पूच्या वाढदिवशी माझा कसा अपमान केला वगैरे गोष्टी ऐकवून माझी बायको कशी ओक्साबोक्शी रडते व मग मी तिची कशी समजूत काढतो ह्याचे मी रसभरीत वर्णन केले त्याला ते इतके पटले की गौतमबुद्धाला जसा बोधीवृक्षाखाली साक्षात्कार झाला तसं काहीतरी झाल्यासारखा तो तडक उठला व स्वयंपाकघरात आपल्या बायकोला बोलवावयास गेला बाहेर आल्यावर तिला म्हणाला, " बघ, मी तुला नेहमी सांगतो ना की तुम्ही बायका बारीक सारीक गोष्टींना फाजील महत्त्व देऊन डोक्याला उगाच त्रास करून घेता म्हणून हा दहा हजार किलोमीटरवर राहणारा माणूसपण तेच म्हणतो त्यालाही तसाच अनुभव आहे एकूण जगातल्या बायका सारख्याच ! " त्याचा बायकोची स्तुती करण्याचा बुरखा फाटला मी ठिगळ लावण्याचा प्रयत्न केला. त्याने मला विचारले की असं का व्हावं मी त्याला गंभीर होऊन सांगितलं की माणसाच्या मेंदूत दहा ते वीस हजार ' मेमरी सेल्स ' असतात (खरं खोटं परमेश्वरालाच ठाऊक ! ) पुरुष कामावर जात असल्याने त्यातले बरेचसे सेल्स ऑक्युपाईड असावेत पण बायका घरी रिकामटेकड्या असल्याने या बारीक-सारीक गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी त्यांच्याकडे भरपूर ' सेल ' रिकामे पडलेले असतात त्याला पटले त्याच्या बायकोलाही पटल्यासारखे वाटले तीही बिअर पिण्यात आमच्यापेक्षा फार मागे नसावी रात्री साडेबारा वाजता त्यानं मला सुखरूप घरी आणून सोडलं

बायको यायला आता पंधराच दिवस उरले होते पत्रातून बारीकसारीक तपशील ती विचारत होती व मी कळवीत होतो ' येताना मी सुइदोरा आणू का?', एखादी बाजारात जाण्यासारखी बारकी पिशवी बरोबर घेऊ का ? ' असे अनेक

फालतू प्रश्न तिला भेडसावत होते व मी त्याच्यावर एकाधिकारशाहीने निर्णय देत होतो शिवाय तिकीटावरची वेळ व तारीख तपासून त्याप्रमाणे विमानतळावर जा. नाहीतर ४ तारखेचे विमान म्हणून त्या दिवशी रात्री तेथे जाशील व ते पहाटे केव्हाच निघून गेलेले असेल अशा महत्त्वाच्या सूचना देण्यासही विसरलो नव्हतो तिकीट बरोबर घेऊन विमानतळावर वेळेवर जाण्यापलीकडे जबाबदारीचे काम तिच्यावर नव्हते कारण ती तिच्या चुलत भावजयीबरोबर येणार होती सोबतीने प्रवास करण्याची लागलेली हौस जर्मनीला जातानासुद्धा तिन पुरवून घेतली होती। विमानात ३०,००० फूट उचीवरून उडताना काही होणार नाही ना' याच अभयही तिन माझ्याकडून घेतल होत प्रत्येक निर्णय नवऱ्याने द्यायचा व तो बायकोने पाळायचा हा भारतीय सस्कृतीला अभिप्रेत असलेला सकेत तिन पाळला होता कितीही चुणचुणीत असली तरी लग्नानतर प्रत्येक नवऱ्याला आपली बायको वेंधळी वाटते या नियमानुसार मी सर्व बारीकसारीक अनावश्यक सूचना तिला पत्राने कळवत होतो

या आठवडाअखेर हे गाव सोडायच होत. न कळत या गावावर, येथील माणसावर मी जात असलेल्या ऑफिसवर माझ प्रेम जडल होत गावात सुदर स्वीमिंगपूल होता तेथे मी अनेक वेळा पोहावयास गेलो होतो बाजारातील फोटोग्राफरचे दुकान, –बँकेचा काऊटर, सुपरमार्केटमधले वेगवेगळे स्टॉल्स नेहमी जाऊन चागले परिचयाचे झाले होते गिऱ्हाइकाशी विशेष बोलण्याची पद्धत नसणाऱ्या देशातसुद्धा मी या लोकाशी पाच मिनिट गप्पा मारल्याशिवाय दुकानातून बाहेर पडत नसे सध्याकाळी जवळच्या शेताच्या रस्त्याने फिरायला जाताना ओळखीची लोकं भेटल्यावर दोन गोष्टी बोलून पुढं जायची सवय लागली होती सध्याकाळी हॉटेलात गेल्यावर सर्व्ह करणारी मुलगी नुसते स्मित करून ऑर्डर घ्यायची तेव्हा आपण येथेच लहानाचे मोठे झालो असं वाटायचे

निघायच्या आदल्या दिवशी मी गावाचा बोळ आणि बोळ पालथा घ तला होता पुन्हा येथे यावयास मिळणार नाही या कल्पनेने मनात जेवढ साठवता येईल तेवढ सगळ पुन पुन्हा पाहून घेतल होत जवळच्या रानातली झाड, नी लहानशी सालेनदीसुद्धा मला ओळखत होती माझ्या रोजच्या वाटेवरची ती सफरचदाची, द्राक्षाची, गुलाबाची झाड, बार्लीची शेत पुन्हा दिसणार नाहीत म्हणून मी दुःखी झालो होतो

स्टुर्म फॅमिलीचा निरोप घेताना तर माझा चेहरा रडवला झाला होता धाकटी अंना, तिला आता चॉकलेट हक्कानं मागून घेता येणार नाही, म्हणून हिरमुसली झाली होती. मधल्या अनिताचा रस्त्यावरचा फुटबॉलचा खेळ चेंडूत हवा नसल्यासारखा निर्जीव झाला होता मोठ्या सुसानाचे डोळे पाणावले होते पण मला हे गाव सोडण क्रमप्राप्तच होत. मी दोन महिन्यासाठी इतक्या लांबून आलो

काय, इतक्या थोड्या अवधीत, चालीरीतींत एवढा फरक असताना इतका जवळचा झालो काय, सर्वच जग विचित्र वाटू लागलं माणूस असाच एखाद्या कुटुंबात जन्माला येतो आणि काही दिवसाची जवळीक साधून पुन्हा परत जातो. मी येथे फक्त दोन महिन्यांसाठीच जन्म घेतला होता मी कोठून आलो याचं फक्त कल्पनेनेच ते चित्र उभं करू शकत होते. मी विचार करत होतो इतक्यात कंपनीची गाडी मला न्याव-यास आली मला न्यूरेम्बर्गला जायचे होते

प्रकरण पाचवे

# ट्राममधला मी

न्युरेनबर्गमध्ये मी एका होस्टेलमध्ये राहिलो होतो देशोदेशीचे लोक येथे राहत होते सकाळी ब्रेकफास्ट करताना कधी तो कॅनडियन माणसाबरोबर व्हायचा तर कधी मलेशियन सध्याकाळी भेट क्वचितच व्हायची न्युरेनबर्ग शहर मला खूप आवडायच मी पाहिलेल्या जर्मन शहरांमधल्न ते सर्वांत जिवत शहर असाव आमच होस्टेल कैसरबुर्गच्या जवळच होत तो शहराचा केंद्रबिंदू होता मुबईत जस फोर्ट-मध्ये गेलं नाही, तर मुबई पाहिलीच नाही अस कोणीही म्हणेल तस या बुर्गच होत कदाचित फोर्टपेक्षाही येथे जास्त जिवतपणा होता रात्री अकरा वाजता गाढ झोपी जाणारी जर्मनी येथे हसत, फुलत होती आपल्या प्रेयसीला घेऊन याव, बुर्गच्या उतारावर कुठतरी रेंगाळाव बँडच्या मद तालावर बिअर पिताना बेहोष व्हाव रेस्टॉरटच्या खुल्या जागेत बसून गप्पागोष्टी माराव्यात एखादा पार्टनर शोधून मधू-नच डान्स करावा किंवा बँडच्या तालावर गाण म्हणाव अस रोज चालायच सुरवा-तीला मी त्या वाटेन जायचो तेव्हा 'आज कसला सण आहे' म्हणून चौकशी करा-यचो पण हे रोजचच आहे असं कळल्यावर तेथे दोन मिनिट टेकल्याशिवाय मला पुढे जावेसे वाटत नसे

मी मागे ग्रीनला असताना एक दोन वेळा म्युनिकला गेलो होतो पण ट्राम लाबूनच पाहिली होती ट्यूबरेल्वेविषयी बरच ऐकल होतं पण येथे आल्यावर मला रोजच ट्रामने ऑफिसला जायला लागायच लहानपणी एक आण्याच तिकीट काढून गिरगावातून थेट किंग्ज सर्कलपर्यंत ट्रामन मुबई पाहिल्याचा आनद मी लुटला होता ट्रामच्या घटीचा तो किणकिणणारा आवाज आठवला तरी अजून लहानपणचे दिवस

आठवतात घोडागाडीने ट्रामबरोबर केलेली शर्यत आठवते घोड्याला चाबूक लगावण्यात मिळणारा आनंद आपल्याला मिळत नाही, म्हणून ट्रामचा ड्रायव्हर खट्टू झालेला मी पाहायचो चाबूक मारल्यावर घोडा उधळून भरधाव ट्रामच्या पुढे गेला की तो ड्रायव्हर दात ओठ खाऊन घंटी जोरात बडवण्यापलीकडे काही करता येत नाही म्हणून नाराज झालेला दिसायचा विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्राम-वरचे जाहिरातीचे फलक वाचताना माझ्या डोळ्यांना आणि मानेला भरपूर व्यायाम व्हायचा

तेव्हा प्रवासवर्णन लिहिण्याच सुचल असतं तर 'ट्राममधला मी' अस काही तरी लिहीत सुटलो असतो वाटेत लागणाऱ्या सिनेमा थिएटरांच, हॉटेलांच मी ट्राममधून सूक्ष्म निरीक्षण करायचो म्हणजे गावाला परत गेल्यावर तपशील सांग-ताना घोटाळा होऊ नये प्रत्येक थिएटरमधला शो पाहिला आहे, प्रत्येक हॉटेलच्या पदार्थांची चव घेतली आहे हे आमच्या गावातील पैसेवाल्या काही खट्याळ मुलाना पटवता आल पाहिजे नाहीतर 'हा मुंबईला गेलाच नाही' म्हणून टर उडवतील अशी भीती वाटायची मग एखादा विक्षिप्त मुलगा विचारायचा, 'काय रे, अप्सरा-मधली भेळ खाऊन पाहिलीस का?' त्याला मी लगेच अप्सरात 'दिल्लीचा ठग' पाहिल्याच खोटच सागायचो

मला या उलटतपासणीची लहानपणी खूप भीती वाटायची मी मुंबई पाहिली हे सिद्ध करण्यासाठी ट्रामची सबंध तिकीट, थिएटरबाहेर पडलेली सिनेमाची अर्धी तिकीट, आमच्या गावात न मिळणाऱ्या सिगारेटची रिकामी पाकीट, हे सर्व जमवून ट्रंकेत भरून मी गावाला नेत असे गिरगावातल्या आमच्या चाळीतील पोर केव्हा हॉटेलात गेली तर त्याच बिलसुद्धा मी कटाक्षान मागून घेत असे

माझी ही लहानपणची भीती अजून गेली नव्हती 'तुम्ही न्युरेनबर्गमध्ये जाऊन टीअरगार्डन पाहिली नाहीत?' अस कोणी विचारल तर 'मी जर्मनीलाच गेलो नाही' असा आरोप केल्यासारख मला वाटेल म्हणून मी टीअरगार्डनकडे जाणाऱ्या ट्रामचसुद्धा तिकीट बरोबर ठेवल होत शिवाय ही तिकीट काढण हेसुद्धा ट्रामचा प्रवास करण्याइतकच मजेशीर असे

तिकीटांचे नाना प्रकार मशीनमध्ये पाच मार्क टाकून एक मार्कचे तिकीट काढण्यात मला मोठीच गमत वाटायची एका मार्कच्या तिकीटाबरोबर पाऊस पडल्यासारखी बाकीची चार मार्कची नाणी पडायची एका मार्कात कुठ कुठं जायला मिळत ते हिरव्या, पिवळ्या, तांबड्या रंगाच्या रेषांनी काढलेल्या नकाशात पाहून ठरवायच पाच मार्कचे तिकीट काढले तर चोवीस तास ट्रामने, बसने, ट्यूबने कुठेही भटका, तेही मशीनमध्ये मिळायचे दहा मार्कचे तिकीट काढले तर एक आठवडा निश्चित फिरा. हे तिकीट एखाद्या बुकस्टॉलवर मिळायचे. मी चार दिव-

साल चार निरनिराळ्या प्रकारची तिकीट काढून पाहिली ऑफिस सुटल की ट्राममध्ये बसून गावाच्या या टोकापासून ते त्या टोकापर्यंत फिरायच ' नेक्स्ट हाल्ट स्टेल, हॉपबॉन होफ ' अस अनाऊन्स केल जायच तेव्हा आला रेल्वे स्टेशन आल हे कळायच

ऑफिस सुटल की ट्राम पकडण्याची सर्वांनाच घाई पण रेटारेटी नाही सर्वांना जागा मिळणार ही खात्री असल्यान आणि खिडकीत जागा पकडण्याची हौस भागली असल्यान सर्वजण शिस्तीत आत चढायचे आत गेल्यावर आपल तिकीट मशीनमध्ये पच करायच व जाग्यावर बसायच प्रत्येक हॉल्टची नाव अनाउन्स केल्यावर शहराची ओळख आपोआपच व्हायची ट्रामची दार बससारखीच कळ दाबून बंद होणारी व उघडणारी मुंबईची ट्राम मला आता नीट आठवत नाही पण अलीकडे कलकत्त्याला पाहिलेली ट्राम आठवली आणि अंगावर शहारा आला अरब देशामध्ये म्हणे चोरी केली तर चोराला मध्ये उभा करून दगडाने मारतात तशी या कलकत्त्याच्या ट्रामची अवस्था बिचारी चोराप्रमाणे गावात हिंडते कधी दग- डांचा वर्षाव होईल याचा नेम नाही कोणी ओळखू नये म्हणून चोर जस चेहऱ्याच रूप बदलतात तस प्रत्येक ट्रामच रूप वेगळ मूळ निळा शालू नेसलेली पण दगडांनी ठेचून हिरवी-पिवळी झालेली कधी आगीचे चटके मिळून अंगावरची कातडी गमाव- लेली अशी ती ट्राम गावात फिरावयाची तेव्हा पकडण्यासाठी लोक पाठीस लाग- लेल्या कुलटेसारखी दिसायची

मला त्या ट्राममध्ये बसण्याच धाडस झाल नाही न्युरेनबर्गची ट्राम म्हणजे लचकत मुरडत जाणारी नववधू वाटायची तांबड्या किनारीचा पिवळा शालू नेसून मिरवायची तिच्यात नववधूचा दिमाख होता वाटेत सिग्नल नसला तर ती बाव- रायची मोठमोठ्या वळणांवर ती चपळाईने पुढे जायची हॉल्ट आला तर लाजत लाजत हॉल्टच नाव सांगायची लांबवर जाईपर्यंत मी तिला न्याहाळीत बसायचा पुन्हा तिची काळजी घेणार हक्काच अस एकच माणूस तो नेहमी तिच्यापुढे असा- यचा त्याच्या मागून खाली मान घालून ती थबकत थबकत चालायची पण त्याची नजर तिला कोणी त्रास देत नाही ना म्हणून मागपर्यंत असायची तिच्यात तारुण्या- तील उन्मत्तपणा नव्हता की म्हातारपणाची कुरकुरही नव्हती

ट्यूबची तऱ्हा जरा वेगळी रस्त्यावरून जाताना आपण सरसर जाणाऱ्या सापांच्या बिळावरून चालत जात आहोत अशी शंकासुद्धा यायला नको लक्षात यायच ते रस्त्याच्या कडेला एखाद्या बिळाच्या तोंडाशी आपण उभ असायचो आणि एकदम त्यातून शे-पन्नास माणसे सरकत्या जिन्यान मुंग्यांसारखी बाहेर पडायची तेव्हा रस्त्याच्या खाली एवढं मोठ विश्व असेल यावर सांगूनसुद्धा विश्वास बसणार नाही पुढे पुढे मला या ट्यूबच इतक वेड लागल होत की मी उरलेल्या माझ्या

जर्मनीतल्या वास्तव्यात जमिनीखालूनच अधिक प्रवास केला असेल.

सरकत्या जिन्यावरन खाली गेलं की लक्षात यायच की वरच्या जर्मनीइतकीच रस्त्याच्या खालची जर्मनी गजबजलेली आहे आत मोठी मोठी सुपर मार्केटस् मी आपला विंडो शॉपिंग करायचो बायको आल्यावर किती खरेदी करावी लागेल या विचारान छातीत धडकी भरावयाची व आत जायला धीर व्हायचा नाही तस पाहिल तर टयूब, सुपरमार्केट मला नवीन नव्हती मी ती दोन-तीन वेळा म्युनिकला पाहिली होती पण खरं सांगायच म्हणजे ती एवढी भव्य होती की मला नीट दिसलीच नव्हता

मला वाटत, प्रत्येक भारतीय माणसाच, प्रथम येथे कुठलीही गोष्ट पाहिल्यावर असच होत असाव प्रथम दोन तीन वेळी त्याला ती नीट समजतच नसावी प्रत्येक गोष्ट एवढी भव्य व निराळी वाटते की डोळयासमोर एक प्रकारची झापड येते आपण पाहतो ते खर की खोट याचा आपल्याला सभ्रम पडतो माझ तरी काहीस असच होत होत त्यामुळे टयूबला नीट पाहून घेतल्याशिवाय 'तिची माझी चागली ओळख आहे ' अस सागण्याच धाडस मी केलं नव्हत

माझ्याजवळ आठवडयाचा पास होता ऑफिस सुटल्यावर चार नबरची ट्राम पकडून पटकन चालत्या जिन्याने खाली जाऊन हे टयूबच स्टेशन गाठण्याचा मला नाद लागला होता तिकीटाच्या मशीनशी घडपड करून तिकीट मिळवणाऱ्या नवख्या लोकांपासून मी स्वत ला आता वेगळा समजत होतो. जिन्यावरून चढता, उतरताना नवीन माणसाची होणारी तारांबळ मी आता आपण त्या गावचेच नसल्याच्या भावनेने' पाहू शकत होतो

आकाशात स्वर्ग असतो अस म्हणतात, पण यांचा स्वर्ग पाताळात अवतरला होता जिन्यान खाली गेल्यावर स्वर्गात गेल्यासारख वाटायच सगळीकडे झगमगलेल, दुकानांच्या शोकेसमध्ये राणीच्या अगावर शोभणाऱ्या हिऱ्या-माणक्यापासून ते राजाच्या हातात ऐटीत बसलेल्या बंदूकीपर्यंत सर्व वस्तू मांडलेल्या दुकानाच्या आत आणि बाहेर गोऱ्या गोऱ्या पऱ्यांचे राज्य हा सगळा मोह टाळून मी स्टेशनात शिरून प्लॅटफॉर्मवर यायचो गाडीची वाट पाहणारी माणस सुपरमार्केटच्या नुसतीच अगावरून गेली नसल्याची साक्ष द्यायची त्याच्या हातात 'कारस्टॅट,' 'हर्टी 'सारख्या प्रसिद्ध दुकानांची ओळख सांगणाऱ्या पिशव्या असायच्या रगीबेरगी टाईल्सनी चकाकणारा तेथील परिसर त्या रगीबेरगी पेहेरावाच्या माणसानी अधिकच खुलून दिसायचा

तेवढयात नागाच्या चपळाईने हिरवे, पिवळे रग ल्यालेली गाडी यायची नागाच्या कातीसारखीच तिची काती चकचकीत असायची गाडीनं दार उघडल्याशिवाय कोणी तिच्याशी दोस्ती करायच नाही. सगळी लोक आत चढून दार बद

केल्याशिवाय ती हलायची नाही पुन्हा निमिषार्धात ती बिळातून अंधारात नाहीशी व्हायची अशा दर दोन तीन मिनिटाला या बाजूने किंवा त्या बाजूने छान छान गाड्या यायच्या अशा एक दोन गाड्या प्लॅटफॉर्मवर येऊन गेल्यावरच मी माझी गाडी पकडावयाचो मी गाडीच्या मोहात पडलो होतो तिची वाट बघण्यात, तिला पाठमोर पाहण्यात मी स्वत ला विसरून जायचो गाडीत शिरल्यावर त्या ताबड्या, पिवळ्या खुर्च्यांवर बसताना त्याची शान तर बिघडणार नाही ना अस वाटायच मी आपला कठड्याला टेकून दारापाशीच उभा राहायचो

मला न्युरेनबर्गमधलं 'लॉरेन्सकिर्श' स्टेशन खूप आवडायच मी कोठेही असलो तरी शेवटी त्या स्टेशनवर जाऊन थडकायचो तेथून बाहेर पडल्यावर आपण अशा धुंद वातावरणात येतो की वेळ कसा जातो ते कळतच नाही आपण बाहेर पडलो ते सरळ फुसगेंगर झोनमध्ये यतो मग पायी मुक्त सचार कसल्याही वाहनाची भीती नाही दुतर्फा असलेल्या छोट्या छोट्या खुर्च्यांवर किंवा लाकडी बाकड्यां-वर आरामात बसाव आणि लॉरेन्स किर्श किंवा फ्राऊझेन किर्शच्या निमुळत्या शिखरांकडे टक लावून पाहत बसाव रस्त्याने जाणाऱ्या प्रेमी युगुलांची धुंद मस्ती पहावी किंवा बिअरच्या पेल्यात स्वत ला बुडवाव न्युरेनबर्गमध्ये पुष्कळ पाहण्या-सारख होत पण आता एकटेपणा जाणवत होता. खरं सांगायच म्हणजे न्युरेनबर्ग शहर एकट्याच्या लायकीचे नाही किंवा एकटा जीव या शहराच्या लायकीचा नाही 'एकटा जीव सदाशिव' म्हणणाऱ्यांनी पंढरपूरची वाट सोडून न्युरेनबर्गची वाट धरू नये मी न्युरेनबर्ग पाहून घेतल होत ते अनुभवण्यासाठी बायको येण आवश्यक होत ती चार ऑगस्टला येणार होती

अखेर तो दिवस उजाडला डॉक्टरची बायको डॉक्टरीण, वकिलाची बायको वकिलीण तशी परदेशात येऊन ती काहीतरी 'ईण' होणार म्हणून मी सुखावलो होतो तिला आणण्यासाठी आज फ्रँकफुर्टला जायचे होते मग सकाळची 'येडे स्टुडे' 'येडे क्लासे' जाणारी 'बुडेसबान' मी पकडली होती अडीच तासांत मला ती फ्रँकफुर्टला घेऊन आली होती हे तीनशे किलोमीटरचे अतर तिन माझ्यासाठी येवढ्या थोड्या वेळात तोडले होते

मी फ्रँकफुर्टला बायकोला देण्यासाठी फुलाचा गुच्छ घेतला, चांगले नऊ मार्क दिले पण माझा 'कॅलक्युलेटर' विमानतळावर येण्याच्या आत मी काहीही करायला मोकळा होतो पण आता बधन येणार होती 'अय्या! फुलांना चाळीस रुपये पडले?' 'पण फुलाकरता एवढे पैसे कशाला खर्च करायचे?' 'त्यापेक्षा आपण पप्पूला फॉरीनची चड्डी घेतली असती तर?' अशा हिशोबांना मला तोंड द्यावे लागणार होते मी पैसे फुलांकरता खर्च केले नसून 'तुझ्याकरता' केलेत हे पटवून द्यावे लागणार होते

अखेर एअरइंडियाचे विमान फ्रँकफुर्ट विमानतळावर उतरले विमानातून आलेल्या प्रवाशांच्या दुपटी तिपटीने अधिक लोक लाऊंजमध्ये जमली होती हार-तुरे गुच्छ घेऊन बरीच लोक पुढे सरसावली रेटारेटीची सवय मोडल्यामुळे मी मागेच राहिलो कस्टम कक्षेच्या बाहेर पडणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर निरनिराळे भाव दिसत होते काही सराईत लोक दिल्लीहून मुंबईला आल्यासारखी व सध्याकाळी ऑफिसच काम आटोपून परत जायच्या घाईत असल्यासारखी बाहेर पडत होती काही नवखी लोक आपण कुठल्या जगात आलो अशा भीतीने भांबावून गेली होती काही तरुण माणसं काहीतरी हरवल्यासारखी कुणाला तरी शोधताना दिसत होती

इतक्यात माझी बायको येताना दिसली कोट, गॉगल, छत्री, थंडीचे बूट, डोक्यावरचा रूमाल, पासपोर्ट, तिकीट एअरबॅग येवढ्या वस्तू प्रथमच एकाच वेळी सांभाळाव्या लागत असल्याने तिचा गोंधळ उडाल्याचं स्पष्ट दिसत होत ह्या सगळ्या वस्तूंची काळजी घेताना स्वत:ची काळजी घेण्याच राहून गेल होत मला तिची दया आली माझच चुकल होत जर्मनीमध्ये आता थंडी नाही किंवा पाऊसही नाही हे कळवावयास हव होत म्हणजे अंगावरच्या बऱ्याच वस्तू तिला बॅगेत टाकता आल्या असत्या मी पुढे सरसावलो तिचा बराचसा भार हल्का केला पण येवढ्या गोंधळात फुलाचा गुच्छ तिला द्यायचे राहूनच गेले बायकोचे सामान घेई-पर्यंत तो माझ्या मित्राला धरावयास सांगितला होता शेवटी त्यानेच तो तिला दिला माझे नऊ मार्क फुकट गेले

मी बायकोला विमानतळ दाखवायच ठरवल तळमजल्यावरची सामान नेण्या-आणण्याची जागा दाखवली विमानांच्या जायच्या यायच्या वेळा दाखवणारे इले-क्ट्रॉनिक बोर्डस् दाखवले या पुढील एक दोन महिने मी इथला माहीतगार म्हणून मिरवणार होतो काहीही सांगितले तरी अगबाई कमाल आहे असं त्याच स्वागत होणार होत तळमजल्यावरून पहिल्या मजल्यावर सामानासकट जायच होत आम्ही एक ट्रॉली घेतली ट्रॉलीवर सामान ठेवल ट्रॉली सामानासकट सफाईने नेताना बायको आश्चर्याने माझ्याकडे पाहत होती मी जणू काही बोईंग विमानच सफाईने चालवत आहे अस तिला वाटत असाव

बायकोला चालत्या जिन्यानं सामानासकट वर न्यायच मी ठरवल मागे एकदा कुठल्याशा सिनेमा थिएटरात तिन तो भारतात पाहिला होता तेव्हा त्या जिन्यावरून जाताना 'तळ्यात' 'मळ्यात' अशा उड्या मारून आम्ही वर गेलो होतो पातळ सावरून कसा व्यवस्थित पाय टाकायचा याच तिला मी मार्गदर्शन केल. ट्रॉलीसकट वर जाण्याचं मी प्रात्यक्षिक करणार होतो तिन व्यवस्थित जिन्याच्या पायरीवर उडी घेतली पहिल पाऊल सरळ पडल्याचा आनंद झाला मी ट्रॉली पायरीवर लोटली व स्वत:ला झोकून दिले

...शाखा (स्थळ प्रत)



येथपर्यंत सर्व ठीक झाल पुढे बायको, मागे ट्रॉली व नतर मी असा अग्नि-बाण सुटल्यासारखे आम्ही वर जाऊ लगलो पण वर गेल्यावर कशाततरी काहीतरी अडकले आणि ट्रॉली तेथेच अडकून सामान उडावयास लागले ट्रॉली गचके खाऊ लागली एका माणसाने बायकोला झटकन खेचून घेतले तेवढ्यात एक दोन पिशव्या ट्रॉलीतून बाहेर पडल्या व सरळ गडगडत खाली गेल्या कसाबसा ट्रॉलीला पुढे लोटून मी बाहेर पडलो सामानाची आणि बायकोची नीट जुळवाजुळव करून स्वत ला सावरल 'या ट्रॉलीमध्ये साला काहीतरी डीफेक्ट आहे' अशी बायकोला थाप मारून पुन्हा ट्रॉलीला घेऊन जिन्याची पायरी चढायची नाही अशी मनाशी खूणगाठ बाधली

या पहिल्या मजल्यावर शेकड्यांनी असलेली विमान कपन्याची ऑफिस पाहिल्यावर बायकोने तोंडात बोटच घातलं क्रॉफर्ड मार्केटमध्ये जसे भाजीचे गाळे एकाला एक लागून आहेत तशी ही ऑफिस एकमेकाला चिकटलेली भाजीच्या स्वस्ताईनेच येथे विमानांची तिकीट विकली जात असावीत, अस तिला वाटल आम्ही या मजल्यावर बराचवेळ फेरफटका मारला विमानकपन्याचे सुबक काऊटर, त्यावर बसलेल्या सुदर तरुणी, तिकीटासाठी रांगेत उभे असलेले देशोदेशीचे लोक, सगळच मोहून टाकणार होत या विमानतळाची बाधणीपण इतकी भव्य व सुरेख आहे की फ्रँकफुर्टमध्ये आल्यावर विमानतळ पाहणे हा एक प्रत्येक परदेशी प्रवाशाचा कार्यक्रम असतो

मग आम्ही तिसऱ्या मजल्यावर गेलो येथे सुरेख रेस्टॉरटस्, शोरूमस्, फोटो-ग्राफीची दुकान, रेडिओ, टेपरेकॉर्डरचे स्टॉलस् यांची रेलचेल पाहून बायकोला खरेदीचा मोह आवरत नव्हता पण 'यापेक्षा स्वस्त दरात बाहेर वस्तू मिळतात!' अस सांगितल्यावर तिची समजूत पटली येथे असलेल्या सरकत्या वाटेवर आम्ही मनसोक्त हिंडून घेतले एका भव्य रेस्टॉरटमध्ये बसून विमानांचा टेक ऑफ पाहता पाहता कॉफीचा आस्वाद घेतला दर दोन-तीन मिनिटानी आकाशात उडणारी जेट विमान पाहताना डोळ्यांचे पारण फिटत होत भव्य, दिव्य वगैरे काहीतरी मोठ सांगणारे शब्द येथे थिटे पडत होते आम्ही विमानतळावर असलेल्या कॅनपीवर गेलो तेथून विमान अगदी जवळून पाहता येत होती विमानतळाच्या पार्श्वभूमीवर एकमेकाचे खूप फोटो काढून घेतले विमानतळावरून ट्रेनने फ्रँकफुर्टला आलो व तेथून सध्याकाळी न्यूरेनबर्ग गाठले

गेस्ट हाऊसवर बायकोला 'माहेरपणा' पेक्षा जास्त विश्राती मिळत होती किचनमध्ये कुकिंगरेंजची बटण फिरवण्यापलीकडे काम नव्हत टाईमर ॲडजस्ट करून शिटी झाली की, उकडलेले बटाटे किंवा भाज्या खाली उतरवायच्या व त्यावर मीठ आणि पेपर टाकून 'साहेबाला' जेवायला घालाव मशीनमध्ये एक

मार्क टाकायचा आणि कॉफी किंवा आइस्क्रीमच बटण दाबून 'लंच कोर्स' पुरा करायचा शिवाय सकाळचा ब्रेकफास्ट इतका भरपूर असायचा की, ते खाल्ल्यावर सध्याकाळपर्यंत बायकोला जेवणाची पचाईत नसे ब्रेकफास्टमध्ये कधी आम्लेट तर कधी पोरिज शिवाय जोडीला घ्याल तेवढे ब्रेड, बटर आणि जॅम तियली लोक हे निरनिराळ्या प्रकारचे ब्रेड आणि जॅम कागदात गुडाळून राजरोस बरोबर नेत असत हे पाहून बायकोचा ब्रेकफास्टसकट सबध दिवसाचा प्रश्न सुटला होता बरं, कपडे धुवायचे म्हणजे तरी काय फ्रिजसारख्या दिसणाऱ्या दुसऱ्या एका मशीनची बटण दाबायची

मला वाटल, इथली सर्व लोक मागच्या जन्मी देवाच्या दरबारी कसली तरी बटण दाबण्याच काम करीत असावी त्यामुळे याना या जन्मी बटण दाबून काम करण्याच सुख मिळत असाव रात्री झोपतानासुद्धा टी व्ही ऑफ करायचा तो पडल्या पडल्या त्यासाठी रीमोटकंट्रोलची बटण उशाशी ही बटण ठेवायची आणि ती दाबून हव ते स्टेशन लावायच किंवा घालवायच

रोज ट्राम, बस, ट्यूब यामधून प्रवास चालू होता बायकोला आठवड्याचा पास काढून दिला होता त्यामुळे मी ऑफिसमध्ये गेल्यावर दिवसभर ट्राम बसने फिरण्याची चैन चालू होती एकदा ती अशीच एकटी ट्रामने गेली ती ट्रम शेवटल्या स्टॉपवरून परत न येता सरळ डेपोमध्ये गेली सर्व उतारू उतरून गेले होते ती मागच्या डब्यात बसली होती डब्यात कोणीच नाही व पुढे जाता येण्यासारखे काही दिसत नाही हे पाहून ती घाबरली केजीतल जर्मन येथे उपयोगी पडेल याची तिला खात्री नव्हती तिला घाम फुटला इतक्यात ड्रायव्हरच्या लक्षात आले. तो मागच्या डब्यात आला ती अधिकच घाबरली येथे असलेल स्वैर जीवन तिन जवळून पाहिल होतं त्यामुळे भलभलते विचार तिच्या मनात डोकावले

पण प्रत्यक्षात अनुभव वेगळाच आला त्यान तिची अदबीन विचारपूस केली तिला धीर दिला त्याचे मोडके तोडके इंग्रजी आणि बायकोचे वेडेवाकडे जर्मन याची देवाण-घेवाण झाली. जवळच असलेला दुसऱ्या ट्रामचा स्टॉप त्याने दाखवला, तिला खूप आश्चर्य वाटले एकट्या दुकट्या स्त्रीलासुद्धा येथे भिण्याच कारण नाही, हे आता तिन प्रत्यक्ष अनुभवल होत पुढे पुढे तर या ट्राम आणि बसच्या ड्रायव्हर-विषयी तिच्या मनात विलक्षण आदराची भावना निर्माण झाली होती तान्हुल्या मुलाला बाबागाडीत घालून बसने प्रवास करणाऱ्या जर्मन बायकाना बस थाबवून ड्रायव्हरने बाबागाडी बसमध्ये ठेवल्याच तिन पाहिलं होत

रोज दुपारी आम्ही सुपर मार्केटमध्ये फेरफटका मारायचो मुख्य खरेदी अॅसेनला करायची अस मी तिला सांगितल होत तेथे वस्तू सर्वात अधिक स्वस्त मिळतात अस आम्हाला तिच्या भावजयीन सांगितल होत. आणि हे कारण इथली

खरेदी थोपवून धरण्यासाठी पुरेसं होत रोज एक सुपर मार्केट पालथं घातल तरी वेळ केव्हाच निघून जात असे

तळमजल्यावर साधारणपणे खायचे पदार्थ व घरगुती वस्तू (Household Articals) ठेवलेल्या असत प्रत्येक वस्तू सुरेख वेष्टणात बांधलेली आणि त्याच्या-वर किमतीची लेबलं चिकटवलेली सुपर मार्केटमध्ये काम करणाऱ्या मुलींच काम फक्त वस्तू नीट मांडावयाच्या व त्यांच्यावर मशीनन किमतीची लेबल चिटकवायची दुधाची एखादी पिशवी, जॅमची बाटली, चीजची पाकीट, फ्रूटचा डबा आणि निर-निराळ्या प्रकारची चॉकलेट ही आमची रोजची खरेदी असे

ट्रॉलीत निरनिराळ्या वस्तू टाकायच्या आणि प्रत्येक स्टॉलवर उगाचच भाव पाहत रेंगाळायचे मला येथल दही खूप आवडायच कधी अननस घातलेल, कधी द्राक्ष घातलेल अशा निरनिराळ्या फळांचा स्वाद असलेल सुरेख दही कागदी कपात मिळायच. 'का हो, गहू कसे किलो ?' 'पण निवडलेले की बिन निवडलेले ?' 'एकदम दहा किलो घेतले तर कसे देणार ?' 'रव्याला सुद्धा हे चालतील का ?' वगैरे नाना प्रश्नांच्या फैरींना आपल्याकडील वाण्याला तोंड द्यावे लागते त्यातले येथे काही नाही त्यामुळे वाण्याच्या ऐवजी मीच तावडीत सापडलो होतो 'का हो केळी चार मार्कला एक किलो म्हणजे किती रुपये किलो हो ?' 'जवळ जवळ अठरा रुपये' 'बापरे फारच महाग आहेत' 'एका किलोत किती केळी येतात हो ?' मला केळ्याची आणि किलोची नीट माहिती नसतानासुद्धा निर्णायक मत द्यायला लागायच

'जर्मनीत केळी पिकतात का ?' 'नाही.' 'मग भारतातून येतात का ?' 'नाही' 'आफ्रिकेतून येत असतील' 'मग कच्ची आणून पिकवतात की तयार आणतात' 'माझं कपाळ' (मनात) प्रश्नाचा खूपच त्रास व्हायला लागला की मी सॉसिजेस विभागाकडे स्वारीला न्यायचो तेथे टांगलेली निरनिराळ्या व्यासाची आणि लांबीची सॉसिजेस पाहिली की तिला ब्रह्मांड आठवायच मग त्याचा अमल अर्धा पाऊण तास असायचा आणि तोंड बंद व्हायच सॉसिजेस दोनशे प्रकारची तर ब्रेड तीनशे प्रकारचे पण ब्रेड काय आणि सॉसिजेस काय कितीही प्रकारची असली तरी चवीला सारखीच रोज ब्रेड खाऊन माझी जीभ चरचरीत झाली होती दात हलायला लागले होते

येथे घेतलेल्या वस्तू प्लास्टिक कागदाच्या पिशवीत भरून काऊंटरवर पैसे द्यायचे न चालत्या जिन्यान पहिल्या मजल्यावर यायच तेथे क्रॉकरी, किचन वेअर वगैरेची दालन असायची एअर इंडियान वीस किलोचं बंधन घातल्यान [illegible] खरेदी मर्यादशीर राहिली होती तरीसुद्धा वजनाला हलक्या असतात म्हणून कातऱ्या

घेतल्या घारेला चांगल्या असतात म्हणून सुऱ्या घेतल्या डबे उघडण्याची, कापण्याची निरनिराळी यंत्र घेतली आता डबे कमी आणि यंत्र जास्त अशी अवस्था झाली आहे

त्याच्या वरच्या मजल्यावर कपडे माणसाला कपड्याचा मोह फार एकाच देहावर घालण्यासाठी अनेक कपडे त्यात इंपोर्टेड कपड्यांचा मोह आवरण कठीण मुलासाठी बरेच शर्ट आणि पॅंटस् घेतल्या पण इचातली माप सेंटीमीटरमध्ये मोजताना काहीतरी गोंधळ झाल्याने भारतात आल्यावर कपड्यांसाठी योग्य मुल शोधून त्याची विल्हेवाट लावावी लागली सर्वांत वरच्या मजल्यावर साधारणपणे इलेक्ट्रॉनिक वस्तूंची दुकान असत पाच-पचवीस टी व्ही त एकाच वेळी फुटबॉलची मॅच रंगीत प्रक्षेपणात पहायला मिळायची एकाच वेळी आकाशात पंचवीस चेंडू उडायचे व पंचवीस गोल झालेले पहावयास मिळायचे मी टेपरेकॉर्डर, टीव्ही, कॅमेरे यांच्या किमती आपल्या खिशाला पेलतील का ते पहायची तर बायको कुकिंग रेंज, फ्रीज, ओव्हन या आपल्या स्वयंपाकघरात कशा बसतील याची मोजमाप घ्यायची

कोणतीही वस्तू प्रत्यक्ष घेतल्यानंतर त्याच कौतुक वाटत नाही पण ते घेईपर्यंत त्यासाठी घालवलेले क्षण अधिक सुखावह असतात सरकत्या जिन्यान जाण्याची सोय असूनसुद्धा सगळी दालन पाहताना पाय दुखायला लागायचे प्रत्येक वस्तूच इतकी आकर्षक असायची की त्यातली अधिक चांगली कुठली हे किमतीवरूनच ठरवायच आम्ही न्यूरेनबर्गमधली प्रत्येक सुपरमार्केट पालथी घातली होती

स्पीलझॉइग नावाची टॉय म्युझियम पाहिली फर्केअर्स नावाची ट्रान्सपोर्ट म्युझिअम पाहिली आणि एक दिवस वेळ काढून डॉल्फीन माशाचा खेळ पहावयास टीअरगार्टेन नावाच्या झूमध्ये गेलो. खेळ सुरू व्हायला वेळ होता म्हणून जरा झूमध्ये चक्कर मारली येथील झूमधले प्राणी आणि भारतातील झूमधील प्राण्यात विशेष फरक आढळला नाही थंड हवामानामुळे येथील लोक भराभर चालताना दिसतात, उत्साही वाटतात पण प्राणी मात्र अखेरचे क्षण मोजीत असल्यासारखेच पडले होते जगाचा राजा सिंह लढाई हरल्यासारखा पडला होता बिचारा वाघ जंगलची वाट हरवल्यासारखा फिरत होता अस्वल डोळे असून आंधळ्यासारख बसल होत नाही म्हणायला माकड माणसाची पूर्वज असल्याची साक्ष येथेही देत होती पोरांनी चिडवल्यावर चिडत होती आणि दगड मारल्यावर पळून जात होती

माशाचा खेळ म्हणजे काय असणार याची मला कल्पना येत नव्हती पण तिकिटासाठी झालेली गर्दी पाहून धीर आला सेंट्रल रेल्वे सोडून कोणत्याही गोष्टीची लोकप्रियता मी तेथे होणाऱ्या गर्दीवरूनच ठरवत असे तरीसुद्धा मासा जास्तीत जास्त काय करणार ? पाण्यातून दोन-चार सूर मारून दाखवणार मग त्यासाठी

एवढी गर्दी कशाला असा विचार माझ्या मनात आला. मला काही समजेना पण माझ्या मित्रान 'काही झाल तरी हा खेळ चुकवू नकोस' अस सांगितल होत म्हणून मी धीर सोडला नाही

अखेर थिएटरचे दरवाजे उघडले व आम्ही आत गेलो. तेथे छोटा स्वीमिंग पूल होता प्रेक्षकांना बसण्यासाठी स्टेडिअममध्ये असतात तशा शिड्या होत्या खेळ सुरू झाला रिंगमास्तर बाहेर आला त्याच्या पाठोपाठ सहा फूट लांब काळ्या रंगाचा मासा सुरकन पाण्यातून वर आला व त्याने तोंडात घंटेची दोरी धरून घंटा वाजवली टाळ्यांचा कडकडाट झाला नंतर त्याने इतर माशासमवेत उंच उडी, लांब उडी, समरसॉल्टसारखे कसरतीचे प्रयोग केले मग दोन माशांच्या गटाने बास्केटबॉल खेळला सर्वजण चकित झाले एक माशाने प्रेक्षकांतल्या एका लहान मुलीला बोटीत बसवून फिरवले पुढचा कार्यक्रम आणखीनच आश्चर्यकारक होता माशाने रिंगमास्तरशी चक्क शेकहँड केले एवढेच काय पण त्याने जर्मनमध्ये गाणे-सुद्धा म्हटले टाळ्यांचा कडकडाट झाला मला तर आश्चर्याचा धक्काच बसला मासासुद्धा जर्मन बोलतो यावर विश्वास बसण कठीण होत.

--*--

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ६६३ ...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

प्रकरण सहावे

# फुसगेंगर झोन

न्युरेनबर्ग सोडताना वाईट वाटत होत फ्राऊअेन किर्शच्या समोरच्या कारज्या-वर असलेल्या पितळी कड्याना आम्ही पुनः पुन्हा हात लावायचो तस केल की हात लावू तेवढ्या वेळा न्युरेनबर्गला परत यायला मिळत असा येथील समज आहे उन्युरेनबर्गहून आम्ही म्युनिकला आलो. म्युनिकला सुद्धा एका गेस्ट हाऊसमध्ये तरलो होतो म्युनिक पुण्यासारख वाटल फक्त पुण्याचे बोळ काढून टाकायचे आणि रिक्षांना रजा द्यायची - पुण्यासारखच हे संस्कृतीच केन्द्र विद्येच माहेरघर शहरसुद्धा पुनं पुन्हा आवस वाटणार थंडीसुद्धा पुण्यासारखी बोचरी घराचे नवर सुद्धा पुण्यासारखे ७२२ सदाशिवच्या शेजारी ५७० शुक्रवार एअर इंडियाच ऑफिस शोधताना आमच्या नाकी नऊ आले बर पुण्यासारखी पत्ता सांगणारी माणस येथे नाहीत ' ह्यो जरा म्होरं जावा आणि दांडग्या विठोबाच्या नाकासमोर उभ रहावा, लगेच गावहृताय तुम्हाला म्हशोचा बोळ, तेथ विचारा न्हाई सापडल तर यावा म्हाघारी मी हायच बसलेलो ' ' तू बसलेला कशाला ? जरा चालत पुढे आलास तर बिघडेल ' (मी-मनात चडफडायचो )

एक दिवस आम्ही एका इटालियन बाईच्या गाण्याला गेलो होतो गाण काँग्रेसहॉल नावाच्या भव्य हॉलमध्ये होतं नाटक गाण्याला जशी नीटनेटकी माणस येतात तशी उची कपडे घालून माणस आली होती बायकांचा भरणा त्यात अधिक होता हॉलबाहेर हाऊसफुलची पाटी झळकली होती कोणत्याही हाऊसफुल शोची तिकिट हातात असली की त्या शोला जाण्यात काही वेगळीच मजा असते तिकीटा-साठी धडपडणाऱ्या लोकाच्या अगावरून जाताना त्यांच्या डोळ्यांपुढे आपली

तिकिट नाचवत हॉलमध्ये शिरण्यात काही वेगळीच गमत असते त्यात मी पर-देशीय पडल्यामुळे माझ्या हातातल्या तिकीटाना वेगळाच भाव आला होता आम्ही हॉलमध्ये शिरलो व नबरप्रमाणे खुर्चीवर बसलो हॉल षण्मुखानद हॉलपेक्षा थोडा मोठा होता जुन्याकाळी बांधला असल्यामुळे दोन्ही बाजूला बसण्यासाठी गॅलरी होती हॉलचे छत खूप उच होते त्यात चांदण्यासारखे लहानलहान दिवे होते

गाणे सुरू झाले गाणारी बाई रुना लैलासारखी होती तिच्यासारखीच उभे राहून हातवारे करून गाणे म्हणत होती तिच्यावर प्रकाशाचा झोत टाकलेला होता त्याचा रग कधी हिरवा तर कधी निळा असा वरचेवर बदलायचा तिने घातलेला पेहराव त्यात उठून दिसायचा प्रत्येक गाण झाल की टाळ्याचा प्रचड कडकडाट व्हायचा ती आत जायची व टाळ्या थांबत नाहीत म्हणून अभिवादन करावयास पुन्हा बाहेर यायची अगदी म्हाताऱ्या बायकासुद्धा टाळ्या वाजवण्यात मागे पडत नव्हत्या. गाताना मध्येच ती आवाज खूप उच न्यायची व मधेच खूप खाली आणायची मला भीमसेन जोशी किंवा कुमार गधर्व यांची आठवण यायची गाण्यातले विशेष मला कळत नाही तशात ही इटालियनबाई जर्मन आणि इग्लिश भाषेतली गाणी म्हणत होती त्यात स्वरांचा उचसखलपणा मी टाळ्यांच्या तीव्रते-वरून गाण्याची गोडी ठरवायचो

तीन तास कार्यक्रम चालू होता टाळ्या वाजवून माझे हात दुखू लागले होते प्रत्येक गाण्याला तीनचार वेळा टाळ्या वाजवायला लागायच्या एकदा गाणे झाले म्हणून आणि दोन तीन वेळा ती आत गेलेली बाई बाहेर यावी म्हणून. गाणाऱ्या माणसाने दरवेळी पडद्याआड जाऊन नवीन कपडे घालून टाळ्या घेण्या-साठी बाहेर येण्याची ही पद्धत मला नवीन होती गाणारा माणूस एकदा बैठ-कीला बसला की तो उठलेला मी पाहिला नव्हता गाणे जवळजवळ एक वाजेपर्यंत चालले

दुसऱ्या दिवशी आम्ही ' डॉयशे म्युझियम ' ही जगातली सर्वांत मोठी सायन्स म्युझियम पहावयास गेलो या म्युझियममध्ये अनेक दालन होती सगळी पाहण व समजणही अशक्य होत म्हणून आम्ही चारच दालन पहायच ठरवलं सर्वांत खालच्या मजल्यावर नौकानयन विभाग होता त्यात एक प्रचड बोटच ठेवली होती तिची इजिनरूम इतकी प्रचड होती की त्यात आपल्याकडची एखादी छोटीशी म्युझियम बसावी बोटीच्या इजिनांचे निरनिराळे प्रकार होते काही ठिकाणी प्रत्यक्ष इजिन कस चालत, दे दाखवल जात होत बोटीबाहेर समुद्राचा देखावा केला होता त्यामुळे आपण प्रत्यक्ष बोटीतच बसल्याचा भास होत होता आतापर्यंत मी बगदादी, गुलछडी, सदाफुली अशा बोटीतून रेवसला गेलो होतो त्यामुळे बोटीत बसायची बाकडी आणि जात फिरवतात तशी मूठ असलेलं कप्ता-

माझ्या हातातलं एक चाक याव्यतिरिक्त बोटीच्या अंतरंगाची नीट कल्पना नव्हती या बोटीमध्ये चक्क हॉटेलमध्ये असतात अशा राहायच्या खोल्या होत्या ह्याच दालनात एक प्रचंड सबमरीन ठेवली होती त्यातून बाहेर पडणाऱ्या तोफेचा गोळा आपल्याकडे रायगडावर ठेवलेल्या प्रत्यक्ष तोफेपेक्षाही मोठा होता शिवाय कोलंबसच्या वेळच्या बोटीपासून ते अत्याधुनिक बोटीपर्यंत सर्वांची छोटी छोटी मॉडेल्स ठेवली होती

या बोटींच्या दालनाशेजारी मोटारीचे दालन होते त्यात १८८६ सालची बेंझ मोटार होती फोर्ड, फोक्सवॅगनची मॉडेल्स होती १९०४ सालचं पिपॉटच मॉडेल होतं तर १९२५ सालचं लान्सियाचं मॉडेल होतं शिवाय रेसलकार्सही होत्या. त्यात ताशी ४०० कि मी वेगाने पळणारी मर्सीडीज होती

गेल्या शंभर वर्षांत बदललेलं मोटारींचं रूप पाहून अचंबा वाटला गेल्या शंभर वर्षांत बैलगाडी बैलगाडीच राहिली, टांगा टांगाच राहिला, पण बग्गीची मोटार झालेली मी डॉयशे म्युझियममध्ये पाहिली नाही म्हणायला अलीकडे बंगलोरला बैलगाडीवर संशोधन होत असल्याचं पेपरात कुठतरी वाचलं होतं मी प्रत्येक मोटारीला हात लावून पाहत होतो कदाचित् या मोटारीतून त्यावेळच्या एखादा लुडविग राजा आपल्या राणीला घेऊन सफर करीत असेल युद्धात विजय मिळाल्याची बातमी एखाद्या सरदाराने त्याच्या राजाला येऊन सांगितली असेल मी माझ्या राणीला घेऊन उगाचच राजासारखा त्या बग्गीवजा मोटारीत बसलो मला शंभर वर्षं मागे गेल्यासारखं वाटले

नंतर आम्ही रेल्वेचं दालन पाहिलं स्वित्झरलंडसारख्या डोंगराळ प्रदेशात चढणारी रेल्वे इंजिन पाहिली मुलांसाठी केलेल्या टॉयट्रेनभोवती मोठी माणससुद्धा जमा झालेली पाहिली त्याच्यावरती विमानाचं दालन होतं या शतकाच्या सुरुवातीला हवेवर पतंगासारख्या उडणाऱ्या विमानापासून ते आधुनिक जेट विमानापर्यंत सर्व प्रकार होते लहान मुलांनी रेघोट्या मारून चित्र काढावीत तशी विमानांची सुरवातीची अवस्था होती नंतर त्यात सुधारणा होऊन एखाद्या कसलेल्या चित्रकाराने सुबक चित्र काढावं तसं आधुनिक विमान दिसत होतं त्याची आधुनिकता त्याच्या जवळ असलेल्या प्रथमावस्थेतल्या प्रतिकृतीमुळे अधिकच मनात भरत होती येथे असलेल्या प्रत्येक वस्तूमध्ये ते प्रकर्षाने दिसत होते प्रत्येक वस्तू गेल्या पन्नास-साठ वर्षांमध्ये अधिकाधिक परिपूर्ण झाली होती बोटी, विमान, मोटारी यांची सर्वांत जुनी आणि सर्वांत आधुनिक अशी खरी मॉडेल्स एकत्र पाहण्याची ही संधी अपूर्व होती एका नजरेमध्ये गेल्या शेपन्नास वर्षांतील प्रगती पाहता येत होती

मी कारखान्यामधे सुद्धा हेच पाहिलं होतं प्रत्येक विभागाचं वर्णन करताना

तेथील प्रमुख सांगायचा की तीस वर्षांपूर्वी हेच काम करावयास दहा मशीन्स लागत असत, मग त्यात सुधारणा करून पाच मशीन्स ते काम करू लागली आता तर एकच मशीन ते काम अर्ध्यावेळात करते प्रत्येक गोष्ट अधिकाधिक कार्यक्षम आणि परिपूर्ण करण्याची या माणसाची जिद्द पाहण्यासारखी होती

हे सर्व पाहण्यात एक दिवस केव्हा गेला ते कळलेच नाही शेवटल्या तासात म्युझिकल इन्स्ट्रुमेंट्स्, स्थापत्यशास्त्र अशा निरनिराळ्या विषयावरच्या दालनांत नुसता फेरफटका मारला 'अमूक अमूक दालन पाहिल का ?' अस कोणी विचारल, तर त्याच उत्तर 'होय' देता याव एवढी खबरदारी घेतली.

जर्मनीमधली सर्वात मोठी सुपरमार्केट म्युनिकमध्ये असल्याचे ऐकले होते ती प्रत्यक्ष पाहिल्यावर डोळ्याचे पारणे फिटले माझी वैयक्तिक खरेदी मी येथेच करून टाकली मरियन प्लाट्झ्वरून ओडियन प्लाट्झ् ते मॅक्सिमीलियन प्लाट्झ् अशी चक्कर मारली की जीवनाचं सार्थक झाल्यासारख वाटायच दुकानाच्या शोकेससमोर उभ राहून प्रत्येक वस्तू न्याहाळत बसायची दोघाना एवढी सवय लागली होती की कोणी कोणाला 'आता पुरे' सागायचे हा प्रश्न पडायचा

मी कॅमेरे, प्रोजेक्टरची निरनिराळी मॉडेल्स पाहण्यात दग असायचा तर बायको कपडे, सौंदर्यप्रसाधन यांच्यावर नजर खिळवून उभी रहायची शिवाय एकदा फुसगेंगर झोनमध्ये फिरल की सगळ वातावरण नुसत फुलून गेल्यासारख वाटायच प्रत्येकाच्या डोळ्यात पुढील पाच वर्षांच्या खरेदीची स्वप्न दिसायची.

मला वाटत, येथे असे अनेक प्रवासी आले असतील की ज्यानी कल्पनेने अनेक वेळा आपली सीटिंगरूम येथल्या फर्निचरने सजवली असेल येथे असलेली खरी-खुरी किचनची मॉडेल्स आपल्या स्वयपाकघरात नेऊन बसवून पाहिली असतील मला स्वत'ला सावरण आवश्यक होत खरेदीचा सर्वात मोठा शत्रू—हलका खिसा— माझा जिगरी दोस्त बनला होता मी बायकोचे लक्ष लावून मोहक फुलाच्या दिसणाऱ्या ताटव्याकडे वेधले दर पधरावीस पावलावर सिमिटाच्या पटकोनी मोठ्या कुड्यात फुले डोलत होती एका रस्त्याला किती कुड्या आहेत ते मोजण्याचा बहाणा करून तेथून काढता पाय घेतला

मला ऑलपिया स्टेडिअम पहायच होते 'पण स्टेडिअममध्ये काय पहायचय ?' 'आमच्या पुण्याला कितीतरी आहेत 'हौदाची तालीम' 'तालमीचा हौद' 'झालच तर एस्पीच मोठ ग्राऊंड' अशी तिन बरीच नाव घेतली टीव्हीवर वान-खेडे स्टेडियम पाहिल असल्यामुळे मैदानावर पुजवयाने उभ रहायच्या ऐवजी गोल फेरी धरून शिड्यावर बसावयाचे इतकाच फरक' तिन शेरा मारला मलाही स्टेडिअममधल विशेष कळत होतं अस नाही पण या खरेदीच्या चक्रव्यूहातून सुटका करून घ्यायची होती त्यासाठी स्टेडिअमचा बाण फेकून पाहणार होतो 'इथले

स्टेडिअम म्हणजे पुण्यासारखे नाही त्यात सर्कस आहे, पाळणे आहेत, मिठाईचे स्टॉल्ससुद्धा आहेत ' वगैरे खोटच सांगून समजूत काढली मरीअन प्लाटझ्मधून ऊ–बान (U–Bahn) घेतली आणि ऑलेपिया स्टेडिअमला आलो स्टेशनबाहेर पडतो तो माणसांची रीघ लागली होती तेथे माणसांची जत्रा असणार याची खात्री पटली बायकोला हुरूप आला बरीच माणस जात आहेत म्हणजे आपण गेलच पाहिजे हे तिच साध गणित होत

तेथे पोचलो तर खरोखरीच एक अतिभव्य पाळणा होता त्यातून ६०० फूट उचीच्या टॉवरवर जायचे एका वेळी तीस–चाळीस माणस विमानाच्या वेगान वर जात होती आम्ही केवढ्यात टॉवरवर गेलो तेथून लांबवर पसरलेल्या म्युनिकचा सुरेख देखावा दिसत होता दोन डोम असलेली फाऊएन किर्श, समोरच म्युनिक स्टेशन, तीन अर्धवर्तुळानी बनलेली 'बीएम्वे' ची उच इमारत, पलीकडे खेळाडूना राहण्यासाठी बाधलेल्या सिडकोसारख्या वसाहती आणि सर्वात मोहक दिसणार आटोबानच जाळ शिवाय टॉवरच्या खाली पाहिल की स्टेडियमचा भव्य परिसर दिसायचा ऑलेंपिया स्टेडिअम म्हणजे छोटी छोटी भावड असलेल मोठ स्टेडिअम मोठ्या स्टेडिअममध्ये फुटबॉलची मैदान, धावण्याचे ट्रॅक्स, तर लहान लहान स्टेडिअममध्ये स्वीमिंग पूल, टेनिस कोर्टस् शिवाय सभोवती छोटस सरोवर स्टेडिअमला चक्कर मारण्यासाठी छोटी ट्रॉयट्रेन स्टेडिअमच छत विशिष्ट पारदर्शक पदार्थाच बनवलेल त्यातून उजेडही येणार आणि पाऊस-बर्फापासून संरक्षणही मिळणार. खेळाडूसाठी बाधलेली घर आता सामान्य लोकाना विकलेली घर विकत घेतल्यावर एखादा म्हणणार, या घरात आमच्या देशाला सुवर्णपदक मिळवून देणारा अमुक अमूक जलतरणपटू राहत होता तर दुसरा म्हणणार, माझ्या घरात अमूक अमूक मुष्टीयोद्धा राहत होता केवढी खेळाविषयी आवड व देशा-विषयी प्रेम म्युनिकला येऊन ऑलपिया स्टेडिअम पाहिल नाही तर आळदीला जाऊन ज्ञानोबाच दर्शन न घेतल्यासारख होईल न कळत मी त्या स्टेडिअमला नम-स्कार केला अस एखाद स्टेडिअम आणि असे बरेच खेळाडू आमच्या देशाला दे ' अशी देवाजवळ प्रार्थना केली

म्युनिकच लोभस सौंदर्य मी पुन पुन्हा पाहून घेतल 'हर्टी', 'से उण्ड हा'मध्ये कारण नसताना पुन्हा एक चक्कर टाकली 'फुसगेंगर झोन'मधल्या फुलांच्या कुड्यांजवळ जरा रेंगाळलो आणि फ्रँकफुर्टची गाडी पकडली दूरवर जाईपर्यंत फ्राऊएन किर्शची दोन डोम दिसत होती •

फ्रँकफुर्टला आम्ही पालमनहोफ हॉटेलमध्ये राहिलो होतो हे हॉटेल पालमन-होफ गार्डनजवळ आहे ही पालमनहोफ गार्डन म्हणजे एक जबरदस्त काम आहे पूर्वी ग्लास हाऊस फार्मिंग पाहिल होत. तशी ही ग्लासहाऊसमधली बाग होती

जगामध्ये देशोदेशी होणाऱ्या वनस्पती येथे आणून लावल्या होत्या त्यासाठी प्रत्येक ग्लासहाऊसमध्ये वेगवेगळ तपमान ठेवल होत झाड इतकी हिरवीगार आणि तरारलेली होती की अस वाटाव की त्या त्या देशाच्या जगलातच वाढली आहेत दुसऱ्या दिवशी एका टूरिस्ट बसने गावात फेरफटका मारला गोयथेच घर पाहिल रत्नागिरीला गेल्यावर टिळकांच घर पहाव आणि ते कुठली पगडी घालत होते, कोणत्या खुटीवर ठेवत होते त्याची आस्थापूर्वक माहिती मिळवावी त्याच भावनेन प्रत्येक जण गोयथेच लिहायच टेबल, त्याची बसावयाची खोली आस्थापूर्वक पाहत होते बसमधून जाताना 'येथे ३०० बँका आहेत, २०० ब्रेडचे प्रकार होतात' वगैरे ठोकळ माहिती गाईड देत होता

परवाच कुणीतरी ठाण्याची माहिती सांगताना सांगत होते की येथे ५० हॉटेल आहेत १०० पावभाजीच्या गाड्या आहेत आणि पोट बिघडल्यावर उपचार करण्यासाठी ४०० डॉक्टर्स आहेत गाईडने दिलेल्या फ्रँकफुर्टबद्दलच्या माहितीचा मेळ मला बसवता येत नव्हता थोडासा विचार केल्यावर वाटले की २०० प्रकारच्या ब्रेडमुळे ३०० प्रकारच्या बँकांना दिवस बरे आले असतील मला या गाईड लोकाच खूप कौतुक वाटत त्याना ठाण्यासारख्या ठिकाणी नेऊन सोडल तर ठाण्याच्या तळ्याच ते इतक आकर्षक वर्णन करतील की आपण काश्मीरच्या दाल सरोवरावर विहार करतो की काय अस वाटाव वास्तविक फ्रँकफुर्टची घर मला पुण्या-मुबईपेक्षा फार वेगळी वाटली नाही स्टेशनच नाव जर फ्रँकफुर्ट नसत तर मी ते बॉम्बे सेंट्रल स्टेशन समजून आत गेलो असतो माईन्स नदीवर जाताना तर चक्क शनिवार पेठेतल्या बोळातून मुठेवर गेल्यासारख वाटाव तसेच चिचोळे बोळ आणि दगडी पायवाटा

आता एसेनला जावयाचे होते पुन्हा ऱ्हाईन नदीच्या खोऱ्यातून प्रवास पुन्हा बॉन, क्योल्न वगैरे शहर वाटेत लागणार नुसत्या कल्पनेनी मन उल्हसित होत असे डोर्स्टेनला चार दिवस मुक्काम होता आता खरेदी करायची होती चार छत्र्या विकत घेण्यासाठी चारशे छत्र्या उघडून पहायच्या होत्या. दोन गॉगल पसंत करण्यासाठी दोनशे नमुने आरशात पहावयाचे होते पप्पूच्या एका कपासपेटीसाठी चाळीस इस्केलेटर पायाखालून जाणार होते बायकोचा उत्साह क्षणाक्षणाला वाढत होता अखेर आम्ही खरेदीच्या मोहिमेवर निघालो

बरोबर भरपूर शिबंदी घेतली भावजयीने आघाडीची बाजू सभाळली बायकोने पहिली तोफ डागली "एकदम पाच छत्र्या घेतल्या तर किती कन्सेशन देणार?" शत्रूपक्षात गोंधळ उडाला अशा प्रकारचा हल्ला पूर्वी कधी झाला नसावा सैन्याची जमवाजमव झाली हल्ल्याला कसे तोंड द्यावे याविषयी खलबते झाली "कन्सेशन देण्याची पद्धत नाही" शत्रूपक्षाकडून प्रत्युत्तर आले पुन्हा मोर्चे बाधले.

भावजयीन सूत्र आपल्या हातात घेतली ' ह्या छत्र्या भारतात नेण्यासाठी घ्यायच्या आहेत " " त्या जर्मन राजदूताप्रमाणे दोन्ही देशात सलोखा वाढवण्याच काम करणार आहेत " " तेव्हा जेवढी किंमत कमी तेवढी देशाची प्रतिष्ठा वाढणार आहे " घाव वर्मी बसला ही मोहीम यशस्वी झाली शत्रूपक्षाने तहाची बोलणी सुरू केली १० मार्कची खडणी वसूल केली आणि दुसऱ्या मोहिमेवर कूच केले पुढे निकराची लढाई झाली सुयांपासून शिवणाच्या छोटया मशीनपर्यंत सर्व ठाणी काबीज केली मुलाची खेळणी, कपडे, पर्सेस, फोल्डिंग बॅगा यांची रेलचेल झाली अर्थव्यवस्थेवर आता ताण पडू लागला युद्ध थाबवण आता शहाणपणाच होत सध्याकाळही झाली होती विजयश्री खेचून आणल्याच्या बेहोषीत आम्ही घरी परतलो होतो

रात्री सामानाची आवराआवर झाली कोणाला काय भेट द्यायची याची बरीच चर्चा झाली ज्याच त्याच नाव ज्याच्या त्याच्या वस्तूवर लिहिल गेल खरेदी करण्याइतकच हे काम अवघड होत माझ्या मते सर्वांना एकाच प्रकारची वस्तू दिली असती तर मान-अपमान, उणे-अधिक, आवड-तीनावडती, ज्येष्ठ—कनिष्ठ, माहेरची-सासरची, नणदेची-भावजयीची वगैरे भेदभाव झाला नसता शिवाय खरेदी पटकन आणि वितरण सोपे झाले असते पण माझी ही कल्पना कोणीच केव्हाही उचलून धरलेली नव्हती पप्पूच्या मुंजीतसुद्धा सर्वांना एक एक स्टेनलेसची वाटी देण्याची कल्पना मी पुढे केली होती, पण सर्वांच्या दृष्टीने ती इतकी अव्यवहार्य होती की, सर्वांना काय पण एकालासुद्धा वाटी द्यायची नाही असा सर्वांनी माझ्याविरुद्ध कट केला होता

तसे काही होऊ नये म्हणून मी मनात असूनही या कल्पनेचा उच्चार यावेळी केला नव्हता चार छत्र्यांच्या खरेदीत वेळ गेला नाही, तेवढा वेळ त्या कोणाला द्यायच्या हे ठरवण्यात गेला जवळजवळ सर्व सासरमाहेरच्या नातेवाईक बायकाच्या डोक्यावर या छत्र्या अशा दिसतील याची चर्चा झाली पर्सेसचे रग आणि कोणत्या बाईला कोणता रग शोभून दिसेल याचा ताळेबद आखला गेला मी जरूर नसताना म्हटले, "कमलाबाईंचा रग सावळा आहे म्हणून त्यांना मोरपिशी रगाची पर्स शोभून दिसेल " आणि बायकोचा पारा चढला "कमलाबाई माझ्या माहेरच्या आहेत, म्हणून तुम्हाला त्या सावळ्या दिसतात काय " माझी अवस्था पहिल्या ओव्हरमध्ये त्रिफळा उडालेल्या फलदाजासारखी झाली मी पॅव्हीलियनमध्ये बसून खेळ पाहणे पसत केले. कोणाच्या नावावर कात्र्या लिहिल्या गेल्या कोणाच्या वाट्याला सुऱ्या आल्या कोणाला नाण्यावर भागवावे लागले तर कोणाची बोळवण सुयांच्या पाकीटावर झाली

दुसऱ्या दिवशी जर्मनी सोडायची होती आम्हाला लडनला जायचे होते

गेल्या चार-पाच महिन्याच्या वास्तव्यामुळे इथली भाषा, ती बोलणारी लोक, त्यांनी वसवलेली गाव ही इतकी जवळची वाटत होती की त्यांना सोडून जाणं ही कल्पना सुद्धा अवघड होती गुडमॉर्निंगपेक्षा 'मॉर्गन मला जवळच वाटू लागल होत 'डाक-बिट' सोडून आत। थँकयू प्लीज' म्हणून टीव्हीतल्या बातम्या सांगणाऱ्यासारख हुशाव लागणारं होत ऑफिसमधून घरी जाताना गुडनाईट म्हणण्यापेक्षा 'चुस किंवा 'बिसमॉर्गेन' म्हणायला मला अधिक आवडत असे तस लडनविषयी मला खूप आकर्षण होत लहानपणी विलायतेला गेलेला माणूस म्हणजे देवापेक्षाही मोठा वाटायचा. असा एखादा आमच्या गावाला आला तर त्याच्या पायाला स्पर्श करण्यातही आम्ही 'देव पावला' अस वाटून घ्यायचो लडनची थेम्स नदी गगेपेक्षाही पवित्र वाटायची या साहेबाचा पगडा आमच्या मनावर एवढा होता, की इग्रजी दोन वाक्य धड येत नसताना आईशी आम्ही साहेबी थाटाचे इग्रजी बोलायचो आणि अभ्यास किंवा घरातले काम चुकवायचो

" काय रे, तेवढे दळण आणतोस का ?"

" नो आय एम बीझी "

" अरे, मग तुला जेवायला कस वाढू ?"

' आय डोन्ट केअर "

" अरे, अस काय करतोस ? आबा रागावतील मा ?"

" गो टू हेल " इथपर्यंत मजल जायची

इतक्यात आबा घरी यायचे " काय रे चम्या ' येवढे म्हणण्याच्या आतच दळण आणण्यासाठी स्वारी मागच्या दाराने धूम ठोकायची लहानपणी आमचा साहेबी थाट जसा चुलीजवळ चालायचा तसा मोठेपणी कधीकधी साहेबी कपडे घालून हाऊ डू यू डू म्हणण्यापलीकडे साहेब ही चीज जवळून पहावयास मिळाली नव्हती

आता प्रत्यक्ष लंडन पहावयास मिळणार म्हणून उत्साह होता पण हे आजीच्या मायेच जर्मनी सोडताना विलक्षण दु:ख वाटत होत. कदाचित दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी झालेली हत्या पाहून याची मन मुशीत घातलेल्या सोन्यासारखी मऊ झाली असावीत या युद्धाच्या वणव्यामध्ये त्याचे सगळे विकार जळून खाक झाले असावेत आणि शिल्लक राहिले ते शंभर नबरी सोन, वागण्यात शिस्त आहे पण ताठरपणा नाही बोलण्यात मोजकेपणा आहे, पण आढ्यता नाही चालण्यात डौल आहे, पण दिमाख नाही कामात कसब आहे, पण चुरस नाही वृत्ती रगेल आहे, पण वासनेचा अतिरेक नाही मद्याची आवड आहे, पण धुंदी नाही नाचगाण्याचा थाट आहे पण नाचरेपणा नाही पैशाची हाव आहे, पण हव्यास नाही राहणीत

आधुनिकता आहे, पण अधुनिकतेबरोबर येणारी संकुचित वृत्ती नाही हे सगळं असच रहाव असं मनोमन वाटायच, पण नवीन पिढीकडे पाहिले की काही वेळा मन साशंक व्हायच नवीन पिढीचा उच्छृंखलपणा कधीकधी रस्त्यावर दिसायचा नवख्या माणसाची टवाळी करण्यात कधीकधी ती मशगूल असायची रस्त्यावरचे वर्तमान-पत्र पैसे न टाकताच घेण्यात धन्यता मानायची.

प्रकरण सहावे–अ

# काही उणे, बरेच अधिक

मी जर्मनीत असताना दर आठवड्याला घरी पत्र पाठवत असे आणि दर आठवड्याला घरून पत्र यावे अशी अपेक्षाही करीत असे दरवेळी मला काहीतरी नवीन विषय मिळायचा आणि मी लिहीत सुटायचो. इथली खेडी, शहर, रेल्वे, सुपरमार्केट, लोक अशी प्रत्येक गोष्ट मला वेगळी आणि कुतुहल उत्पन्न करणारी वाटायची आता चार महिने झाले होते आणि मी येथील जीवनाशी इतका समरस झालो होतो की कोणत्याही विषयावर लिहिताना मला विशेष त्रास पडत नसे किंवा मुद्दाम होऊन माहिती गोळा करावी लागत नसे मी अखड माहिती पुरवत होतो पण घरून येणाऱ्या पत्रांत राजकीय, सामाजिक, आर्थिक समस्यांवर एकही वाक्य नाही म्हणून मनात नाराज होत असे बरेच दिवसात मराठी तर सोडाच पण इंग्रजी वर्तमानपत्रही पहावयास मिळाले नव्हते

वास्तविक पाहता घरून येणाऱ्या पत्रांत 'आजीची तब्बेत आता बरी आहे' 'पप्पू अभ्यासाची टगळमंगळ करतो', 'आपला टीव्ही बिघडला आहे' (हे सांगण्याची वेळ आमच्यावर वरचेवर येते), 'गावस्करच्या दुसऱ्या इनिंगलासुद्धा बोऱ्या वाजला', 'शेजारच्या चाळीतील गोरेमामीचे काळे काकूशी कडाक्याचे भांडण झाले' वगैरे सामाजिक घडामोडीचे वरचेवर उल्लेख असायचे पण तेवढ्याने समाधान होत नसे राजकीय किंवा सामाजिक घडामोडीची भारतात असताना जेवढी फिकीर नव्हती तेवढी ती परदेशात गेल्यावर अधिक वाटत होती नाही म्हणायला माझ्या एका जवळच्या नातेवाईकाने ही उणीव अतिशय कल्पकतेने काही प्रमाणात भरून काढली होती त्याने चक्क पत्रासोबत महत्त्वाच्या बातम्यांची वर्तमानपत्राची कात्रणे

पाठवली होती त्यात पुण्याच्या निवडणुकीच्या धामधूमीचे वर्णन होते त्रिवेंद्रमला पोलिसांनी केलेल्या सरकारविरोधी चळवळीचा वृत्तांत होता नव्या विक्रीकर कायद्याने व्यापाऱ्यांची होणारी गैरसोय कशी कमी करता येईल यावर सरकारी प्रवक्त्याचे भाष्य होते मी ही कात्रणे पुन पुन्हा वाचली मला भारतात फेरफटका मारून आल्यासारखे वाटले

मला जेवढे भारतातील घडामोडीविषयी येथे कुतुहल वाटत होते, त्यापेक्षाही अधिक कुतुहल माझ्या संबंधितांना मी येथे अनुभवीत असलेल्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींचे होते त्यामुळे भारतातून येणाऱ्या पत्रांमध्ये भारतातल्या घडामोडींपेक्षा जर्मनीत मी अनुभवीत असलेल्या जीवनाविषयीचे प्रश्न अधिक असत हे प्रश्न जर त्यानी विचारले नसते तर मला माहीत असूनही त्यांना उत्तरे देण्याची तसदी मी घेतली नसती भारतातले सामान्य जीवन व येथील सामान्य जीवन यांची तुलना करण्याचा मोह मला झाला नसता.

मला विचारण्यात आलेल्या प्रश्नामध्ये जवळजवळ सत्तर टक्के प्रश्न जर्मनीच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसबंधी असत कोणत्याही देशाची प्रगती अजमावताना त्या देशातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीसबंधी कुतूहल असणे स्वाभाविकच आहे

सामान्य माणसाची आर्थिक परिस्थिती पाहताना प्रथम त्याच्या चलनामध्ये विचार केलेला बरा सर्वसाधारण कामगाराचा पगार महिना दोन हजार मार्क तर ऑफिसमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा पगार तीन हजार मार्क भाज्या दोन ते तीन मार्क किलो तर दूध एक मार्क तीस फेनिग लीटर साखरेचा भाव किलोमागे फक्त एक मार्क चाळीस फेनिग या सर्वांचा अर्थ एवढाच की उत्पन्नाच्या मानाने घरगुती वापराच्या वस्तू खूप स्वस्त त्यामानाने घर महाग शहरात पाचशे ते नहाशे मार्क भाड तर खेडेगावात जवळजवळ प्रत्येकाचे घर आणि या स्वत च्या घराला एक ते दोन लाख मार्क तरी हवेत कारण, जुनी घर फार थोडी दुसऱ्या महायुद्धात पडझड झाल्याने नव्याने बाधलेली घर अधिक

कापड खूपच स्वस्त पॅंटचे चांगले कापड अठरा ते वीस मार्क मीटरप्रमाणे पण याउलट शिलाई खूप महाग कारण शिंपी खूप कमी त्यामुळे प्रत्येकजण तयार कपडे वापरतो तयार शर्ट पंधरा मार्कपासून मिळतात पेट्रोलची किंमत फक्त एक मार्क पाच फेनिगने पेट्रोलचे दर वाढले तर आमच्या ऑफिसमध्ये दोन दिवस चर्चा चालू होती सेकंडहॅंड गाडी दोन हजार मार्कपासून मिळते दहा हजार मार्कला मिळते तिला सेकंडहॅंड म्हणायची लाज वाटते नवी गाडी वीस हजारापासून मिळते त्यामुळे ज्याच्याजवळ गाडी नाही असा माणूस हुडकून काढावा लागतो या सर्व आकड्यांवरून एकच निष्कर्ष निघतो की आपल्याला अभिप्रेत असलेला गरिबी हा

शब्द याच्या शब्दकोशात नाही त्यामुळे झोपडपट्टी, भिकारी, भूकबळी, ही तिची लक्तर कोठेही दिसत नाहीत कधी कधी दिसतात ते फंड म्हणून रस्त्यावर व्हायोलिन वाजवून आणि गाणी म्हणून पैसे गोळा करणारे आधुनिक भिकारी, पण ते सुद्धा जास्त करून शहरात

टॅक्सचे प्रमाण जवळजवळ पगाराच्या पचवीस टक्के पण भरपूर मुले झाल्यास टॅक्समध्ये भरपूर सूट येथला सगळाच कारभार उलटा घरात मोडलेला रेडिओ किंवा टीव्ही दुरुस्त करणे परवडत नसल्याने व जुन्या वस्तूला गिऱ्हाईक नसल्याने दर तीन महिन्यांनी म्युनिसिपालिटीची गाडी अशा वस्तू गोळा करावयास येते, तिची वाट पाहायची काही वेळा जुन्या गाडालासुद्धा गिऱ्हाइक मिळत नाही। आणि, मग ती स्क्रॅपयार्डमध्ये फेकून द्यावयाची अनेक वेळा रस्त्यातून जाताना कोऱ्या करकरीत दिसणाऱ्या या 'स्क्रॅप गाड्याचे निर्दयपणे एकमेकीवर ढीग करून ठेवलेले मी पहायचो आणि मन कासावीस व्हायच

एवढे असूनही सर्वसामान्य जर्मन माणूस चिकटच सुपरमार्केटमध्ये दहा वेळा किमती बघील व मगच खरेदी करील पैशाचा अधिक अधिक मोबदला मिळण्यासाठी तो धडपडेल मैत्रिणीला सिनेमाला नेतानासुद्धा बेटा फक्त स्वत चेच तिकीट काढणार. ऑफिसमध्ये एकटाच सर्वांसमोर सँडविच खाणार

सामान्य माणसाला दुसरा महत्त्वाचा प्रश्न पडतो तो तेथील माणसे वागायला कशी आहेत त्याचा लोक सर्वसाधारणपणे मितभाषी, वक्तशीर, आणि मेहेनती• थोडीशी नारळासारखी वरन टणक पण आतून गोड एकदा ओळख झाली की दिलखुलास बोलणारी, हसणारी थड हवामानामुळे भरभर चालणारी बायकासुद्धा इतक्या भरभर चालतात की बरेच वेळा स्त्रीला अभिप्रेत असलेल मार्दव गमावून बसतात सर्वांना बागकामाची खूप आवड सुटीत काय करणार विचारले तर म्हणे बागकाम राजकारणात विशेष चव नसावी कारण मोर्चे, भाषण यांना गर्दी कमीच शिवाय वासूनाका, चांडाळ चौकडी या आपल्या गावच्या खुणा येथे क्वचितच आढळतात लोकाच आरोग्य बरचस निसर्गदत्त अघोळ आठ-पधरा दिवसातून एकदा केलेली चालते दात घासताना क्वचितच दिसतात एकदा अगावर शर्ट चढवला की तो दोन-तीन दिवस काढला नाही तरी घामाने खराब व्हायचा नाही पुन्हा त्याला बरेच वेळा कोटाचे सरक्षण

हल्ली दाढी वाढावण्याची फॅशन बळावत असल्याने जामानिमा करण, तयार होण वगैरे शब्दाच महत्त्व खूपच कमी झालेल पण तस पाहिल तर लोक पापभीरू नियमाने चर्चमध्ये जाणारी, मोठ्याने बोलल तर दुसऱ्याला त्रास होईल की काय याचीसुद्धा काळजी करणारी बायका आणि पुरुष यांच्यातला फरक खूपच कमी एखाद्या धडधाकट मुलीने एखाद्या किरकोळ मुलाच्या पाठीत जोराने थाप मारून

त्याची खुशाली विचारली तरी कोणी त्याची दखल घेणार नाही मद्यपान, धूम्रपान ही पुरुषांचीच मक्तेदारी नाही हे वरचेवर दाखवून देणारी आणि त्याच्या प्रत्यक्ष गोडीपेक्षा आम्ही पुरुषाच्या मागे नाही हे दाखविण्याची भावना अधिक एवढे असून देखील बायका खूप कामसू त्यांच्या रोजनिशीत खिडकीच्या काचेवर बसण्याचा धुळीच्या कणालासुद्धा अधिकार नाही बायकांच पुरुषांना लाजवणार ड्रायव्हिंग पाहून मी गाडी घेण्याच धाडस केल नाही न जाणो 'गाडी नीट चालवता येत नाही तर घेता कशाला' अस म्हणून एखादी बाई चक्क शिवी हासडील अशी भीती मला वाटायची

सर्वसामान्य माणूस हा कुठे ना कुठे नोकरी करणारा स्वतंत्र धंदा करण्याची वृत्ती त्या मानाने कमी

इथल्या खेड्याविषयी तर विचारूच नका वस्ती कमी म्हणून फक्त खेड म्हणायच दहा हजार वस्तीच्या गावातसुद्धा रस्त्याला फूटपाथ, दिवे, सिग्नलस् पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग वगैरे सर्वकाही गावात स्विमिंगपूल, सुपरमार्केट, ड्रेनेज, थिएटर वगैरे सर्व आधुनिक सोई आपल्या येथे खेडेगावात संध्याकाळी सर्व गाव रस्त्यावर आलेला दिसतो शिळोप्याच्या गप्पा होतात येथे सर्व गाव नेहमी चिडीचुप क्वचित लहान मुल छोट्या सायकलवरून रस्ता जागवतात एकतर थंडीमुळे बाहेर उघड्या-वर फिरण्याची प्रथा कमीच नाही म्हणायला बिअरफेस्टला सगळा गाव रस्त्यावर आलेला दिसतो खेडेगावात शेती करणारा शेतकरीसुद्धा पेहरावानी शहरातल्या [illegible]

करण कठीण पण खेडेगावातली लोक आपल्यासारखीच शहराहून थोडी वेगळी रस्त्यात भेटल्यावर ओळख देणार, हसून 'कस काय ?' (वी गेटस्) विचारणार स्वच्छतेच्या बाबतीत शहरालाही मागे टाकील इतकी इथली खेडी सुंदर प्रत्येक घराभोवती बाग आणि प्रत्येक घराचा मालक आणि मालकीण रोज सकाळ-संध्या-काळ बागेची निगा राखण्यात दंग

खेडेगावाच्या साधारण मध्यभागी गावाच प्रमुख चर्च असणार त्याचा निमु-ळता होत जाणारा उंच मनोरा खूप लांबून दिसणार या मनोऱ्यावरून गावाच्या खुणा ओळखायच्या गावात छोटी छोटी हॉटेलं येथे त्याना 'लोकाल' म्हणतात गावातील घडामोडीचा जमाखर्च आपल्याकडे जसा एखाद्या पाटलाच्या ओसरीवर किंवा देवळाच्या चौथऱ्यावर होतो तसा येथे तो एखाद्या 'लोकाल' मधे बसून केला जातो. चहाची तलफ येथे बिअरने भागवतात

शहराची रीत जरा वेगळी कुठेही जा शहर म्हटल की बाजारपणा आलाच. प्रत्येक गोष्टीच प्रदर्शन हवच शहरं रात्री एक दोन वाजतासुद्धा जागीच कुठे [illegible]

फार मोटार ठेवायला रस्त्यावर जागा नाही म्हणून फुटपाथ अडवलेले आपल्या-कडे फुटपाथवर हातगाडीवाल्यांची मालकी तर इथे मोटारगाड्यांची शहरातले गल्लीबोळ पूर्वीइतकेच लहान राहिले आहेत पण गाड्या रोज मोठ्या होत आहेत. यामुळे गाडीचा अर्धा भाग फुटपाथवर तर अर्धा रस्त्यावर फुटपाथवरून चाल-ताना खोखोच्या खेळातल्यासारख नागमोडी चालायच किंवा धावायच पण दळण-वळणाची सोय उत्तम ट्राम, बस, ट्यूब, ट्रेन, टॅक्सी अशी कितीतरी साधन प्रत्ये-काच्या खिशाला परवडणारी अमूक 'रूटला' गर्दी कमी आहे, ती परवडत नाही म्हणून 'कॅन्सल' करण्याची गोष्ट नाही परवडण्यापेक्षा सोईला महत्त्व अधिक

शहरातल्या लहान लहान दुकानाची जागा आता भव्य सुपरमार्केटस्‌नी घेत-लेली त्यामुळे जिव्हाळ्याची खरेदी किंवा खरेदीचा जिव्हाळा संपलेला लेबल बघा-यच, परवडल तर वस्तू उचलायची आणि निमूट पैसे मोजायचे सगळ घड्याळा-सारख कृत्रिम शहरामध्ये 'ब्लॉक सिस्टीम' हीच मुख्य सिस्टीम या सिस्टीममुळे जगामधली सर्व माणस जवळजवळ एका साच्यातून काढल्यासारखी वाटतात मुंबई-मधे फिरा किंवा फ्रँकफुर्टमधे हिंडा, तेच भरभर चालणं, बोलायला हव म्हणून बोलण आणि प्रथम मिळेल ते वाहन पकडण पेहरावही सारखाच त्याच तुमानी, त्याच केसांच्या कमानी आणि तरुण-तरुणींची एकमेकांशी तीच जानी पेहचानी आपल्या शहरासारखीच इथल्या म्युझिअम आणि प्राणीसग्रहालयाची अवस्था पाहु-ण्यानी गावात काय पहायच याची यादी लांबलचक करण्यासाठी निर्माण केलेली ठिकाण शहरांचा चेहरामोहरा बराचसा सारखाच फक्त आपल्या शहरात आढळ णाऱ्या लांबच लाब रागा कोठेही नाहीत सिनेमाच्या तिकीटांची रांग, बसची रांग दुधाची राग, एवढंच काय पण देवाच्या दर्शनासाठी धरलेली राग या रांगाच्या विळख्यापासून येथली शहर मुक्त आहेत गलिच्छ म्हणता येण्यासारखी वस्ती जवळ-जवळ कोठेच नाही

येथे अठरापगड जाती आणि धर्म नसल्याने भाषा एकच आणि चालीरीती सारख्याच त्यामुळे एक भाषा शिकली की कोठेही फिरा, अडचण पडणार नाही. सर्वांचे सण एकदम येणार आणि ते साजरेपण सारखेच होणार एप्रिलमधे (ईस्टर) ओस्टन येणार तर मे-जूनमधे फिंगस्टन हा सर्वांत मोठा सण आपल्याकडच्या गणपती-दिवाळीसारखा त्यावेळी मोठी माणस लहान मुलाना भेटवस्तू देणार. डिसेंबरमधे वाईनाक्टन (ख्रिसमस) येणार हे सर्व दोन ते चार दिवसांचे सण ऑक्टोबर-मेमधे बिअर फेस्टचे कार्यक्रम त्यावेळी रस्त्यारस्त्यात यथेच्छ बिअर पिण्याचे आणि नाचगाण्याचे कार्यक्रम आपल्यासारख्याच येथेही जत्रा भरता‍त छोटी छोटी दुकान, निरनिराळ्या प्रकारचे पाळणे, गेम्स असे विविध प्रकार.

येथील विवाह आपल्याइतके खर्चाचे नाहीत सर्वसाधारणपणे स्वतःचा जोडीदार स्वतःच शोधायचा आणि चर्चमध्ये जाऊन लग्न लावायचे फार फार तर वीस-पंचवीस माणस लग्नाच्या दिवशी या सोहळ्यानिमित्त एकत्र येणार आणि मध्याकाळी आपआपल्या घरी परतणार. लग्न झाल्यावर मुलांनी स्वतंत्र राहायच हा सर्वसाधारण नियम अर्थात मुलांचे आई-वडिलांशी जिव्हाळ्याचे आणि आदराचे संबंध

मी येथे असताना मला कधीही टंचाई हा शब्द कानावर पडला नाही वीज-टंचाई, पाणी टंचाई, रॉकेल टंचाई, गॅस टंचाई या सर्व टंचायाबरोबर यावेळी मी ग्रेडटंचाई घेऊन तिकडे गेल्याने मला कोणत्याही गोष्टीची टंचाई नाही हे ऐकताना चुकल्यासारख वाटायच

आपल्याकडे जसा क्रिकेट तसा येथे फुटबॉल टीव्हीवर कोठे ना कोठे फुटबॉलची मॅच चालू असते आणि ऑफिसमध्येदेखील त्यावर काही ना काही कॉमेंट्री प्रत्येकजण करत असतो हा खेळ हौस म्हणूनच पाहिला व खेळला जातो स्वीमिंग मात्र व्यायाम म्हणून प्रत्येकाला यावेच लागते त्यासाठी शाळेतूनही शिकवण्याची सोय केलेली असते

शाळेवरन आठवल मी प्राथमिक शाळेतल्या मुलाची पुस्तक पाहिली इतकी सुबक होती आणि इतक्या सुंदर चित्रानी भरलेली होती की, पाहत राहाव मला आश्चर्य वाटल ते ती पुस्तक तीन ते चार मुलानी वापरलेली आहेत हे कळल्यावर मुलांना दरवर्षी पुस्तकांचा सेट फुकट दिला जातो व तो त्याने वर्षभर काळजीपूर्वक वापरून वर्षअखेर शाळेला परत करावयाचा तोच सेट पुढील वर्षी नव्या मुलाला देण्यात येतो मी एक पुस्तक असे सतत आठ वर्ष एका मुलाकडून दुसऱ्या मुलाकडे गेलेले पाहिले त्या पुस्तकाच्या पहिल्या पानावर मुलाचे नाव आणि वर्ष लिहिलेल होत ते पुस्तक जुन झाल म्हणून मला देण्यात आल आणि पहिल पान उघडीपर्यंत ते आठ वर्ष वापरलेल आहे याची मला शकासुद्धा आली नाही

यावरन आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली की येथे दर दोन-तीन वर्षांनी पाठ्यपुस्तके बदलण्याचा प्रकार नाही सर्व विषयाचं शिक्षण मातृभाषेतच मुलगा सहा वर्षांचा शाळेत गेला की, चार वर्ष त्याने प्राथमिक शिक्षण घ्यायचं त्याला ' ग्रुडशूले ' म्हणतात नतर पाच वर्ष माध्यमिक शिक्षण त्याला ' हॉफ्ट शूले ' म्हणतात इथपर्यंत प्रत्येकाने आपल्या मुलाला शाळेत घातलच पाहिजे मुलाला वयाच्या पधरा वर्षाच्या आत शाळेतून काढलं तर तो गुन्हा आहे या नऊ वर्षांच्या शिक्षणक्रमाला ' फोकशूले ' म्हणतात पुढे दोन वर्षांनी पॉलीटेक्नीककडे जाता येते. प्राथमिक शाळेनतर दहा वर्ष माध्यमिक शाळेत गेल्यावर डिग्री कोर्सेसाठी जाता येते येथपर्यंतच्या शिक्षणाला ' जिमनॅशियम ' म्हणतात. जिमनॅशियमपर्यंतचे शिक्षण

फुकट असते पण डिग्रीकोर्सचे शिक्षण फार महागडे असते (याला येथे डिप्लोमा कोर्स म्हणतात ) महिना पाच सहाशे मार्क खर्च येतो त्यामानाने डिग्री (अर्थात डिप्लोमा) घेणारे विद्यार्थी थोडे असतात

आपल्या शिक्षणक्रमाशी तुलना करता येथील शिक्षणक्रम जास्त वर्षांचा आहे वार्षिक परीक्षेपेक्षा युनिटटेस्टसारख्या परीक्षेंना अधिक महत्त्व आहे

विशेष म्हणजे कोणत्याही ट्रेडसाठी कोर्स करण आवश्यक असत उदा कार्पेंटर, बार्बर अशा व्यवसायासाठीसुद्धा कोर्स पुरा करून सर्टिफिकेट घेतल्याशिवाय नोकरी किंवा व्यवसाय करता येत नाही इंजिनिअर किंवा डॉक्टरचा मुलगा इलेक्ट्रिशियन किंवा बार्बर झाला तरी समाज त्याला कमी लेखत नाही पण येथेही डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्यासाठी मुलाची धडपड चालूच असते विद्यार्थीजीवन तस शात वाटत विद्यार्थीचळवळ अस्तित्वात असल्याच ऐकण्यात आल नाही दहा वर्षांपूर्वी कॉलेजमध्ये सीटस् कमी होत्या म्हणून आदोलने झाल्याच सांगतात

जर्मन लोक अत्यत स्वदेशाभिमानी असतात हे खर का ? या प्रश्नाच नेमक उत्तर मला देता येत नसे स्वदेशाभिमान म्हणजे नेमक काय करावयाच ? स्वदेशा-भिमान वगैरे गोष्टी तशा कोठे दिसल्या नाहीत, पण चटकन लक्षात यायची ती याच्या नसानसांत भिनलेली शिस्त आणि कायदा पाळण्याचा प्रत्येकाने केलेला कसोशीचा प्रयत्न कितीही घाई असली आणि रस्त्यावरून एकही मोटार येत नसली तरी तांबडा सिग्नल असताना एकही पादचारी रस्ता क्रॉस करणार नाही

काही वेळा मला या वागण्याच हसू यायच. कायदा आपल्यासाठी आहे, की आपण कायद्यासाठी आहोत, येवढे तारतम्यही यानी बाळगू नये ना याच मला नवल वाटायच पण येथेच मी चुकत होतो एकदा तारतम्य प्रत्येकावर सोपवले की शिस्त बुडाली मग देश बुडाला त्यांच्या यशाच गमक बरचस या गोष्टीत असाव तस पाहिल तर बाजारात जर्मनच वस्तू विकत घ्यावी अस कोणतही बधन येथे नाही वस्तू चागली आणि स्वस्त असली पाहिजे हे याच साध गणित मग ती जपानी असो, जर्मन असो की अमेरिकन– सर्वच याना सारख्या

कायद्याच कसोशीने पालन होत असल्याने गुन्हेगारीचे प्रमाण कमी असावे पोलिस किंवा सखाराम 'ही चीज रस्त्यावर क्वचितच दिसते कधी कधी हवालदार दिसलाच तर तो वर तांबडा दिवा असलेल्या मर्सीडीज किंवा बी एम वे मधून रुबाबात जाताना दिसणार.

पण एवढी सुबत्ता आली कशी ? ही जादूची कांडी फिरवली कोणी ? याचा शोध घेण्यासाठी, हिटलरने दुसऱ्या महायुद्धापूर्वी केलेल्या आर्थिक व सामाजिक क्रांतीचा आढावा घेतल्याशिवाय चालणार नाही

हिटलरने 'व्यायाम व खेळ ' या नावाखाली उभ्या केलेल्या तरुणाच्या गटांतून

शिस्तीची बीज रोवली गेली आणि त्यातून नाझी पक्ष उभा राहिला पुढे १९३४ मध्ये १४ ते १८ वर्षांच्या मुलांना मैदानी खेळाचे आणि कवायतीचे शिक्षण सक्तीचे झाले आणि १८ वर्षे पुरी झालेल्या मुलींना एक वर्ष शेतावर काम करण्याची सक्ती करण्यात आली त्याच सुमारास तीनशे एकरांपेक्षा लहान असलेली जमीन शेतकऱ्याच्या मालकीची झाली आणि या जमिनीचे तुकडे पाडणे किंवा विकणे यावर बंदी घालण्यात आली शेतकऱ्यासारखाच कामगार सरकारला बांधील होता. काम कोठे करावे व काय करावे याचे स्वातंत्र्य त्याला नव्हते पण या सर्वांचा परिणाम जर्मनीची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात झाला आणि १९२२ मध्ये एका डॉलरला ७००० मार्क पडणाऱ्या जर्मनीने केवळ दहा-बारा वर्षांच्या काळात जगाला आर्थिक चमत्कार करून दाखवला १९३३ साली साठ लाख बेकार असलेल्या जर्मनीत दोन वर्षांत बेकारी औषधालाही राहिली नाही

दुसऱ्या महायुद्धातील अपरिमित हानी व हाल-अपेष्टांमुळे सर्वसामान्य जर्मन जनता जरी हिटलरला विटली होती तरी त्याने जोपासलेल्या शिस्तीमुळे आणि केलेल्या सुधारणामुळे आजची प्रगती शक्य झाली आहे हे कोणी नाकारू शकत नव्हते हिटलरची तिसऱ्या राईशची स्वप्न धुळीला मिळाली पण अखंड प्रयत्न आणि साहस करण्याची सवय जर्मन जनतेला नकळत लागली होती. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धात बेचराख झालेल्या जर्मनीने केवळ वीस पंचवीस-वर्षांत जगातल्या अग्रगण्य औद्योगिक देशांत मानाचं स्थान मिळवल

राईशस्टॅगची (पार्लमेंट) इमारत जाळणारा म्हणून १९३३ साली लुबीचे मुडके उडवले गेले आणि जर्मनीत कम्युनिस्टांचे कायमचे शिरकाण झाले अजूनदेखील कम्युनिस्टांचे बल जेमतेम दोन टक्के असेल, नसेल मुख्य नाव घेण्यासारखे चार पक्ष CSU आणि CDU हे दोन आणि SPD आणि FPD हे दुसरे दोन पहिले दोन व दुसरे दोन हे एकच काम करतात व दोन्ही गटाचे बलाबल जवळजवळ सारखेच आहे त्यामुळे त्यांच्यात नेहमी चुरस असते हे सर्व पक्ष डेमॉक्रेटिक किंवा स्पेशालिस्ट आहेत येथे पक्ष आणि पुढाऱ्यांचा बुजबुजाट कमी आहे त्यामुळे राजकारणाचे अजून खेळणे झालेले नाही सभा मोर्चे, लाँगमार्च, रस्ता रोको पानी खोलो वगैरे आंदोलने फारशी होत नाहीत बहुतांशी लोक आपल एखाद्या प्रश्नाविषयी मत वर्तमानपत्रांतील मजकुरावरून ठरवतात व केव्हा केव्हा व्यक्त करतात.

हीच स्थिती कारखान्यांतील राजकारणाची येथे प्रत्येक उत्पादनाच्या गटाची सबंध देशाची मिळून एक अशी मोठी युनियन असते उदा स्टील संबंधित उत्पादन धंद्यातील कामगारांची एक युनियन संप होतात, पण क्वचित पण झालेच तर सबंध देशातल्या कारखान्याना व्यापून टाकतात ही युनियन खूप मोठी असल्याने

प्रभावी असते व देशाच्या राजकारणावर तिचा दबाव असतो अर्थात त्याचबरोबर देशातील प्रश्नाची जबाबदारीही आपोआपच तिच्यावर पडते त्यामुळे सामोपचाराने प्रश्न सोडवण्याकडे कल अधिक असतो प्रत्येक कारखान्यातील कामगार आपआपले प्रतिनिधी त्याच्या कारखान्यापुरते निवडतो त्याला ' बेट्रीबराट ' असे म्हणतात कारखान्यासबंधित छोटे छोटे प्रश्न सोडवण्याचीच फक्त जबाबदारी या प्रतिनिधींवर असते त्याकरता सप, बद काम वगैरेसारखे निर्णय त्यांना घेता येत नाहीत

ही झाली कामगाराची तऱ्हा कारखान्यातील कामासबंधीचा विशेष म्हणजे जवळजवळ प्रत्येक कामगार प्रॉडक्शन, बोनस मिळवण्याच्या मागे असतो कारण अधिक पैसे मिळवून अधिक मजेत 'वीक एन्ड घालवण्याच्या इर्ष्येने तो काम करत असतो युरोपियन बाजारपेठेत आपला निभाव लागावा म्हणून प्रत्येक कारखानदाराला धडपडावे लागते त्याना जपान, अमेरिकेसारख्या देशांतून येणाऱ्या मालाशी किंमत व दर्जा या बाबतीत स्पर्धा करावी लागते त्यामुळे कोणत्याही कारखान्यात गेल्यावर तेथील उत्पादनाची ओळख करून देताना गेल्या तीस वर्षांत काय काय बदल केले व उत्पादन कसे वाढवले याची जत्री प्रत्येक कारखानदार देत असतो

एवढी सुबत्ता असूनसुद्धा अन्नपदार्थांच्या बाबतीत यानी फारशी प्रगती केलेली दिसत नाही न्यूरेनबर्गमध्ये खूप प्रयासाने आम्ही एक चायनीज रेस्टॉरंट शोधून काढले, पण डीशेशना चायनीज नाव देण्यापलीकडे प्रगती केलेली दिसली नाही. रोजच्या खाण्याच्या पदार्थांतसुद्धा केक, ब्रेड, बटाटे अशा पोकळ वस्तूंचा येथे भरणा पुष्कळ या पदार्थांना उकडून मोकळे सोडावयाचे एवढेच येथे माहीत तळणे, परतण, फोडण (म्हणजच फोडणाला टाकण) चाचवण, भाजण अशा प्रकारापासून जवळजवळ सर्वच पाकक्रिया मुक्त त्यामुळे पदार्थांच्या चवीत तोच तोचपणा आल्यासारखा फार वाटतो आपल्या जेवणात तिखटाला जे स्थान येथील जेवणात आबटपणाला. प्रत्येक पदार्थावर व्हिनेगरचा मारा आपण जेवणाबरोबर जस लोणच, पापड, कादा, याचा उपयोग करतो तसाच उपयोग (किंवा मारा), येथे सालाट या व्हिनेगरने ओथबलेल्या पदार्थाचा करतात एक दोन घासापाठोपाठ या सालाटच्या पानाचा तुकडा तोंडात टाकावयाचा हा शिरस्ता पोळीची जागा येथे ब्रेडने घेतलेली तर भाताची बटाट्याने

येथली फळसुद्धा तितकीच आबट आपल्याकडे फळ जितक गोड तितक ते अधिक लोकप्रिय तर येथे ते जितके आबट तेवढी मागणी अधिक मला वाटत या देशात चिंचा किंवा आवळे निर्यात केले तर अधिक खपतील,

निसर्ग म्हणाल तर बरेच वेळा कोपलेलाच ऑक्टोबरला झाडाची पान गळू

लागायची डिसेंबरात ती पूर्ण वठलेली दिसायची. मग बर्फाच्या माऱ्यान त्यांची अग करपायची व बिचारी काळीठिक्कर पडायची अगावर असख्य जखमा पडाव्यात आणि त्यांना मलमपट्टी करावी तशा बर्फाच्या असख्य पाढऱ्या पट्ट्या जागोजाग दिसल्या या बर्फाच्या तावडीतून घर, गुर, माणस, वाहान कोणीच सुटायच नाही सर्वांत कळस व्हायचा तो बर्फाचा वादळी पाऊस यायचा तेव्हा तपमान कधीकधी एकदम शून्याच्या वीस अश खाली घसरायच मग बाहेर पडायचीसुद्धा सोय नाही तशात दिवस लहान सकाळी आठ वाजता बाहेर पडाव तर सगळीकडे अधार या थडीला भिऊन बिचारा सूर्यसुद्धा क्षितिजाआड लपायचा त्याला नऊ वाजले तरी बाहेर पडायच धाडस व्हायच नाही सध्याकाळी चार वाजतात न वाजतात तोच बिचारा पळून जायचा हे अस एप्रिल मेपर्यंत चालायच मग कोठे झाडाना पालवी फुटायची फुल डोलू लागायची पण जरा बिचारी हसू लागली की कधी पावसान झोडपाव तर कधी खट्याळ वाऱ्यान सतावाव आज सुरेख ऊन पडल आहे म्हणून फिरावयास जाण्याचा बेत आखावा तर निघेपर्यंत सगळ्या बेतावर पाणी पडाव हे अस दोन तीन महिने चालायच आणि ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये सुरेख उन्ह पडूनसुद्धा पुढे येणाऱ्या थडीपासून सरक्षण करण्याच्या काळजीला लागायच

निसर्गाच्या लहरीवर नाचता नाचता येथे जीव मेटाकुटीस येतो रानावनातून स्वच्छदीपणे उनाडण्यासारख रान नाही आणि ऋतूही नाही माणसांनी नेहमी कापडलेल रहाव तर झाडानी स्वत ला ओरबाडून घ्याव घरांनी डोक्याची घसरगुडी करावी आणि दार-खिडक्यानी कडीकुलुपात राहाव यांना हा निसर्गच एवढी बधन पाळावयास शिकवतो

अर्थात् उणे-अधिकाचा जमाखर्च लिहावयास घेतला तर अधिकाची बाजूच जड होणार ह्यात सशय नाही

-•-

प्रकरण सातवे

# विलायती पाहुणचार

सकाळी लवकर उठून आम्ही फ्रँकफुर्ट स्टेशन गाठल. तेथून रेल्वेने फ्रँकफुर्ट विमानतळावर जायचे होते ट्रेनमध्ये सामान चढवले आणि गाडी कॅन्सल झाल्याचा पहिला अपशकून झाला छातीत धस्स झाल सुरुवात काही चागली झाली नव्हती. जर्मनीतल्या सबध वास्तव्यात प्रथमच गाडी कॅन्सल झालेली पाहिली होती. सामानाची ट्रॉली शोधण्यासाठी एकच धावपळ झाली शिस्त, सयम वगैरे सर्व नियम धाब्यावर बसवून जो तो जमेल त्या मार्गाने ट्रॉली हस्तगत करत होता. त्यात आमचा नबर शेवटी लागला हे सांगणे नकोच कशीबशी दुसरी गाडी पकडली आणि विमानतळावर आलो

एअर इडियाच्या कौंटरवर येतो तो लडनला एअर इडियाचा सप असल्याच कळले झाले दुसरा अपशकून झाला एअरइंडयाची बॉम्बे न्यूयॉर्क फ्लाईट लडन न घेताच पुढे जाणार होती आमचे तिकीट एअरइडियाचे होते त्यामुळे काय करावे समजेना पण तेवढयात TWA न आमची सोय करण्यात आली मग जरा बरे वाटले अमेरिकन कपनीच्या विमानान जायला मिळणार म्हणून हुरूप आला. मी ज्या सामानाची ४० किलोच्यावर वजन वाढू नये म्हणून काळजी घेत होतो ते सामान वजन न करताच बेल्टवर ठेवण्यात आले तिकीट काढून प्रवास करताना टी सी चेकिंगसाठी येऊ नये तेव्हा वाटते तसे मला वाटले हे आधी माहीत असते तर स्वयपाकाची दोन भांडी जास्त घ्यावयास बायकोला परवानगी दिली असती किचनवेअरला स्वयपाकाची भाडी म्हटल म्हणून ती माझ्यावर चिडली होती तो राग तरी घालवता आला असता पण आता दुप्पट रोष पत्करावा लागला एकतर

भाडी घेतली नाहीत म्हणून आणि दुसरा म्हणजे मी वजनाचा जो बाऊ केला होता त्यात काहीच तथ्य नव्हते म्हणून

हे सामान अदृश्य होऊन आपल्याच विमानात जाऊन बसत कस हा प्रश्न मला प्रत्येक विमान प्रवासात भेडसावतो भारतातून येताना सामानाची आम्हाला तेवढी फिकीर नव्हती पण आता हे सामान आमचे सर्वस्व झाले होते आणि अशा वेळी त्याला अस बेल्टवर बेवारशी सोडून देण जरा जड जात होत एस टी ने किंवा रेल्वेने प्रवास करताना या सामानावर नजर टाकण्याची सवय आम्हाला लागली होती त्यामुळे आता या विमान प्रवासात एक प्रकारची बेचैनी आली होती

अखेर विमानाने फ्रँकफुर्ट विमानतळ सोडला. चर्चची निमुळती टोक आता सुईच्या अग्रासारखी दिसू लागली माझ अतिशय प्रेम जडलेली ऱ्हाईन नदी गाला-वर अश्रूचे ओघळ यावे इतकी लहान व हिरमुसलेली दिसत होती फ्रँकफुर्ट शहर लहान मुलाच्या प्लॅस्टिकच्या खेळातल्या शहरासारख दिसत होत आता पुन्हा कधी ते पाहायला मिळणार नाही म्हणून मी विमानाच्या काचेतून बायनॉक्युलरच्या साहाय्याने ते जवळ आणण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होतो माझा वेडेपणा लक्षात आल्यावर बायकाने मला आवडणाऱ्या चॉकलेटाच आमिष दाखवल आणि मी तो नाद सोडला बेल्ट सोडण्याची अनाउन्समेंट होईपर्यंत जर्मनीची हद्द केव्हाच सपली होती आणि आम्ही अटलांटिक महासागरावरून उडत होतो. खाली पाणी वर आकाश आणि मध्ये कधीही भरून न येणारी पोकळी अशा विषण्ण अवस्थेत मला चॉकलेट गोड लागत नव्हत

ब्रेकफास्ट सपवून विमानातील प्रवाशांची नोडओळख करीपर्यंत ' आपण लवकरच लडनच्या हीथरो विमानतळावर उतरणार आहोत ' अशी अनाउन्समेंट झाली पुन्हा बेल्ट बाधले आणि क्षणार्धात विमानाने विमानतळाकडे झेप घेतली. हीथरो विमानतळावर आल्यावर साहेबशाहीची पहिलीच सलामी मिळाली ब्रिटिश आणि युरोपियन पास होल्डर्सची वेगळी लाईन आणि आफ्रिका, इंडिया वगैरे इतर आशियाई देशांची वेगळी लाईन नवल वाटल ते या गोष्टीच की ही लाईन लाव-णारे सगळे आशियाईच हीथरो विमानतळ भव्य आहे पण फ्रँकफुर्टइतका तो आधुनिक वाटला नाही शिवाय त्याचा रग पिवळा आहे मला या पिवळ्या इमारतीचा तिटकारा आहे या पिवळेपणात मला नेहमी सरकारी भोंगळपणा दिसतो त्यामुळे मी कोठेही पिवळी इमारत पाहिली की ती सरकारी समजतो

हीथरोच वर्णन खूप ऐकल असूनसुद्धा मला उगाचच त्यात भोंगळपणा दिसत होता आम्ही रांगेत उभे राहिलो कस्टम क्लीअरन्ससाठी काऊंटरवर पासपोर्ट दाखवला कस्टम अधिकाऱ्यान विचारल "किती दिवस राहणार ?' "वीस दिवस पैसे किती आहेत ?' मला आश्चर्य वाटले पैशांचा आणि दिवसाचा

संबंध काय मी म्हटल " भरपूर आहेत " तो जरा चपापला त्याला काय वाटले कोण जाणे त्याने आम्हाला जाऊ दिले मी जरा टायची गाठ नीट केली, कोटाची बटण व्यवस्थित लावली आणि साहेबी थाटात पोर्टरला बोलावले

प्रथमच मी विलायती हमालाकरवी माझे सामान टॅक्सीत ठेवणार होतो पोर्टरने बॅग उचलली पण माझ्या भारतीय बॅगेला साहेबाचा स्पर्श मानवला नसावा बॅगेचे हॅंडल तुटले झाले तिसरा अपशकून झाला आता पुढच्या सर्व घटना म्हणजे अपशकुनांची मालिकाच ठरणार की काय या भीतीने मी ते मोज-ण्याचे सोडून दिले भारतीय बॅगेला आता दोन हमालाची जरूर होती एक तो विलायती आणि दुसरा मी भारतीय कसेबसे आम्ही टॅक्सीपर्यंत पोचलो काळ्या रंगाच्या जुन्या ऑस्टीन गाडीत त्याने माझे सामान ठेवले ही व्हिंटेज कार टॅक्सी कशी असू शकेल अशी मला शंका आली म्हणून मी तपासून पाहिले टपावर टॅक्सीचा बोर्ड पाहून माझ्यासाठी मुद्दाम शोधून आणली असेल अशा समजुतीने मी तिच्यात बसलो मला छकड्यात बसल्यासारखे वाटले बसायला ऐसपैस जागा होती शिवाय सामान बसायच्या जागेच्या पुढ्यातच ठेवता येत होते वाटेत अशा बऱ्याच टॅक्सी भेटल्याने कुतूहलाने मी ड्रायव्हरला विचारले की एवढ्या जुन्या मोटारी अजून तुमच्याकडे कशा आहेत त्याने खुलासा केला की या जुन्या नसून मुद्दाम टॅक्सीसाठी नवीन बांधून घेतात म्हणजे मुंबईत जशी फियाट तशी लंडन-मध्ये जुन्या मॉडेलची ऑस्टीन मर्सीडीज टॅक्सीवरून एकदम ऑस्टीनवर आल्याने लोणावळा सोडल्यावर जसे मळवली यावे तसे वाटले

आम्हाला अर्लस कोर्टजवळील फिलबीच हॉटेलमध्ये रहायचे होते मोठ्या मेहनतीने न्युरेनबर्गहून या हॉटेलच बुकिंग केल होत रोज सतरा पौंड म्हणजे जवळजवळ तीनशे रु भाडे होत त्यामुळे फिलबीच हॉटेल म्हणजे ताजमहाल, ऑबेरॉयसारखी इमारत लागली की थांबायच अशी आमची समजूत होती, पण टॅक्सी चक्क हिंदू कॉलनीतल्या जोशी बोर्डिंगपाशी थांबल्यासारखी वाटली माझा आणि विशेषत: सौ चा फार विरस झाला पण नाइलाज होता आमच बुकिंग झालेल होत

आम्ही हॉटेलमध्ये गेलो आणि काऊंटरशी थांबलो तेथे मॅनेजर आणि त्याची सेक्रेटरी ह्यांच कोचावर बसून इतका वेळ हितगुज चालल होत की त्यांना कस विचाराव ते सुचेना त्यांना 'डिस्टर्ब' करण साहेबी शिष्टाचाराला कितपत धरून दिसेल हे आम्हाला उमजेना शेवटी मी हिय्या करून मोठ्याने शिंकलो तो दचकला एवढा मोठा आवाज शिंकेचा असू शकतो हे त्याला नवीन असाव तो मेहेरबानी केल्यासारखा उठला, आणि खेकसला, 'फॉर हूम व्हॉन्ट ?' मी बोलण्याचे धाडस केले नाही त्याला माझ्याजवळ असलेले हॉटेल बुकिंगचे लेटर दाखवले.

रूम चौथ्या माळ्यावर होती लिफ्टची सोय नव्हती वर सामान नेताना नाकी नऊ आले काही वस्तू तेथेच वाटून टाकाव्यात असे वाटले रूम मॅझेनाइन फ्लोअरवर होती दोन पलगाना जेमतेम ती आसरा देऊन होती संडास-बाथरूम खोलीच्या बाहेर इतर दोन रूम मिळून सामाईक होते संडासचे दार आणि बाथ-रूमचे दार एकदम उघडण्याइतकी त्याची सलगी नव्हती संडासाने उघडाव तेव्हा बाथरूमन बद असाव असा तिथला नियम होता बाथरूमची आतली कडी निघा-ल्यान प्रत्येकाला आळीपाळीन बाथरूमबाहेर रखवालदारी करावी लागायची मी येथे येऊन पस्तावलो होतो तीनशे रु रोज देऊन आम्ही लडनला राहिलो होतो हे सागण्यातील मोठेपणा ही एकच आमची जमेची बाजू होती

मी कॉस्मॉस टूर या प्रसिद्ध कपनीचे पधरा दिवसांच्या युरोप टूरसाठी बुकिंग केले होते त्यासाठी या कपनीच्या ऑफिसमध्ये जायचे होते लडनची ट्यूब आम्हाला नवीन होती आम्ही अर्लस्कोर्ट स्टेशनवर गेलो आठवड्याचा पास मिळतो का याची चौकशी केली पण नीट माहिती मिळाली नाही म्हणून तिकीट काढले हे तिकीट गेटच्या स्लॉटमध्ये टाकून झडप उघडले तेवढ्या वेळात आत शिरण म्हणजे कसरतीच काम होत

सेंट्रल रेल्वेने प्रवास करताना लहानात लहान फटीत शिरून प्रवास करण्याची सवय असल्याने या ट्यूबच्या गेटच्या फटीतून शिरताना मला तेवढा त्रास झाला नाही, पण तिकीट फटीत घालायच, तेवढ्या वेळात गेट उघडल्यावर आत शिरा-यच आणि तिकीट काढून घ्यायच हे सगळ नाटक करताना येथील लोकाना लहान-पणापासून जे शिक्षण मिळत होत ते अजब होतं

स्टेशनात शिरल्यावर पावलापावलावर साऊथ केंसिंगटनकडे, वेस्ट केंसिंगटन-कडे, वेस्ट ब्रॉम्प्टनकडे असे वेगवेगळे बोर्डस् होते लडन ट्यूब येवढी जुनी व गुता-गुतीची असून प्रवास करताना मुळीच त्रास होऊ नये म्हणून जागोजाग नकाशे आणि बोर्डस् लावलेले मला या नकाशाच सुरुवातीला भय वाटायच जर्मनीत असताना आम्ही एका मित्राकडे जेवावयास गेलो होतो वाटेत आम्हाला एका ठिकाणी काम होते तेव्हा माझ्या जर्मन मित्राने नकाशावरून ते ठिकाण शोधून काढण्याच्या अट्टाहासाने मला मोटारीन इतक उलटसुलट फिरवल होत की, तेव्हा-पासून मी या नकाशाच्या जवळ जाण्याच धाडस केल नव्हतं पण लडन ट्यूबच्या नकाशानी माझी ही भीती दूर केली

लडन ट्यूबने त्या मानाने बरेच पावसाळे पाहिले आहेत सरकते जिने आता कुरकुर करू लागल्यासारखे वाटतात जिन्याच्या पायऱ्यावरच्या लाकडी पट्ट्या आता बऱ्याच झिजून गेल्या आहेत लडन ट्यूबची खोली इतकी आहे की काही ठिकाणी विहिरीत उतरल्यासारखे वाटावे ट्यूबमध्ये बसावयास कुशन सीटस्

होत्या, पण बऱ्याच जुन्या झाल्याने त्याच्यावर एकप्रकारचा कळकटपणा आला होता त्यातले प्रवासीसुद्धा मला जरा उदास आणि निस्तेज वाटले मला वाटत गेलेल वैभव पुन्हा मिळवता येईल का ? या काळजीन त्याना ग्रासल असाव

आम्ही अर्लस्‌कोर्टहून व्हिक्टोरिया स्टेशनवर आलो आणि माझ्या लडन-विषयीच्या अपेक्षाना तडा गेला मी दोन वर्षापूर्वी सालारजग म्युझिअम पाहिली तेव्हा माझे असेच झाले होते ही म्युझिअम मी वीस-बावीस वर्षापूर्वी लहान असताना पाहिली होती आणि ती मला इतकी आवडली होती की याच्यापेक्षा चागली म्युझिअम जगाच्या पाठीवर असूच शकत नाही, अशी माझी समजूत होती पण अलीकडे तीच म्युझिअम पाहून माझ्या वीस-बावीस वर्षं मनात असलेल्या प्रतिमेला तडा गेला होता मी ती म्युझिअम पुन्हा पाहायला नको होती

तसे काहीसे येथील व्हिक्टोरिया स्टेशन पाहिल्यावर झाले साहेब थुकीसुद्धा रुमालात जपून ठेवतो अस ऐकल होत आणि येथे तर चक्क उकिरडा झाला होता येथे लडनचा चक्क कलकत्ता झाला होता मला फोटो काढण्याचा मोह आवरेना ते कळकटलेल स्टेशन पाहून मी एक चूक केली अस मला वाटल भारतातून प्रथम मला लडनला यायला हव होत व मग जर्मनीत पाऊल ठेवल असत तर इतक बिघडल नसत गाव तेथे महारवाडा अशी समजूत करून मी त्या गलिच्छपणाकडे दुर्लक्ष केल व्हिक्टोरियाहून आम्हाला ब्रोमलीला जायच होत आता टयूब सोडून ब्रिटिश रेलने प्रवास करावयाचा होता- गाडीला ऑफिसची गर्दी होती गर्दीचा कुबटपणा होता बसायला जागा नव्हती पण लोक समजूतदार वाटली ब्रोमलीला जाताना विक्रोळी, भांडूपला गेल्यासारखे वाटले वस्ती विरळ होत चालली होती

तेथे गेल्यावर आम्हाला कळल की टूरचे कागदपत्र व्हिक्टोरिया स्टेशनच्या जवळच्या ऑफिसमधून घ्यायचे आहेत मग आम्हाला ब्रोमलीला कशाला यायला सागितल देव जाणे येवढ्या वेळात दोन पौंड अक्कलखाती पडले होते मला दोन पौंड वजन कमी झाल्यासारखा अशक्तपणा आला ही लडन टयूब फार महागडी आहे कोठेही जा दीड-दोन पौंड खर्च व्हायचेच शिवाय एक एक पौंड इतका गलेलठ्ठ की पैशाची किमत त्याच्या वजनावर अवलंबून असते अशी यांची समजूत असावी ते पौड, शिलिंग, पेन्स याची मोजदाद करताना हात दुखायचे आणि साभाळताना खिसा फाटायचा

दुसऱ्या दिवशी इव्हान्स या कपनीच्या बसने आम्ही लडन दर्शन करावयास गेलो बसमधून जाताना ही ब्रिटिश म्युझिअम, ही लडन युनिव्हर्सिटी, ती पिकॅडली, हा ट्रॅफलगार स्क्वेअर अस गाईड सागत होता लडन शहर किती महागड आहे, येथे मिळणारा सामान्य लोकाचा पगार किती तोकडा आहे याच रसभरित वर्णन गाईड करत होता मला महागाईविरोधी मोर्च्याला निघाल्यासारखे वाटले

आम्ही वेस्टमिनिस्टर ॲबेशी थांबलो. आणि लंडनची भव्यता प्रथम माझ्या नजरेत भरली पार्लमेंट स्क्वेअरमधून समोर दिसणार बिगबेनचं घड्याळ, उजव्या बाजूचा कौन्सिल हॉल आणि डाव्या बाजूचं वेस्टमिनिस्टर ॲबे चर्च वेस्टमिनिस्टर ॲबेमध्ये शिरलं की इंग्लंडच्या साम्राज्याची कल्पना येते तेथे आठवा हेन्री, पंचम जॉर्ज अशा ओळखीच्या राजांची नावे आणि त्यांचे पुतळे आपण प्रत्यक्ष पाहतो तेव्हा इंग्लंडच्या साम्राज्यावरचा सूर्य कधीच मावळत नव्हता, असं आपल्यालाही वाटू लागतं.

आठव्या हेन्रीवरून आठवलं लहानपणी आमच्या शाळेत एकदा इन्स्पेक्शन होते मास्तरनी काळजीपूर्वक मुलांना वर्गात बसवलं होतं त्यातल्या त्यात हुशार मुलांना कडू कारल्याच्या भाजीवर साखर पेरावी तसं विखरून बसवलं होतं मी मागच्या बाकावर होतो इतिहासाचा तास होता माझा बावळट चेहरा पाहून इन्स्पेक्टरने नेमकं मलाच हेरलं मी उभा राहिलो त्याने प्रश्न विचारला, " आठवा हेन्री कशासाठी प्रसिद्ध आहे ?" ' डिव्हाईड ॲण्ड रूल ' ' बॅलन्स ऑफ पॉवर वगैरे होती नव्हती तेवढी तत्त्वं मी आठव्या हेन्रीच्या माथ्यावर मारून पाहिली पण इन्स्पेक्टरचे समाधान झालं नाही वर्गात शांतता पसरली मास्तरांच्या तोंडचं पाणी पळालं माझ्या अंगात कापरं भरलं इतक्यात मी ओरडलो, " त्याला आठ बायका होत्या " इन्स्पेक्टर खूष झाला मास्तरांचा जीव भांड्यात पडला

मी येथे शेक्सपिअरला जवळून पाहिलं. न्यूटनच्या पायावर डोकं ठेवलं इतक्या मोठ्या लोकांच्याजवळ जाता आले म्हणून जीवनाच सार्थक झाल्यासारखं वाटलं तेथून आम्ही बॅकिंगहॅम पॅलेसवर गेलो तेथे तोबा गर्दी जमली होती ' चेंजिंग ऑफ द गार्ड ' हा रोज होणारा शाही समारंभ पहावयाचा होता रुबाबदार घोड्यावर स्वार झालेले रुबाबदार पोशाखातील सैनिक पूर्वीच्याच रुबाबाने तो कार्यक्रम रोज करीत होते आणि लोक रोज उत्साहाने तेथे गर्दी करत होते. गतवैभवाची अभिमान आणि आस्थेने जपणूक करणाऱ्या लोकांची अस्मिता कोणी हिरावून घेऊ शकणार नाही याची मला खात्री पटली

बस रस्त्यातून भरधाव जात होती लंडन शहर मला बरचस फोर्ट विभागासारखं वाटलं ऑक्सफर्ड स्ट्रीटला खूप गर्दी होती तांबड्या डबलडेकर बसेस गर्दीतून वाट काढीत होत्या मध्येच एक वर टप नसलेली बसदेखील दिसली जर्मनीत घरात बसणारी आणि मोटारीतून बाहेर पडणारी माणसं येथे रस्त्यावर आलेली दिसत होती व्हिक्टोरिया स्टेशनच्या आसपासचा गलिच्छपणा या रस्त्यावर जाणवत नव्हता घरं छोटी छोटी, बगीचा असलेली पण बरेच दिवसात चेहऱ्यावर रंगरंगोटी न केलेली दिसत होती वयस्कर माणसं कोट, टाय आणि हॅट घालून नीटनेटकी वाटत होती. तरुण मंडळी जीनच्या पॅंटी घालून बेफिकीर असल्याचं भासवीत होती.

बस सेंट पॉल कॅथेड्रलवर थाबली जगातल दोन नंबरच मोठे असलेल या चर्चच डोम आम्ही पाहून घेतल इतकी चर्च पाहून झाली होती की त्यातला वेगळे-पणा आता कळत नव्हता आम्ही पायऱ्यांवर बसून देवाच दर्शन घेण्याच पसत केल. नतर थेम्स नदीवरचा टॉवर ब्रिज जवळून पाहिला हा भव्य ब्रिज पाहताना कलक-त्याच्या हावडा ब्रिजची आठवण झाली नतर टॉवर ऑफ लडनमधे जाऊन कोहि-नूर हिरा पाहण्यासाठी रागेत उभे राहिलो सबध प्रवासात रांगेत उभ राहण्याची ही पहिलीच वेळ दुधाच्या रांगेत बाटली ठेवून चालत, रॉकेलच्या रांगेत डबा ठेवून चालतो तस या कोहिनूर हिऱ्याच्या रांगेत ठेवण्यासारख आमच्याजवळ काहीच नव्हत त्यामुळे प्रत्येकजण स्वत च हिऱ्यासारखा रागेत उभा होता देशोदेशीचे लोक हिरे पाहण्यासाठी जमले होते चिनी होते, जपानी होते, रशियन होते, अमेरिकन होते, हिऱ्याची आवड सर्वांना सारखीच असावी

तास दोन तासानी आमचा नबर आला जागोजाग क्लोज सर्किट टीव्ही लावले होते तेथे प्रथमच स्वत ला टीव्हीत पाहून घेतल आजकाल सुंदर माझ घर, ज्ञानदीप वगैरे कार्यक्रमामुळे यच्चयावत बायकांना आणि महिलामडळाना टीव्ही हे मुक्तद्वार झाल आहे त्यामुळे बायकोला आरशात चेहरा पाहिल्यासारख या टीव्हीत काहीच स्वारस्य नव्हत शिवाय टीव्हीवर जाताना चागली साडी किंवा दागिने हे लोकांनी पाहवेत म्हणून घातलेले असतात ते स्वत चे स्वत च पाहणे ही कल्पना भोंगळ होती

माझ्या अगात लोकांसमोर येण्याचे धाडस नसल्याने मी स्वत ला स्वत समो-रच टीव्हीत पाहून घेतलं सभोवती पोलिसाचे कडे पडले होते मला भीती वाटली मी पँटचे खिसे चाचपले हिऱ्यासारखे दिसणारे दगड माझ्याजवळ नाहीत ना याची खात्री केली आमच्या देशातून आणलेले हिरे आम्ही चोरासारखे पाहणार होतो. शेवटी एका भव्य लोखडी तिजोरीत आम्ही शिरलो पुढे जातो तो डोळे दिपले निरनिराळ्या राजांच्या आणि राण्याच्या डोक्यावर शोभून दिसणारे हिऱ्यांचे मुकुट पाहून कमीत कमी त्याना हात तरी लावावा असे वाटले पण हात काय नुसती नजर लावण अशक्य होत एकाजागी उभ राहून हिरे पहायला बदी होती पुढे पुढे जाताना दिसतील तेवढेच पहायचे

या हिऱ्यानी जेवढा दुष्टपणा पाहिला होता त्यापेक्षा दुष्ट नजरा येथे आल्या असतील अशी भीती पोलिसाना वाटत असावी सर्व हिऱ्यांत कोहिनूर हिरा दिमा-खाने सर्वांच लक्ष वेधून घेत होता वास्तविक येथे ठेवलेल्या इतर बऱ्याच हिऱ्याना कोहिनूर म्हटल असत तरी मी त्याच भावनेने त्यांच्याकडे पाहिल असत पण कोहि-नूर या नावान त्या एका हिऱ्याची किंमत इतर हिऱ्यापेक्षा कितीतरी पटीन वाढली होती जो तो कोहिनूर हिरा कोठे आहे याच्या मागे लागला होता तो पाहिल्या-

वर इतर हिरे फारच कमी प्रतीचे आहेत असे उगाचच प्रत्येकाला वाटत होत

आजच्या दिवसापुरत तरी आता लंडनमधल दुसर काही एक पाहू नये अस मी ठरवल जेवणात शेवटली डिश जशी स्वीट डिश तशी ही स्वीट डिश होती तेवढ्यासाठी मी व्हिक्टोरियाला न जाता सरळ टॅक्सीने हॉटेलवर गेलो

दुसऱ्या दिवशी लिटील वुडस्, सेलफरीजेस वगैरे सुपरमार्केट पालथी घातली पण येथील खरेदी मला महागात पडली ट्यूबमधून येताना माझ पाकीट चोरीला गेल जागोजाग ' बिवेअर ऑफ थीव्हज ' अशा पाट्या होत्या पण मी तिकडे दुर्लक्ष केल होतं आपल्या रेल्वे स्टेशनावर जशी ' मे आय हेल्प यू ' अशा पाटीखाली एक रिकामी खुर्ची असते तसच या ट्यूबमधील पाटीच असाव अस वाटून या पाटीच्या आसपास चोर असतील अशी शंका मला आली नाही

हॉटेलवर आल्यावर लक्षात आल की खिशात एकही पौंड नाही माझ्याजवळ जर्मन मार्क होते पण त्याचे पौंड करण आवश्यक होत रात्रीचे दहा वाजले होते हॉटेलवर चौकशी केली रात्री अकरा वाजेपर्यंत बॅन्का उघड्या असल्याच कळल ह्या बँकाच मला नवल वाटल केवळ चलन देशोदेशीच्या चलनात बदलण्यासाठी येथे किराणामालाच्या दुकानांसारख्या जागोजाग बँका आहेत त्यातील कित्येक रात्री अकरापर्यंत उघड्या असतात मी मार्कचे पौंड केले खिशात पौंड आल्यावर जीवात जीव आला।

अजून एअरइंडियाचा संप चालू होता परतीच्या प्रवासाचे तिकीट नक्की करावयाचे होते युरोप टूरला निघावयास दोन दिवस अवकाश होता तेवढ्या वेळात ते करण आवश्यक होत नाहीतर टूरहून परत आल्यावर या भिकार हॉटेल-मध्ये राहण्यासाठी रोज सतरा पौंड मोजावे लागणार होते आणि या धास्तीनेच टूरवर निघण्याची मजा वाटत नव्हती एअर इंडियाच्या ऑफिसमध्ये गेलो तर प्रवाशाची ही झुंबड उडाली होती माझी परवड झाली नीट माहिती मिळेना ऑफिसमध्ये ऑफिसरशिवाय कोणी नव्हत आणि त्यालाही संप नक्की केव्हा मिटणार ते सांगता येत नव्हत. त्यान ब्रिटीश एअरवेज, लुफतान्सा वगैरे कंपन्याकडे जाण्याच सुचवल प्रत्येक ठिकाणी नकारघंटा वाजत होती मला हव्या असलेल्या तारखेच बुकिंग मिळत नव्हत मला उगाचच या सर्व दुर्घटनाच मूळ हे हॉटेल आहे अस वाटायच त्या हॉटेलमध्ये राहिल्यापासून एकही गोष्ट धड होत नव्हती

माझ्याजवळ काही ओळखीच्या भारतीय लोकांचे पत्ते होते पण एक दोन पत्ते शोधताना माझे दोन चार पौण्ड खर्च झाले होते आणि म्हणावा तसा उपयोग झाला नव्हता शेवटी मी आणखी एक चान्स घेण्याचे ठरवले कॅटिशटाऊनला एक पुणेकर राहत होता त्याचा पत्ता बायकोन आणला होता तेथे जातो तर अशा प्रकारचा घर नंबर येथे असूच शकत नाही अस कळल पत्ता लिहिताना मध्ये उभी

रेघ लिहिण्याच्या ऐवजी इग्रजी एक लिहिला गेला होता आणि तीन आकडी घर नबरचा पाच आकडी घर नबर झाला होता ही साधीशी चूक आमच्या शेवटच्या आशास्थानावर बोळा फिरवण्यास पुरेशी होती एका गोऱ्या माणसाजवळ चौकशी केली तर वेळ सपल्यावर तिकीटाची खिडकी बद करतात तसा त्याने घराचा दरवाजा बद केला पण आमचे ग्रह पालटले असावेत आम्ही एका घरासमोर उभे राहिलो आणि त्या घरावर नेमके आम्हाला हव्या असलेल्या माणसाची पाटी होती. आम्ही दारावरची बेल वाजवली त्यानतर आमचे जे स्वागत झाले त्याला तोड नाही शेवटी पुण्याच माणूस लडनला आमच्या मदतीला धावून आल हा आमच्या ट्रीपमधला सोन्याचा कळस ठरला

पुणेरी पाहुणचार माझ्या परिचयाचा होता कढीभातच करतील, फारतर जोडीला एखादी चटणी, पण आग्रह पुरणपोळीच्या बेतासारखा एका मध्यमवयीन गृहिणीने दार उघडले. आम्ही तिला पाहिले नव्हते आणि तिनेही आम्हाला पाहिले नव्हते, पण पुण्याची ओळख सांगितल्यावर तिन आम्हाला आत घेतल इतकच नव्हे तर घरी बसवून ठेवल व जवळच असलेल्या आपल्या नवऱ्याला बोलावून आणल

आता लंडनमधला एकच दिवस उरला होता रोज सध्याकाळी आम्ही पिकॅ-डलीला चक्कर मारून यायचो बाबुलनाथ किंवा महालक्ष्मीच्या पायऱ्यावर दोन मिनिट टेकल्याशिवाय देवदर्शनाच पुण्य मिळत नाही, तस लडनला गेल्यावर या पिकॅडलीच्या पायऱ्यांवर टेकल्याशिवाय लडनला येण्याच पुण्य पदरात पडत नाही

हा माणूस म्हणजे मुरब्यातल्या आंब्याच्या फोडीसारखा वाटला निराशेचे चटके खाऊन आमची जीभ चरचरीत झाली होती साहेब लोकानी प्रेमाचे चार शब्द फेकले नसतील असे नाही पण मला ते बेचव लागत होते "काका, तुम्हाला बटाटेवडे आवडतात का?" हा प्रश्न मला अनपेक्षित होता जन्मठेपेची शिक्षा झालेल्या माणसाला 'तू निर्दोष आहेस असा हुकूम यावा तस माझ झाल मी भारावून गेलो माझे ग्रह पालटल्याची खात्री झाली

माझ्या कुडलीतले ग्रह वक्री न जाता अचानक एकमेकाना पूरक झाले होते. ही किमया कशाने घडली ते कळण्यासारखे नव्हते भारतीय लोकशाहीच्या वळणा-वर माझी कुडली गेली होती बटाटेवडे खाताना पुण्याची हालहवाल कशी आहे यावर मिटक्या मारत चर्चा झाली पुण्याचा आणि बटाटेवड्याचा काहीतरी अन्योन्य सबध असावा पढरीची वारी जशी पाडुरगाचे दर्शन घेतल्याशिवाय पुरी नाही, तस पुण म्हटल की बटाटेवडा हवाच "लकडीपुलाजवळची घागरवाली अजून पाणी ओतते का हो?' 'मडईत आवटचुका या दिवसात स्वस्त मिळत असेल ना? 'मडईचा गणपती अजन शेवटी निघतो का?' वगैरे ढोबळ पुणेरी प्रश्न या

माणसाला लंडनमध्ये राहूनसुद्धा अजून जिव्हाळ्याचे वाटत होते. पुण्याच्या लोकांचं स्वतःचं असं पुणेरी वेगळं विश्व असतं. जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी भाऊमहाराजांच्या बोळातला बदल हा त्यांना जागतिक कीर्तीच्या बदलापेक्षा महत्त्वाचा वाटतो. रात्री पुणेरी पिठल्याची मेजवानी झाली. पुणेरी आग्रहाने आत्मा तृप्त झाला. आणि पुणेरी गप्पा मारता मारता ब्रह्मानंदी कधी टाळी लागली ते कळलेच नाही.

पुढील दोन दिवस या माणसाने आमची एवढी बडदास्त ठेवली की खरोखरीच काका त्याच्या लाडक्या पुतण्याला भेटायला लंडनला आला. की काय असं मला वाटू लागलं. आम्ही त्याच्याबरोबर पुन्हा नव्यानं लंडन पाहिलं. आता तेच लंडन मला अधिक आकर्षक वाटू लागलं. शिवाजीपार्कपेक्षा हाईडपार्क कितीतरी मोठं आणि आकर्षक आहे हे लक्षात आलं. ऑक्सफर्ड स्ट्रीट लोहार स्ट्रीटपेक्षा कितीतरी गजबजलेला आहे हे न सांगताच पटलं. पिकॅडली महमदअली रोडइतकी बकाल नाही असं मनोमन वाटलं.

युरोप टूरवर जाण्यासाठी मोजकं सामान बरोबर घेतलं आणि बाकीचं येथेच ठेवून प्रथम बेल्जियमच्या दिशेने कूच केलं.

प्रकरण आठवे

# हिरवा समुद्र

मी कॉसमॉस टूरविषयी भारतात बरच ऐकल होत त्याची पत्रकही बरीच गोळा केली होती प्रथम कुठली टूर घ्यावी याविषयी मनात खूप सदेह होता अॅमस्टरडॅमपेक्षा ब्रूसेल्स चांगल की जिनेव्हास न थाबता सरळ खाली रोमला जाव याविषयी काहीच निर्णय घेता येत नव्हता लहानपणी ड्रॉइंगच्या ऐवजी संस्कृत घ्याव की इतिहासाच्या ऐवजी समाजशास्त्र घ्याव याविषयी माझा असाच गोधळ उडायचा दोन्हीही विषय सारखेच अगम्य मग मी शिकवणाऱ्या शिक्षकांचा किवा शिक्षिकेचा स्वभाव कसा आहे यावर विषय निवडा-वयाचो आमचे डॉइगचे मास्तर फार तापट होते त्यांचे दोन-तीन मोठे लाकडी कपास मी पुढे केलेला हात अचानक मागे घेतल्याने हातावर न बसता मेजावर आपटून मोडले होते शेवटी मी ड्रॉइग सोडून दिल आणि सस्कृतच्या मास्तरांच्या हातात शेंडी दिली यावेळी टूर निवडताना मी ग्रहांना जास्त महत्त्व दिल जी टूर शनिवारी सुरू होते त्या टूरने जायचे ठरवले शनिवार हा घात वार असला तरी मला तो सात वारात सर्वांत अनुकूल आहे अस माझ्या लक्षात आल होत शाळेत असताना इतर वारी गृहाभ्यास केला नाही तर मास्तर बाकावर उभ करीत असत पण शनिवारी साप्ताहिक सुट्टीची गडबड असल्याने या किरकोळ गोष्टी तपासायला त्यांना सवड नसे

मी ह्या टूरच बुकिंग जर्मनीहून केल तेव्हा लडनला पोस्टाचा 'गास्लो' चालू असल्याने पत्र यायला एक एक महिना लागत असे म्हणून फोनवरच सगळी

व्यवस्था केली व चेकने पैसे पाठवले बेल्जियम, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, इटली आणि फ्रान्स हे पाच देश टूरसाठी निवडले माझ्याजवळ या देशाचे व्हिसे नव्हते ते जर्मनीतूनच घ्यावयाचे होते म्हणून फोनवर न्युरेनबर्गमधल्या एका टूरिस्ट ऑफिसशी संपर्क साधला जर्मन भाषेत फोनवर बोलणं महाकर्मकठीण त्यात व्हिसा किती दिवसांचा हवा, तो सिंगल एन्ट्री की मल्टीपलएन्ट्री हवा असे नाना प्रश्न टूरिस्ट ऑफिसच्या मार्फत कर्मचारिणीने विचारले

मी 'हो' आणि 'नाही' या अर्थी शब्द वापरून जेवढे प्रश्न सोडवता येतील तेवढे फोनवर सोडवले त्याचा परिणाम हल्लीच्या 'ऑब्जेक्टिव्ह मेथड' च सुटसुटीत परीक्षा प्रकारासारखा झाला पासापुरते मार्क मिळायला अडचण पडली नाही पन्नास टक्केच व्हिसे खऱ्या अर्थाने बरोबर असल्याचे लंडनला आल्यावर कळले कॉसमॉसच्या ऑफिसमध्ये गेलो तर त्या फटाकड्या पोरी नीट बोलायला तयार नाहीत. माझे व्हिसे बरोबर आहेत का म्हणून विचारले तर "ते आमचे काम नाही" असे सांगितले मला वाटलं हा खुर्चीचा प्रभाव असावा माणूस खुर्चीवर बसला की त्याच्या अंगात ही खुर्ची संचारत असावी यापुढे समस्त लोकांना खुर्चीवर न बसता काम करावयास लावले तर देशाची प्रगती अधिक होईल असा माझा ठाम विश्वास आहे. शिवाजीच्या वेळी घोड्यावर बसून मावळ्यांनी स्वराज्याच्या सीमा हा हा म्हणता सह्याद्रीच्या पलीकडे नेऊन भिडवल्या पेशव्यांनी तक्क्याशी बसून राज्यकारभार हाकला आणि अटकेपार झेंडा फडकवला भारतात तरी हा खुर्चीचा रोग अलीकडे फारच बळावला आहे खुर्ची काढून घेतली की तोच माणूस सुतासारखा सरळ येतो या खुर्चीच्या रोगाने मला लंडनलाही खूप सतावले शेवटी मी माझे व्हिसे पलीकडे उभ्या असलेल्या एका युवतीला दाखवले आणि तिने मला बेल्जियम आणि फ्रान्स या देशाचे व्हिसे पुन्हा काढावयास सांगितले ते सिंगल एन्ट्री व्हिसे होते आणि या दोन देशाच्या सीमा आम्ही अधिक वेळा पार करणार होतो

दुसऱ्या दिवशी मोजके सामान घेऊन आम्ही व्हिक्टोरिया स्टेशनवर आलो यात्राकंपनीतली लोकं म्हणून एक प्रकारच्या कुतूहलाने इतर प्रवासी मंडळी आमच्याकडे पाहत होती एकाच वेळी इतरही अनेक टूर्स निघणार असल्याचे येथे आल्यावर कळले आमचा टूरनंबर ३४३२ असा होता त्याप्रमाणे प्रत्येकाला सामानावर चिकटवण्यासाठी बिल्ले देण्यात आले ज्याच्याजवळ या नंबरचा बिल्ला होता तो माणूस आम्हाला आपला माणूस असे वाटू लागले ब्रिटिशरेल्वे आम्हाला डोव्हरला जायचे होते डब्यात सामान चढविण्यात आले. सर्व सहप्रवासी एकमेकाशी नुसतीच तोंडओळख करून घेत होते. कोणी हसत का म्हणून डोळ्यामधले भाव तपासून पाहत होते डोव्हरला जाईपर्यंत सर्वांच्या नजरा बराच वेळ खिडकीबाहेरच खिळल्या होत्या बाहेर काही विशेष पाहण्यासारखे होते म्हणून नव्हे पण इंग्लिश-

खाडीपलीकडे काय असेल याची चित्रे प्रत्येकजण रंगवत असावा जर्मनी सोडल्या-वर प्रथमच मधूनमधून जंगल किंवा शेती नसलेला जमिनीचा ओसाड भाग दिसायचा आणि आपण भारताच्या आता जवळ येत चाललो असा सुखवणारा विचार नकळत माझ्या मनाला स्पर्श करून जायचा

कोणत्याही टूरवर निघताना टूरचे बुकिंग केल्यापासून ते टूर प्रत्यक्ष सुरू होईपर्यंतचा काळ हा मनाला अधिक रिझवीत असतो प्रथम टूरची माहिती देणारी पत्रक वाचताना मन सुखावत ओस्टेंडच्या किनाऱ्यावरन आमच्या लक्झरी कोचन ब्रुसेल्सला या लुझेर्न लेकवरच्या पचतारांकित हॉटेलवर रहा अलबर्ग पासमधून निघून इन्सब्रुकला थांबा डोलमाईडच्या डोंगरांना जवळून पहा व्हेनिस आणि फ्लॉरेन्सच सौंदर्य अजमावा रोमन वैभव डोळ्याखालून घाला आणि पॅरिसच्या रात्रीची मजा लुटा अशी पत्रक डोळ्यांखालन घालताना माणूस जास्त सुखावतो या सुखाचा कळस टूर सुरू व्हायच्या एक-दोन दिवस आधी होतो हातात निर-निराळ्या सूचना पडू लागतात, हॉलीडे चेकलिस्ट पुन्हा पुन्हा तपासून पाहण्यात परीक्षेची तयारी पूर्ण झाल्याचा आनद असतो. ट्रॅव्हलर चेक्स पुन्हा मोजले जातात कॅमेरा सज्ज केला जातो लगेजवर पद्धतशीर नाव-पत्ता लिहिला जातो एवढच काय घरातले सगळे अन्नपदार्थ भूक नसताना सपवले जातात. तशात टूरमध्ये पास-पोर्ट, व्हिसा, फ्लाईट नबर, कोच सीटस् अशा वजनदार शब्दांचा सबध आला तर टूरचा आनद वेगळाच

डोव्हरला ट्रेनचा प्रवास सपला आणि बोटीचा सुरू झाला तीन-चार हजार माणसांना घेऊन जाणारी प्रचड बोट होती सर्वांत वरच्या डेकवर रेस्टॉरंट होते एका वेळी पाच-सहाशे माणस बसू शकतील एवढे मोठे डेकवर गार वारा सुटला होता इग्लडचा किनारा भरधाव मागे पळत होता अजून टूरवरच्या प्रवाशांची ओळख झाली नव्हती. पण काही प्रवासी जागा मिळवण्याच्या निमित्तान म्हणा किंवा वर्तमानपत्र वाचण्याच निमित्त काढून एकमेकाशी ओळख करून घेत होते

माणूस एकदा प्रवासी झाला की, तो आपले स्थायीभाव विसरतो मग इग्लिश माणूस देखील जागा पकडण्यासाठी धावतो जर्मन माणूस देखील सामानाचे डाग दर अर्ध्या तासाने मोजून बघतो किंवा बेल्जियम माणूस देखील सिगारेट लाईटर आहे का म्हणून विचारायला सकोच करत नाही तर फ्रेंच माणूसदेखील आपण पुढे केलेल्या चकल्या आवडीने खातो इतक्यात ग्रीनमध्ये माझ्याबरोबर जर्मन शिकत असलेला विल्यम नावाचा इग्लिश माणूस मला बोटीत भेटला त्याने गुडमॉर्निंग न करता 'गूटनमॉर्गेन' केले दोघांच्या जर्मनची फेरउजळणी झाली आणि मला जर्मन येत असल्याचे पाहून माझी वरवर चौकशी करणारे इतर प्रवासी माझ्याशी दोस्ती करू लागले.

भाषा हा एक प्रचंड शक्ती असलेला दुवा आहे. वाण्याच्या दुकानात 'चोखा सू भाव आपे छे' असं विचारून पहा दोन पैसे तो तुम्हाला स्वस्त मिळेल. बंगलोरला जाणाऱ्या ट्रेनमध्ये 'स्वल्पा जगा कुडरी' असं म्हणून पहा लोक लगेच सरकून बसतील. इटली आणि फ्रान्स सोडून माझ्या संबंध टूरमध्ये जर्मन भाषेचा मी गांधी टोपीसारखा उपयोग करीत होतो. ती डोक्यावर चढवली की कोणतेही काम सुकर. मग त्या टोपीच्या खाली काय दडवलें आहे याचा कोणी विचार करीत नाही.

बेल्जिअमचा किनारा आता दृष्टीपथात येऊ लागला. आमची बोट ओस्टेंडच्या धक्क्याला लागली. समुद्राच्या पाण्यावर रंगीबेरंगी शिडाच्या लहान लहान होड्या हेलकावे खात होत्या. रुबाबदार बांधा असलेली गोरी गोरी माणसं शॉर्टस् घालून ऐटीत होड्या समुद्रात तीरासारख्या सोडत होती. या लोकांच्या चेहऱ्यावरून प्रचंड उत्साह ओसंडत होता. शनिवार असल्याने युरोपमधला तो अती उत्साहाचा वार होता. येथे दर शनिवार-रविवार गोविंदाच्या उत्साहाने साजरा होतो. ओंजळभर पाणी अंगावर पडेल की काय या भीतीने साजरा केलेला वर्षातील एक गोविंदा येथे दर शनिवार-रविवार प्रचंड उत्साहाने साजरा होत होता. आमची मनं त्या उत्साहात न्हाऊन निघाली होती. पाण्यात डुबण्याचं धाडस केलं नाही तरी बिअरच्या पेल्यात दोन-चार वेळा मनसोक्त डुबून घेतलं आणि सिगारेटच्या धुराच्या शिडांत वारा भरला. शनिवारी सुरू होणारी आमची टूर खऱ्या अर्थाने मानवली होती.

किनाऱ्यावर कॉस्मॉसचे कोरे करकरीत कोच ओळीने उभे होते. एका कोचवर ३४३२ हा नंबर लिहिला होता. तो आमचाच आहे हे कळायला वेळ लागला नाही. ॲना नावाच्या चाळीशी गाठलेल्या पण विशीचा उत्साह असलेल्या बेल्जीयम युवतीने आमचे स्वागत केले. नंबराप्रमाणे सर्वांना बसवण्यात आलं. सामान कोचच्या सीटखाली असलेल्या जागेत ठेवण्यात आलं आणि मंद संगीताच्या धुंदीत बस ब्रुसेल्सकडे निघाली.

वाटेत सुंदर हिरवीगार शेतं, मध्येच शेतात चरणारा गाईंचा कळप. क्वचितच दिसणारी पवनचक्की आणि समोर दूरवर जाणारी रस्त्याची वाट. बस भरधाव जात होती. आजूबाजूचा परिसर तिथल्या सुबत्तेची साक्ष देत होता. क्वचितच एखाद्या टेकडीवर एखादं टुमदार घर दिसायचं. मनात विचार यायचा की या निर्जन प्रदेशात असा एकटाच कोण येऊन राहतो. मग वाटायचं, हिमालयात वास्तव्य करणारे ऋषीमुनी आता भारत सोडून इकडे रहायला आले असावेत. मैलोगणती गेलं तरी रस्ता गुळगुळीत. जणू काही काचेचाच केला आहे की काय असं वाटावं, पोटातलं पाणीच काय पण बायकोच्या कानातली रिंगसुद्धा हलताना दिसत नव्हती. रस्त्यात कोठेही दुरुस्तीचं काम चालू नव्हतं. म्युनिसिपालटी किंवा

पीडब्ल्यूडी याच्या ताब्यात रस्ते दिले नसावेत

ड्रायव्हरचं नाव अँद्रे होतं तो पण बेल्जीयमचा होता अँद्रे आणि ॲनाची जोडी रंगेल होती आणि बसमधलं वातावरण अधिकच धुंद होत होतं अँद्रे पंचविशीचा उमदा तरुण होता बस इतक्या सफाईने चालवायचा की ब्रेक आणि हॉर्न वापरण्याची येथे बंदी आहे की काय असा संशय येऊन मी त्याबद्दल त्याला विचारलसुद्धा मी एकदा गोव्याला बसनं गेलो होतो ती बस या कोचपेक्षा कमी प्रतीची होती असं म्हणता येणार नाही पण सबंध रात्र ब्रेक आणि हॉर्न यांच्या जुगलबंदीने कान आणि जीभ निकामी झाली होती प्रवाशानी बसमध्ये कमी बोलावं म्हणून मी उपाययोजना केली असावी इथला साराच प्रकार उलटा होता ॲना सर्वांना काहीतरी विनोद सांगा, गाणी म्हणा, इतकंच काय पण गँगवेमध्ये नाचालासुद्धा प्रवृत्त करत होती नाच म्हणजे कथ्थक किंवा भांगडा नव्हे तर मंद संगीतावरचा बॉलडान्स

शेवटी शेवटी तर प्रत्येकाला एक विनोद सांगण्याची तिने सर्वांवर सक्तीच केली माझी परिस्थिती बिकट झाली मला खिजवायला बायकोला आयतीच संधी मिळाली "काहो, आपल्या घरी पार्टी करता तेव्हा मोठ्याने खिदळत असता मग आता दातखिळी बंद का ?" तिला कोठे माहीत होतं की मी विनोद सांगताना हसत नसून ते ऐकताना हसतो ते शिवाय येथे तर ऑस्ट्रेलियन, जपानी, अमेरिकन असे निरनिराळ्या पुढारलेल्या देशांतले प्रवासी येथे चावडी नाक्यावर केलेले पांचकळ विनोद सांगून थोडंच चालणार

पण ही संधी दवडून चालणार नव्हतं. मित्र मिळवायचं विनोदासारखं चांगलं साधन नाही मी धीर चेपला "एक अमेरिकन, एक जपानी आणि एक भारतीय असे तीन मित्र बसने प्रवास करीत होते आपआपल्या देशाची महती एकमेकांना अहमहमिकेने पटवून देत होते अमेरिकन म्हणाला, 'आमच्या, देशातली जेट विमानं जवळजवळ आकाशाला जाऊन भिडतात म्हणजे अगदी आकाशाला नाही, पण थोडे खाली' त्यावर जपानी म्हणाला, 'हे तर काहीच नाही आम्ही सबमरीन शोधून काढली आहेत ती तर चक्क पॅसिफिकच्या तळाशी जातात म्हणजे अगदी तळाशी नव्हे, जरा वरून' आता भारतीय माणसाची पाळी होती. त्याची परिस्थिती बिकट झाली तो धीर करून म्हणाला, 'आम्ही जेवणाची एक अभिनव पद्धत शोधून काढली आहे आम्ही नाकाने जेवतो' सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला मग तो पुढे म्हणाला, 'म्हणजे अगदी नाकाने नव्हे, त्याच्या थोडे खालून'"

बस भरधाव चालली होती हास्यविनोदाच्या लहरीत बाहेरचं वातावरण अधिकच खुलून दिसत होतं ऑगस्ट महिना असल्यानं रस्त्याच्या कडेनसुद्धा पिवळी-तांबडी फुलं आली होती क्वचितच एखादं खेडं वाटेत लागायचं आणि गुलाबाच्या

फुलांनी बहरलेल्या बागांनी आमचं स्वागत व्हायचं. दर दोन-तीन तासांनी चहा, कॉफी, बिअरसाठी दहा-पंधरा मिनिटांची विश्रांती असायची. अशावेळी नुकतीच तोंडओळख झालेलं जपानी जोडपं विचारायचं, 'तुझं नाव काय?' "तुम्ही इंडियन की पाकिस्तानी?' आणि इंडियन म्हटल्यावर ते कथ्थकमधली एखादी पोज करून दाखवायचे. अलीकडच्या काळात भारताची ओळख बाहेरच्या देशात नाचणाऱ्यांचा देश अशी झाली असावी.

हळूहळू आमची बस ब्रुसेल्सच्या रस्त्यावरून धावू लागली. सुरवातीला ऑलिंपिकचं सुंदर स्मारक लागलं. बेल्जियम हा छोटासा देश जर्मनीइतकाच समृद्ध आहे, हे आतापर्यंतच्या प्रवासावरून स्पष्ट दिसत होतं. जेवणाचा पहिला हॉल्ट आला. आमची सोय रामदा हॉटेलमध्ये करण्यात आली. हे पंचतारांकित हॉटेल मिळाल्यामुळे आमची गाईड टुणटुण उड्या मारत होती. रहायची खोली सर्व आधुनिक साधनांनी सुसज्ज होती. खाली घातलेला गालीचा दोन इंच वाढलेल्या हिरव्या गवतासारखा होता. त्यावरून चालताना बागेत फिरल्याचा आनंद मिळत होता.

बुफे पद्धतीचं जेवण होतं. सुरवात प्रसिद्ध दोटवाईनने झाली. बऱ्याच दिवसांनी बायकोला राजेशाही जेवण देता येईल आणि पुढील चारपाच वर्षं त्या जेवणाची आठवण करून भागवता येईल अशा खुषीत मी होतो. पण नशिबात नव्हतं. बायकोचा नेमका हरतालिकेचा उपास निघाला. हे बायकांचे उपास बरेच वेळा असे मोक्याच्या वेळी कडमडतात. बरं हा हरतालिकेचा उपास असल्यामुळे "जन्मोजन्मी हाच" वगैरे प्रकरण जरा सिरीयसच घ्यावं लागतं. बायको जेवत नाही हे पाहून ऑस्ट्रेलियाच्या कूपर कुटुंब उर्फ जॉली कपलनं (त्यांनीच आम्हाला जॉली कपल म्हणा म्हणून विनंती केली होती) कुतूहलानं विचारलं. मग उपास म्हणजे काय आणि त्यात हरतालिकेचा उपास कसा महत्त्वाचा हे पटवून देताना जवळजवळ सर्वच टूरिस्ट मंडळींची करमणूक झाली. एका जन्मात एकच नवरा कशासाठी हेच ज्यांना पटत नाही त्यांना 'जन्मोजन्मी हाच पाहिजे' हे सांगणं म्हणजे 'आजोबाच्या बग्गीतूनच जगप्रवास करा' असं सांगण्यासारखं होतं. बायको हरतालिकेचं पुण्य साठवीत होती आणि मी लज्जतदार जेवण घेऊन ते खर्च करीत होतो. पापपुण्याचा भारतामधला समतोल अलौकिक होता.

दुसऱ्या दिवशी अर्डेन्सच्या घनदाट जंगलातून वाट काढीत बस भरधाव निघाली आणि लुक्झेंबुर्ग हा छोटासा संस्थानी थाटाचा देश केव्हा गाठला ते कळलंच नाही. येथली छोटी छोटी खेडी म्हणजे जागतिक उलाढालींची झळ न पोचलेली पण सर्व आधुनिक साधनांची सुविधा लाभलेली, निसर्गाच्या साम्राज्यात आपल्या तालबद्ध संगीताची लय मिसळणारी, फळाफुलांनी सतत हसणारी आणि जाणाऱ्या-येणाऱ्या प्रवाशांना हातांने आणि हलऱ्या मुखाने आपल्या आनंदात सहभागी करून घेणारी

वाटेत येणारी दहा-पंधरा मिनिटाची विश्रांतीसुद्धा येथील जीवनाचा आनंद लुटण्यास पुरेशी होती

आता थोड्याच वेळात जगाच काश्मीर असलेल्या स्वित्झर्लंडची हद्द सुरू होणार होती आपण स्वित्झर्लंडमध्ये पाय ठेवणार ही कल्पना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर जीवनाच सार्थक झाल्याची भावना फुलवीत होती फ्रान्सच्या हद्दीतून आता स्वित्झर्लंडच्या हद्दीत शिरावयाचे होते कोणत्याही देशाची बॉर्डर म्हटली म्हणजे संगिनी रोखलेल्या जवानानी स्वागत होणार अशी माझी समजूत होती, पण युरोपात ती बरेच वेळा खोटी ठरली येथे तर भिकभटाच्या ओसरीवरून उतरून जनूतात्याच्या परसात शिराव तसा देखावा होता चक्क भिकभट आणि जनूतात्यांनी एकमेकांची खुशाली आपआपल्या परसांतूनच विचारावी तशी दोन्हीकडली शिपाईमडळी एकमेकाच्या सुख-दुःखाची देवाण-घेवाण करताना दिसत होती अर्थात् बसमध्ये चढून आशियाई मडळींचे पासपोर्ट तपासण्याचे सोपस्कार झालेच लग्नसमारभासारख्या आनदाच्या सोहळ्यातसुद्धा गडीमाणसांना वावरताना सांभाळून वावराव लागत तस आम्हाला वाटल

स्विसऱ्हाईन लँडमधून जाताना पुन्हा एकदा जर्मनीतल्या ऱ्हाईनच्या परिसराची आठवण झाली भेटकार्डावर छापलेली अप्रतिम खेडी आणि ही प्रत्यक्षातली खेडी पाहताना कोणत खेड अधिक सुदर हे ठरवण कठीण जात होत प्रत्येक घर रंगीबेरंगी वेलींनी, फुलानी न्हाऊन निघाल होत जर्मनी, बेल्जियम, इग्लडमध्ये बागेत बागडणारी फुल येथे घराच्या अगाखांद्यांवर खेळत होती जागोजाग विस्तीर्ण तलाव लागत होते त्यांत रंगीबेरंगी होड्या हेलकावे खात होत्या सुरेख, सुदर, मोहक वगैरे शब्दाच्या पलीकडे आम्ही जाऊन पोचलो होतो २६ मैल लांब आणि ७०० फूट खोल असलेल्या लुझर्न लेकच्या नाकावर बसलेल्या 'हॉटेल लुझर्न'मध्ये सध्याकाळचा मुक्काम पडला बायकोने हरताळकेच्या उपवासाची भरपाई हॉटेल लुझर्नमध्ये केली

दुसऱ्या दिवशी लुझर्नच्या बाजारपेठेत फेरफटका मारला प्रथम स्विस घड्याळाच दुकान गाठल मगठीतली घड्याळ, लॉकेटमधली घड्याळ, स्प्रिंगच्या बाहुलीची घड्याळ, कुककुक ओरडणारी घड्याळ असे घड्याळाचे नानाविध मोहक प्रकार आणि स्विस फ्रँकही जबरदस्त प्रथम फ्रँकमध्ये किंमत विचारायची. तिचे पौंड करावयाचे मग ते जर्मन मार्कमध्ये पडताळून पहायचे आणि शेवटी त्यांचा रुपयात हिशोब करायचा येवढं होईपर्यंत जीव मेटाकुटीला यायचा आणि खरेदीतला उत्साह ओसरायचा

तशात आमच्याशी विशेष दोस्ती केलेली मादाम टान च्यू जोह ही चिनीबाई प्रत्येक गोष्ट तिच्या सिंगापूर डॉलरमध्ये केवढ्याला ते विचारायची कमीत कमी

किमतीचं घड्याळ, कमीत कमी किमतीच्या गळ्यातल्या माळा आणि पाच-सहा भेटकार्डं हा खरेदीचा सर्वसाधारण थाट असायचा. अपवाद होता तो वीस-बावीस वर्षांच्या कॅनडियन ज्यूलीचा. तिच्याजवळ खूप अमेरिकन डॉलर असावेत. प्रत्येक दुकानातून हातात मावेल आणि चांगलं दिसेल ते सर्व घेण्याचा हव्यास. भराभर चेक फाडून द्यायची. मग तिनं घेतलेल्या वस्तू किती सुंदर आहेत ह्याचं कौतुक करण्यातच बाकीची मंडळी खरेदीचं समाधान मानून घ्यायची.

ल्यूझेर्न लेकवरचा पादचाऱ्यासाठी असलेला लाकडी पूलसुद्धा फुलांच्या वेलींनी सजवलेला. त्याच्या आतल्या बाजूला स्वित्झर्लंडचा इतिहास सांगणारी रंगीत हँड-पेंटिंगज् लावलेली. पलीकडच्या वाहतुकीच्या पुलावरून मधूनच ट्राम जायची. पादचाऱ्यांमध्ये स्वित्झर्लंड पाहावयास आलेल्या प्रवासी लोकांची गर्दी अधिक. इथलं वातावरण इतकं मोहक होतं की, अजनही नुसत्या आठवणीनं अंग फुलून निघतं. आपण एखाद्या हिरव्या समुद्रावरच वस्ती केल्याचा भास होतो.

स्वित्झर्लंडहून बसचाही पाय निघत नव्हता. संबंध प्रवासात टंगळमंगळ न करणारी बस स्वित्झर्लंडला अळटळ करू लागली. तिची समजूत काढण्यात चार तास गेले. इतक्या मोक्याच्या ठिकाणी रुसून बसली म्हणून सर्वंचजण तिच्यावर फिदा होते. लेक वॅलेनच्या चढ-उतारावरून वळसे घेताना ती मधूनच गुरगुरत होती. शेवटी लीचस्टाईन हे सरजामशाहीतलं छोटंस संस्थानवजा राज्य आलं आणि तिला स्वित्झर्लंड सोडल्याची खात्री पटली. ६००० फूट लांबीचा अर्लबर्ग पास तिनं केव्हाच पार केला आणि इन्सब्रुक केव्हा आलं ते कळलंच नाही. ही ऑस्ट्रियाची जुनी राजधानी छोट्या छोट्या डोंगराच्या कुशीत वसलेली.

येथे आम्ही सोन्याचं छप्पर असलेला राजवाडा पाहिला. एका राजाचं म्हणे दिवाळं निघालं, पण आपण दरिद्री नाही हे जगाला दाखवण्यासाठी बेट्याने घराच्या बाल्कनीच्या छपराला चक्क सोन्याची कौलं बसवली. तो राजा गेला. ती प्रजा पण गेली, पण हॅब्सबर्ग राज्याची आठवण करून देणारी ही सोन्याची कौलं मागे उरली.

प्रकरण नववें

# पाण्यातला स्वर्ग

बसने ऑस्ट्रियाची हद्द सोडली आणि ती इटलीच्या दिशेने धाव घेऊ लागली वाटेत जागोजागी प्रचड टनेल्समधून ती जात होती आणि डोंगराळ प्रदेश असूनसुद्धा चढ-उताराने येणारा शीण तिला जाणवत नव्हता जागोजाग टनेलमध्ये शिरण्यापूर्वी टोल भरावा लागत होता एक टनेल तर जवळजवळ चौदा किलोमीटर लाब होते म्हणजे ठाण्याहून निघावयाचे व शीवला बाहेर पडावे इतके लांब वेळ वाचवण्या-साठी डोंगरांच्या दोन्ही बाजूनी ही टनेल खणावयास सुरुवात करून ती एकमेकांना जोडली होती ती एकमेकाना इतकी बिनचूक भेटली कशी याचे मला कौतुक वाटत होते पुणा का कुठल्याशा जिल्ह्यातल्या इदापूरला बांधावयाच्या एस् टी डेपोला कुलाबा जिल्ह्यातल्या इदापूरला जावे लागल्याचे मला माहीत होते जमिनीवर बाधावयाच्या डेपोची ही अवस्था तर चक्क जमिनीखाली बांधलेल्या टनेलचे काय होईल याची मला चिंता वाटत होती

वाटेत ब्रेनरपासमधून जाताना डोलमाईटचे डोंगर लागले लग्नाच्या वरातीत जशी डोक्यावर बत्त्या घेऊन माणसं असतात तसं हे डोलमाईटचे डोंगर आपल्या डोक्यावर पेटती मशाल घेऊन निघाल्यासारखे वाटत होते डोंगरांचे उंच उंच सुळके जणू आग ओकत होते हळूहळू वनश्रीचे रूप पालटत होते हिरव्यागार झाडीतून बोडकी पठारे डोकावू लागली होती बोचरे वारे थोडे उबदार झाले होते आखीव रेखीव शेती आता थोडी स्वच्छंदी झाली होती मधेच एखाद खेड येई आणि जुनी घर, पडक्या भिंती, क्वचित इतस्तत पडलेल अडगळीच सामान यामुळे आता खेड्याला खेड म्हटल तरी हरकत नाही, असं वाटू लागल होत इटली हा देश

गरीब आहे, असं जर्मनीत ऐकलं होतं त्याच्या या खुणा असाव्यात सध्याकाळी सहा वाजता बसनं व्हेनिस गाठलं आणि आमची नाश्त्याला या हॉटेलमध्ये सोय करण्यात आली

या हॉटेलमध्ये प्रथमच गार लादीने आमचे स्वागत केले शौचासाठी सामाईक कूपाचा वापर करावा लागला आणि स्वच्छतेनं आम्ही भारताच्या अधिक जवळ आल्यासारखे वाटले आणि खरोखरच ते एका अर्थाने खरे होते आधुनिक मूल्यानी भारताप्रमाणेच गरीब वाटणारा हा देश संस्कृती आणि प्राचीन वैभवाने खूपच श्रीमंत होता हे पुढील तीन दिवसांच्या वास्तव्यात कळून आले

सकाळी आम्ही बोटीने व्हेनिस ही स्वप्ननगरी पाहावयास निघालो कल्पने-पेक्षाही रम्य असं जिचं वर्णन करता येईल अशी ही नगरी पाहून डोळ्यांचं पारणं फिटलं १२० छोट्या बेटाना कालव्यानी आणि जवळजवळ ४०० छोट्या मोहक पुलानी जोडून वसवलेलं हे हजार वर्षांपूर्वीचं शहर अजूनही जुन्या वैभवानं नटलेलं पाहून डोळ्यांवर विश्वासच बसत नाही खऱ्या अर्थानं ही स्वप्ननगरी प्रत्यक्षात भूतलावर अवतरल्याची साक्ष पटते येथील सारे व्यवहार पाण्यातूनच श्रीनगर-मधल्या शिकाऱ्यासारखीच येथे गोंडोलाची ऐट गोंडोलातून जाताना हाताला लागणारं पाणी जितकं स्वच्छ आणि उफाळणारं तसंच येथल्या गोंडोला चालवणाऱ्या लोकाचं मन प्रेमळ आणि उत्साहानं फुलणारं

येथे येणारे बहुतेक लोक हौशी प्रवासी त्यामुळे येथील वातावरणही कायम हलकफुलकं त्यात गोंडोला चालवणाऱ्याची संगीताची साथ आळसटलेलं ७० वर्षांचं मनही येथे केव्हाच विशीच्या उत्साहाने ओसंडून जातं गोंडोलातून जाताना समोरून भरधाव येणारी एखादी मोटारबोट पाणी उडवून जाते तर एखाद्या लॉंचमधली माणसं प्रेमाचा निरोप घेतात आणि हे सगळं दुतर्फा वर्षानुवर्षे उभ्या असलेल्या प्रचंड इमारतींच्या साक्षीनं अचंबा वाटतो तो जेव्हा एखादा छोटासा मुलगा सायकल फाटकाशी उभी करावी तशी आपली होडी एखाद्या इमारतीजवळ उभी करतो आणि पटकन घरात जातो तेव्हा माशानंतर पाण्यात राहणारा प्राणी कोणता या प्रश्नाला ' व्हेनिसचा इटालियन ' असं कोणी चुकून उत्तर दिलं तर वावगं होणार नाही जरा पुढे जावं तर एखाद्या छोट्या नक्षीदार पुलाखालून आपली होडी जाते, पण सगळ्यांचे डोळे लागलेले असतात ते सेंट मार्क स्क्वेअर कधी येतो त्याकडे मथुरेला गोपाळकृष्णाच्या देवळाकडे जाताना लागणारे बारकेबारके बोळच जणू या खिस्ताच्या देवळाकडे आपल्याला घेऊन जातात तसेच छोटे बोळ, त्याच्या दुतर्फा छोटी छोटी दुकानं आणि ह्या दुकानांत शोकेसमध्ये मावतील एवढ्या छोट्या छोट्या वस्तू

पर्सवर सुरक्षित नजर ठेवूनच सगळी खरेदी उरकायची कधी कधी अचंबा

वाटायचा तो गाईडने केलेल्या इटलीच्या वर्णनाचा मोडक्या तोडक्या इग्रजीत तो सागायचा की इथली मुल उनाड आहेत शाळेत फीवाढीविरुद्ध स प करतात मास्तरांना दमदाटी करतात गाईड वयस्कर होता आणि वाढत्या वयाने वाढलेले पिढीतील अतर त्याच्या वर्णनात इटलीतील सामाजिक जीवनाची उची कमी झाल्याची जाणीव करून देत होती ही जाणीव आम्हाला उपयोगी पडली कारण या गल्ली-बोळातून जाताना हातसफाईचे अनेक नमुने पहावयास मिळाले. आणि इटालियन लीरानी भरलेल्या आमच्या पर्सेस आम्ही सेंट मार्क स्क्वेअरमध्ये शिरेपर्यंत सुरक्षित ठेवू शकलो

नेपोलियनने म्हटल्याप्रमाणे हा स्क्वेअर म्हणजे ' The most Beautiful Drawing Room in Europe ' असल्याचा प्रत्यय क्षणार्धात आला निसर्गाच्या देणगीमुळे व्हेनिस हे अजूनही ' परीकथेतील एक रम्य नगरी ' असल्याचे प्रत्येकाच्या ओठावर आले ५०० फूट लांब आणि २०० फूट रुद स्क्वेअरच्या भोवती सुदर कमानी असलेल्या राजवाड्याच्या इमारती येथील प्रत्येक कानाकोपरा कॅमेराने टिपून घ्यावा इतका सुदर सामान्यत कोणताही देखावा प्रत्यक्षात असल्यापेक्षा फोटोमध्ये अधिक मोहक दिसतो पण व्हेनिसचे फोटो तर मोहक दिसतातच पण प्रत्यक्षात ते अधिक मोहून टाकतात उगाच नसणार नेपोलियनने ही जागा आपला राजवाडा म्हणून निवडली होती येथे रोमन शिल्पशास्त्राचा कळस झाल्यासारखे वाटले गाईड सांगत असलेली माहिती प्रत्येकजण कान टवकारून ऐकत होता " व्हेनिसच्या दोन व्यापाऱ्यांनी इ स ८२८ मध्ये सेंट मार्कचे शव इजिप्तमधून आणल आणि हे चर्च बांधावयास सुरुवात केली आणि काही शतकांनी त्याच येवढ्या सुदर कलाकृतीत रूपांतर होऊन आज ते जगाच आकर्षण बनल

त्यात बाराव्या शतकात कॉन्स्टंटिनोपलहून आणलेल्या चार ताब्यांच्या घोड्यांची भर पडली नतर छतावर मोझाइकची सेंट मार्कबद्दलची सुदर दृश्य चितारण्यात आली ही पेंटिंगस् जवळजवळ४००० स्क्वेअर मीटरजागा व्यापतात " यावरून त्यांची भव्यता लक्षात यावी ड्युकलपॅलेसमधली पेंटिंग्ज पाहून डोळ्याचे पारणे फिटते जगातल कॅनव्हासवरच सर्वात मोठ पेंटिंग (२२ मीटर ×७ मीटर) पॅरॅडाईज येथे आहे येथे इतक्या आर्ट गॅलऱ्या आणि म्युझिअम्स आहेत की एकाचवेळी इतक पाहिल की माणूस चक्रावून जातो नतर आम्ही जवळच असलेली ग्लास फॅक्टरी पाहिली आमच्या डोळ्यादेखत काचेच्या गोळ्यातून सुदर लॅंपशेडस्, फ्लॉवरपॉटस, क्रॉकरी अशा नानाविध वस्तू तेथील कारागीर प्रात्यक्षिकासहित करून दाखवत होते त्याच्या हातातील कला पाहून बाहेर पाहिलेल वास्तुशिल्प बनवण्यास यांना काहीच कठीण नाही याची खात्री पटली

येथील प्रत्येक दुकान म्हणजे प्रदर्शनातल एक एक सुदर दालनच वाटाव

इतक्या सुंदर वस्तूंनी भरलेलं होतं. सुंदर सुंदर टीसेटस् खरेदी करण्यात प्रत्येकाची चढाओढ लागली होती. कोणता टीसेट अधिक सुंदर यावर एकमत न झाल्याने आमची खरेदी राहून गेली. सेंट मार्क स्क्वेअरमधून पाय काढणं जड जात होतं. जेवणाची वेळ झाली होती. इटालिन पिझ्झा आणि स्पागेटी याच्याशी दोन हात करावयाचे होते.

अॅनाने 'टच मी' म्हणून हाकाटी केली आणि इतस्ततः विखुरलेली १५ देशाची पन्नास मंडळी अॅनाच्या दिशेला वळली आणि आम्ही कॅफे इटालियानात आसनस्थ झालो. सर्कशीत कपबशांची कसरत करणाऱ्या सफाईने वेटरनी दाटी-वाटीने मांडलेल्या टेबलांमधून स्पागेटीने भरलेल्या प्लेटस् आणून ठेवल्या आणि आम्हाला एक प्रकारचे आव्हान दिले. एकवेळ ही कसरत सोपी असेल पण काट्यांनी स्पागेटीचे धागे उचलणं आणि ते तोंडापर्यंत जुळवणं हे आम्हा दोघांना काय पण आमच्यातील कित्येकांना अवघड जात होतं. आतापर्यंत टेबलावरच्या बऱ्याच आयुधाचा उपयोग मी शेजाऱ्याकडे पाहून करत आलो होतो पण ही कसरत शेजाऱ्याकडे दोन महिने राहून देखील जमेल की नाही याची खात्री वाटत नव्हती. शेवटी काट्याला चमच्याचा आधार देत वेळ निभावून नेली.

आता व्हेनिसहून मुक्काम हलवायचा होता. व्हेनिस सोडताना पुन पुन्हा सर्वजण मागे वळून पाहत होते. कदाचित् पुन्हा पहावयास मिळेल की नाही याची कोणाला खात्री नव्हती. गाईड विषण्ण मनाने सांगत होता " आमचं व्हेनिस बुडतायं हो ! " ज्या पाण्याने व्हेनिसला स्वप्न नगरीचे रूप दिले तेच पाणी तिला केव्हा तरी गिळणार आहे. दरवर्षी म्हणे अर्धा इंचाने व्हेनिस पाण्याखाली जाते. गेल्या अनेक वर्षांत वाढलेल्या पाण्याच्या पातळीने कित्येक इमारतींचे तळमजले केव्हाच पाण्याखाली गायब झाले आहेत. या बुडणाऱ्या जहाजाला कोणी वाचवू शकत नाही म्हणून येथे राहणारे कित्येक लोक आता दुसरीकडे आसरा शोधत आहेत. व्हेनिसमध्ये शिरताना मन जेवढं उल्हसित होतं तितकच किंवा त्याहून अधिक ते परत फिरताना विषण्ण होतं.

व्हेनिसहून बस निघाली ती थेट फ्लोरेन्सच्या वाटेला लागली आणि गाईडने मायकेल अँजलो ह्या, त्यांना जीव की प्राण असलेल्या कलाकाराचे गोडवे गायला सुरुवात केली. इंग्लिश माणसाला जसा शेक्सपीअर, फ्रेंचाना जसा नेपोलिअन तसा इटालियन लोकांना मायकेल अँजलो. कोठेही सुरेख पुतळा, एखादे नक्षीदार कारंजे किंवा एखादा दीपस्तंभ दिसला की मायकेल अँजलोच्या नावाचा उल्लेख आलाच. जसे महाराष्ट्रात कोणत्याही पराक्रमाची तुलना शिवाजीच्या पराक्रमाशी होते तसं कोणत्याही सुंदर कलाकृतीत यांना मायकेल अँजलो दिसतो. फ्लॉरेन्स म्हणजे या मायकेल अँजलोची पंढरी. सगळीकडे पुतळेच पुतळे पण या पुतळ्यांची निगा

म्हणावी तेवढी राखली जात नाही गणपतीच्या कारखान्यात मूर्ती जशा इतस्तत अस्ताव्यस्त पडलेल्या असतात, त्याच्यावरची धूळ झाडायला कोणाला सवड नसते तशी अवस्था येथील पुतळ्यांची ते इतके सुंदर आहेत पण इतक्या संख्येनी आहेत की माणसापेक्षा पक्ष्यानीच त्यांची जवळीक अधिक साधली आहे त्यांचे रंगरूप पार बदलून टाकले आहे

येथून पुढचा मुक्काम होता रोम त्यामुळे सर्वांचे डोळे रोमकडे लागले होते. रोमन साम्राज्याची कर्मभूमी रोम हे सर्वांनाच एक मोठे आकर्षण होते त्यांत हे पोपचे वसतिस्थान त्यामुळे अनेकांच्या धार्मिक भावना निगडित होत्या सकाळी रोमचा फेरफटका करावयास निघालो बस प्रथम कलोझियम या गुलामांनी बांधलेल्या प्रचंड स्टेडियमशी थांबली पहिल्या शतकाच्या आसपास हिब्रू गुलामांनी बांधलेल हे स्टेडिअम म्हणजे रोमन सरदारांची करमणूक करण्याच जिवंत युद्धक्षेत्रच म्हटल तरी चालेल येथे व्यावसायिक योद्धे प्रत्यक्ष मृत्यूशी झुंज देऊन प्रेक्षकांची वाहवा मिळवत असत त्यासाठी जंगली जनावरानाही त्यांच्यावर सोडले जात असे व त्यांच्याशी सामना करावा लागत असे

म्हणे एकदा एका शंभर दिवस चालणाऱ्या उत्सवामध्ये ९००० जंगली जनावरे व कित्येक योद्धे मारले गेले त्यानंतर या स्टेडिअममध्ये पाणी सोडून नाविक युद्ध होत असे यावरून या स्टेडिअमची भव्यता लक्षात यावी पुढे पाचव्या शतकात एका साधूने ही हत्या सहन न होऊन स्वत ला या योद्ध्यांमध्ये झोकून दिले व हे जीवघेणे खेळ थांबवण्याची विनंती [illegible] ते न पटल्याने त्याच्यावर दगडांचा वर्षाव झाला व त्यात तो साधू मारला गेला, पण तेव्हापासून ही युद्धे मात्र थांबली रोमन योद्धा हा अगोदरच आपल्या नजरे-समोर एक धिप्पाड आणि शूर योद्धा म्हणून उभा राहतो आणि हे स्टेडिअम पाहिल्या-वर तो अधिकच राक्षसी स्वरूप धारण केल्यासारखा वाटतो या अंडाकृती स्टेडि-अमची लांबी ६००फूट व रुंदी ५०० फूट असून त्याला बाहेरच्या बाजूने सुस्थितीत असताना ८० कमानी होत्या

पलीकडेच रोमन फोरम ही रोमन साम्राज्याची साक्ष पटवून देणारी भग्ना-वस्थेतली वास्तू विस्तीर्ण पसरली आहे जवळच आर्च ऑफ टायटस ही जेरुसलेमवर विजय मिळवल्याची साक्ष म्हणून उभी आहे व्हिक्टर इमॅन्युएलच स्मारक हा वास्तुशिल्पाचा एक सुरेख नमुना पाहताना डोळ्याचे पारणे फिटते पलीकडेच एकोणीस शतकापूर्वी बांधलेल्या ट्राजन फोरम त्यावेळच्या स्थापत्यशास्त्रातील प्रगतीची साक्ष देतो

रोममध्ये जवळजवळ ४०० चर्चेस आहेत आम्ही त्यातली सेंट पॉल, सेंट मेरी, सेंट लॉरेन्स वगैरे प्रमुख चर्चेस पाहून घेतली प्रत्येक चर्चमधल वास्तुशिल्प

अणि नक्षीकाम मोहून टाकणार होत शिवाय ठिकठिकाणी चौकात उभी असलेली सुंदर कारंजी तर रोमच आगळंच आकर्षण झाली आहेत फौंटन ऑफ ट्रीरोन, फौन्टन ऑफ नायडस्, फौंटन ऑफ नाव्हीसेला, फौंटन ऑफ टॉरटॉइझ, फौंटन ऑफ रिव्हर्स, फौंटन ऑफ मोझेस् अशी एकापेक्षा एक वरचढ नाव कुठल पाहू आणि कुठल नको हे ठरवण अवघड जात

रोम पाहून घेतल्यावर सर्वांच लक्ष आता व्हॅटीकॅन सिटीकडे लागल होत गेली सहा शतके जिथे पोपच वास्तव्य आहे ते व्हॅटीकान कस आहे याविषयी सर्वांच्या मनात उत्कंठा होती जगातील सर्वात मोठी संस्कृती अस जिच वर्णन करता येईल तिच केंद्र असलेल हे व्हॅटीकन सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय बनल होत.

प्रथम आम्ही सेंट पीटर्स स्क्वेअर, जेथून पोप दर्शन देतो, तेथे गेलो सेंट पीटर्स हे जगातल सर्वांत मोठ चर्च हे बांधायला १७६ वर्षं लागली याचे मुख्य डोम मायकेल अँजलो या इटलीच्या प्रख्यात शिल्पकाराच्या हातच ते एवढ प्रचंड आहे की, त्याच्या चंदेरी निळसर रंगाने वाटाव की सबंध विश्वच या डोमच्या रूपान खाली आल असाव नकळत आपले हात जोडले जातात आत गेल्यावर या चर्चच्या मोठेपणाची ओळख करून देताना इंग्लंडच सेंट पॉल किती मोठ हे खुणेनी येथे दाखवल जात त्यानंतर फ्रान्सच नोर्टे डामे कॅथेड्रल किती मोठ आहे हे अजमावल जात या चर्चची लांबीरुंदी पाहून खरोखरच बाकीची चर्चेस लहान वाटू लागतात इस्टरच्या दिवशी पोप दर्शन देतो तेव्हा ख्रिस्ती धर्माचे असंख्य लोक येथे नतमस्तक होतात या चर्चमधली शिल्पकला आणि नक्षीकाम पाहिलं की डोळे [illegible] शिल्पकाराना केलेले विविध पुतळे पाहताना पाय जागचा हलत नाही त्यातल्या त्यात पीटा हा मायकेल अँजलोने बनवलेला व्हर्जिनने येसूख्रिस्ताला मांडीवर घेतल्याचा पुतळा लक्ष वेधून घेतो

व्हॅटिकन पॅलेसेसमधून जाताना तर डोळे दिपून जातात अकरा हजार विविध दालनांतून ठेवलेले पुतळे, पेंटिंगज् पाहताना मन हरपत खरोखरी एकदोन दिवसात पाहण्यासारखी ही शहर नाहीत याची खात्री पटते

रोमच्या मुक्कामात टिव्होली फौंटन्स पाहून घेतली ती रोमपासून तीस चाळीस किलोमीटरवर आहेत ही प्रचंड कारंजी पंपाशिवाय उडतात अनेक वर्षांपासून ही कारंजी अशीच अहोरात्र उडत आहेत एका उंच ठिकाणाहून या ठिकाणी पाणी आणले आहे आणि पाण्याच्या नैसर्गिक दाबावर ही कारंजी जवळजवळ शंभर फूट उंच उडतात आणि त्यातले पाणी धबधब्यासारखे खाली वाहत जाते दिव्यांच्या रोषणाईने ती अधिकच खुलून दिसतात

रोमहून जिनेव्हामार्गे आम्ही पॅरीसला जावयास निघालो वाटेत पिसाचा झुलता मनोरा पाहिला अक्षरश लाबून हा मनोरा इतका कललेला वाटतो की तोल जाऊन पडेल की काय अशी भीती वाटते

इटलीतून फ्रान्समध्ये येताना पुन्हा दीडशेच्यावर छोटया छोटया टनेलशी लपडाव खेळत आमची बस पॅरीसच्या कुशीत शिरली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रं. क्र. ..........
विभाग शाखा (स्थळ प्रत)

प्रकरण दहावे

# शब्दांच्या पलीकडले

पॅरिसच्या वाटेवर आम्ही नीस या फ्रान्समधल्या हॉलिडे रिसोर्टवर थांबलो खूप दिवसानी एक नयनरम्य समुद्रकिनारा पहावयाचा योग आला मुंबई सोडल्यापासून समुद्राच हे विलोभनीय रूप दृष्टीआड झाल होत या बीचला मरीन ड्राइव्हसारखा सुंदर कठडा आहे आणि बीचवर बसण्यासाठी आरामशीर केनच्या खुर्च्या आहेत बीचवर केलेली ही सुरेख सोय पाहून आम्ही आमचे पाय मोकळे केले व आरामात खुर्च्यांवर बसलो इतक्यात एक वयस्कर बाई आमच्याकडे आली आणि तिने २ फ्रॅंकचे कूपन फाडून दिले आम्हाला आश्चर्य वाटले हे दोन फ्रॅंक कशाबद्दल? तिने मोडक्या तोडक्या इंग्रजीत खुलासा केला की हे या खुर्चीत बसण्याबद्दल पहिल्या सलामीतच पाच रुपयाचा फटका बसून पॅरिसची हवा किती गरम असेल याची चुणुक बसली फ्रान्समध्ये पाणी पिण्यापासून ते पाणी सोडण्यालासुद्धा जिथे तिथे पैसे मोजावे लागतात त्यामुळे दोन्ही क्रिया आम्ही बेतानेच करायचो येथले बीच म्हणजे अति उत्साही आणि हौशी फ्रेंचानी फुलून गेलेले कोणी सनबाथ घेताय तर कोणी सर्फ रायडिंग करण्यात दंग आहे सभोवतालचा परिसर थोडासा आपल्या ओळखीच्या मरीन ड्राइव्हसारखा वाटला बीच खूप रुंद आणि अतिशय स्वच्छ वाळू बारीक पुळणीची नसून गोल गोल गोट्यांची त्यामुळे ती आम्हाला नवीन आणि सुंदर वाटली

नीसला एक दिवसाचा मुक्काम होता पण तेवढ्यात फ्रेंच वैभवाची कल्पना देऊन गेला रस्ते रुंद, रेखीव आणि स्वच्छ. फ्रान्सच्या रस्त्यांची शोभा खरी वाढते ती तेथे असलेल्या आकर्षक दिव्यांमुळे दीपमालेसारखे हे दिवे शहराची शोभा

गळ्यातल्या ताईताप्रमाणे वाढवतात

दुसऱ्या दिवशी मुक्काम होता लिऑनला या दुसऱ्या फ्रेंच शहरीसुद्धा रस्त्यांची शोभा तशीच हे दिवे आमच पॅरिसच आकर्षण अधिकच वाढवत होते लिऑनहून पॅरिसला येताना वाटेत एक वाईन फॅक्टरी पाहण्याचा कार्यक्रम होता ही सबंध फॅक्टरी एका खेडेगावाच्या खाली असलेल्या खूप मोठ्या तळघरात होती वाईनने भरलेल्या हजारो लाखो बाटल्या वर्षानुवर्षे या तळघरात ठेवल्या होत्या या दहा वर्षांपूर्वीच्या, या वीस वर्षांपूर्वीच्या असे निरनिराळे विभाग पाडले होते ही प्रचंड फॅक्टरी या खेडेगावच्या खाली असेल अशी वरून कल्पनाही येत नव्हती शेवटी वाईनपानाचा कार्यक्रम झाला फुकट मिळाली म्हणून प्रत्येकाने यथेच्छ झोकून घेतली आणि पॅरिसच्या पढरीला आम्ही सगळे वारकरी ब्रह्मानंदी टाळी लागून पोचलो.

पॅरिसला आमची बर्थिअर लाटूर या त्रितारांकित हॉटेलात सोय करण्यात आली आमच्या सातव्या मजल्यावरच्या खोलीतून पॅरिसचे दृश्य विलोभनीय दिसत होते जगातील एक सुंदर शहर म्हणून पॅरिस पाहण्याची खूप उत्कंठा होती पण आजची सध्याकाळ विश्रांतीसाठी होती जवळजवळ ३००० किलोमीटर प्रवास झाला होता आणि नाही म्हटले तरी थोडासा शीण जाणवत होता

सकाळी सर्वजण लगबगीने उठून ब्रेकफास्ट उरकून तयार झाले आणि ॲनाची हाकाटी ऐकू यायच्या आतच बसमध्ये जाऊन बसले प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आज वेगळा आनद होता उगाचच सर्वांनी जरा फॅशनेबल कपडे घातले आहेत अस मला वाटत होत

बस सुरू झाली गाईडने ॲनाकडून माईकचा ताबा घेतला बस हॉटेलमधून बाहेर पडून पॅरिसच्या विस्तीर्ण रस्त्यावरून धावू लागली शहर गजबजलेलं होत रस्त्यावर रेनॉल्ट गाड्या फियाटसारख्या लाईन लावून धावत होत्या वाटेत एखादा सुरेख फ्लायओव्हर येई तर मधूनच आयफेल टॉवरचा मनोरा डोकावे गाईड सांगू लागला, “ती लांबवर दिसते ती पॅरिसची युनिव्हर्सिटी तिची तेराव्या शतकात स्थापना झाली पधराव्या शतकात पहिली प्रिंटिंग प्रेस घातली गेली सतराव्या शतकात ऑब्झर्वेटरी तर अठराव्या शतकात फायरब्रिगेडची स्थापना ” या शहराचा इतिहास इतका जुना आहे हे ऐकून या शहराविषयी अधिकच आस्था वाटू लागली पण पहिली रेल्वे लाईन १८३७ साली झाली हे ऐकून जरा बरे वाटले म्हणजे मुबईसुद्धा फार मागे नाही असा सुखद विचार मनात डोकावला तो सांगू लागला, “ कॉलऱ्याच्या साथीला १८३२ मध्ये १९००० लोक बळी पडले पण खरी पॅरिसची वाढ झाली १८५२ ते ७० मध्ये आता पॅरीसची वस्ती १०० लाखाच्या वर आहे आणि जवळ

जवळ फ्रान्सच्या एकूण लोकसंख्येच्या २० टक्के लोक पॅरिसमध्ये राहतात पॅरिसच्या लोकांना वर्षाला सहा लाख टन मटन लागते तर पाच लाख टन ब्रेड लागतो पॅरिसमधला माणूस रोज सरासरी एक ग्लास पाणी (मिनरल वॉटर) पितो तर खरी तहान आठ ग्लास वाईन पिऊन भागवतो " गाईडच्या अंगात संचारल्या-सारखा तो माहिती ओकत होता पण आमची नजर लागली होती ती दूरवर दिसणाऱ्या एका सुंदर राजवाड्याकडे आणि थोड्याच वेळात आम्ही या राज-वाड्यापाशी थांबलो

सायने नदीच्या काठी उभा असलेला हा 'The Couvre Palace' जगातील सर्वांत मोठा राजवाडा असल्याचे त्याने सांगितले. फिलीप ऑगस्टीने तेराव्या शतकात बांधावयास सुरुवात केलेला हा राजवाडा पाचवा चार्लस्, पहिला फ्रँकोईस, तेरावा लुईस वगैरे राजांनी वाढवला आणि एकोणीसाव्या शतकात नेपोलियनने त्याच्यावर अखेरचा हात फिरवला आणि त्यास एवढी भव्यता प्राप्त करून दिली. आता या राजवाड्याचे सुंदर म्युझियममध्ये रूपांतर करण्यात आले आहे या राज-वाड्याची शोभा कॅरीडॉरमध्ये रांगेने लावलेल्या दिव्यांनी अधिकच वाढली आहे या म्युझियममध्ये २२५ आर्ट गॅलऱ्या असून सर्वांत मोठ्या गॅलरीची लांबी १३०० फूट असून ही जगातली सर्वांत मोठी आर्ट गॅलरी म्हणून ओळखली जाते ही म्युझियम नीट पहावयाची म्हणजे काही दिवस हवेत आम्ही ती काही तासांतच पाहून घेतली मोनालिसाचे पेंटिंग, राणी कारोमाचा पुतळा, एकशेसदतीस कॅरटचा रीजंट डायमंड, नेपोलियनचा मुगुट अशा हजारो जगप्रसिद्ध वस्तू येथे ओळीने पाहताना वेळ अपुरा पडत होता

पलीकडेच 'ट्युलरीज गार्डन' ही प्रशस्त बाग आहे नेपोलियनच्या मुलाची ही खेळण्याची जागा आता या विस्तीर्ण गार्डनने व्यापली आहे जरा पुढे जावे तो भव्य कॉनकॉर्ड स्क्वेअरमध्ये आपण येतो या स्क्वेअरने एकवीस एकर जागा व्यापली आहे याच स्क्वेअरने फ्रेंचाच्या सुखदुःखाचे अनेक प्रसंग पाहिले आहेत १७७० साली डाउफिन राजाच्या लग्नासमारंभानिमित्त मोठी रोषणाई झाली आणि ती पाहण्यासाठी एवढी अलोट गर्दी लोटली की त्यात एकशे तेहतीस लोक चिरडून मेले १७९३ मध्ये या स्क्वेअरने फ्रेंच राज्यक्रांती पाहिली त्यावेळी लुइस राजाचे मुंडके उडवण्यासाठी एक अजस्त्र सुरी (Guillotine) या भव्य स्क्वेअरमध्ये एका उंच चौथऱ्यावर उभारण्यात आली आणि सर्व लोकांसमोर लुईस राजाने चौथऱ्या-वर उभे राहून आपले अपराध कबूल केले आणि फ्रेंचाच्या समाधानासाठी आपले मुंडके या सुरीखाली ठेवले आणि त्याच्या पाठोपाठ जवळजवळ १३०० निर-निराळ्या सरदारांची, देशद्रोह्यांची डोकी पुढील दोन वर्षांत लोकांसमोर उडवण्यात आली जड अंतःकरणाने आम्ही कॉनकॉर्ड स्क्वेअर सोडला

बस आता The champs–Elysees' या डोळे दिपवून टाकणाऱ्या पॅरिसच्या अतिभव्य मुख्य रस्त्यावरून (Through fare) जाऊ लागली दोन्ही बाजूला प्रचंड फुटपाथ, त्याच्या बाजूला सुरेख झाडाचा हिरवा पट्टा, ओळीने सुरेख दिवे, कारजी असलेल्या या तीन साडेतीनशे फूट रुंदीच्या रस्त्यावरून जाताना पॅरिसच्या भव्यतेची खरी कल्पना येते हा अव्हेन्यू १७०० ते १८०० मध्ये तयार केला गेला हे ऐकून तर मन थक्कच होते त्याच्या मनाच्या कल्पनाशक्तीची उंची किती मोठी आहे हे या रस्त्यावरून एकदा फेरफटका मारला की प्रत्ययास येते

पॅरिसचे वैशिष्ट्य म्हणजे ते इतके जुने असूनसुद्धा इतके भव्य आणि रेखीव आहे की गेल्या दोनशे वर्षांपासून ते पुढील दोनशे वर्षांपर्यंतसुद्धा त्याची भव्यता इतर शहराच्या मानाने कमी वाटू नये शिवाय कोणत्याही मोठ्या रस्त्यावर उभे राहिले की रस्त्याच्या एका टोकाला दूरवर एखादी सुरेख वास्तू रस्ता संपेपर्यन्त मन वेधून घेणार मग ती कधी Arc De Triomphe' ही नेपोलियनने बांधलेली विजयी कमान असेल तर कधी वैलोर पॅलेसची भव्य वास्तू असेल भारतात दिल्लीच्या इंडिया गेटच्या रस्त्याला जे महत्त्व तेच या पॅरिसच्या मुख्य रस्त्याला. दरवर्षी १४ जुलैला येथे लष्करी संचलन होते आणि लाखो फ्रेंच ते पाहण्यासाठी येथे अलोट गर्दी करतात

नेपोलियनच्या विजयी कमानीवरून सभोवती जाणार बारा रस्ते, लांबवर दिसणारा कॉन्कॉर्ड स्क्वेअर, लावरे राजवाडा असे पॅरिसचे विलोभनीय दृश्य डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी प्रत्येकजण जीव टाकत होता

बस आता सीटे या गजबजलेल्या भागातून भरधाव निघाली वाटेत नोटॅदामे नावाचे मोठे कॅथेड्रल लागले फ्रेंच शिल्पशास्त्राचा एक अत्युत्तम नमुना म्हणून याच वर्णन करतात जरा पुढे गेल की पॅरिसचा प्रसिद्ध ऑपेरा आपल लक्ष वेधून घेतो. या भव्य ऑपेराच्या स्टेजवर एकाचवेळी साडेचारशे कलाकार कार्यक्रम सादर करू शकतात हे जगातल सर्वांत मोठ थिएटर म्हणून ओळखल जात

बसने शेवटचा हॉल्ट घेतला तो आयफेल टॉवरपाशी पॅरिस म्हटल की प्रथम डोळ्यासमोर येतो तो आयफेल टॉवर १८८९ मध्ये बांधून पुरा झालेला हा टॉवर हे पॅरिसच मोठच आकर्षण बनल आहे तो जेव्हा बांधला गेला तेव्हा जगातील सर्वांत उंच वास्तू म्हणून उभा राहिला आणि अजूनही फुटांतील उंचीने नसला तरी कीर्तीतील उंचीने इतराच्याहून खूप मोठा आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही

एक हजार फूट उंचीच्या या मनोऱ्याकडे पाहिले की डोळे दिपून जातात. त्याची रचना इतकी सुबक आहे की त्या काळीसुद्धा इतक्या रेखीव पद्धतीने असा मनोरा उभ करण्याच कौशल्य त्याच्यात होत या सात हजार टन लोखंड वापरून

उभ्या केलेल्या मनोऱ्याला दर सात वर्षांनी रंग लावतात आणि त्यासाठी तीस ते चाळीस टन रंग वापरावा लागतो आम्ही लिफ्टने पहिल्या मजल्यावर गेलो १८७ फूट उंचीवरच्या या मजल्यावरून पॅरिसचे विलोभनीय दृश्य दिसले प्रत्येकाने आपल्या कॅमेऱ्याच्या चौकटीत या मनोऱ्याची उंची सामावून घेतली

रात्री आठ वाजता ' Paris By Night ' हा कार्यक्रम होता आता सर्व पॅरिस शहर झगमगत्या रंगीबेरंगी दिव्यांनी न्हाऊन निघाल होत तोच कॉनकॉर्ड स्क्वेअर आता अधिक खुलला होता लावरे पॅलेस दीपमाळेच्या सौंदर्याने फुलून गेला होता दि चॅंपस् आयलिसीस हा मुख्य रस्त्यावर असंख्य मोटारींच्या हेड-लाईटस्नी पिवळा पट्टा उठला होता तर टेललाईटस्नी तांबडा पट्टा दिसत होता दिव्याच्या झगमगाटाने प्रत्येक इमारत, कमान उजळून निघत होती. शेवटी बस ' मौलिन रग या पॅरिसच्या प्रसिद्ध नाईटक्लबजवळ थांबली काशीयात्रा गंगेत स्नान केल्याशिवाय पुरी होत नाही तस पॅरिसला जाऊन कॅबरे पाहिल्याशिवाय पॅरिस पाहिल हे सांगून कुणाला खर वाटणार नाही. पण कॅबरे या नृत्यप्रकाराला आपल्या येथे जे हिडीस स्वरूप आले आहे त्यापेक्षा कितीतरी चांगला आणि वेगळा प्रकार येथे पहावयास मिळाला

हा कॅबरे म्हणजे एक प्रकारचे बॅले नृत्य किंवा सर्कशीतली कसरत होती. त्याच्या जोडीला भव्य सेटस् आणि त्यात रंगीत रोषणाईची आतषबाजी काही वेळा तर चक्क एखादा कारंजा किंवा एखादा ओढा वाहत आहे अस दृश्य स्टेजवर दिसे नृत्य करणाऱ्या नृत्यांगनांचे ड्रेस उत्तान होते पण हावभावाना कामुकतेची झालर कमी होती लज्जतदार फ्रेंच वाईनबरोबर येथल वातावरण अधिकच धुंद होत होत रात्रीचा एक केव्हा वाजला ते कळलच नाही आम्ही पाहिलेल दोन दिवसांतल पॅरिस हे इतकं लज्जतदार होत की उद्या पॅरिसहून निघायच ही कल्पना प्रत्येकाला नकोशी वाटत होती पण ती वस्तुस्थिती होती पॅरिस सोडणं भाग होत

प्रकरण अकरावे

# माझे सहप्रवासी

टूरचा आजचा शेवटचा दिवस होता आता परतीचा प्रवास सुरू झाला होता गेले पधरा दिवस मजेत गेले होते एकमेकापासून हजारो मैल दूर राहणारी, निर-निराळ्या भाषा बोलणारी आणि वेगवेगळी कार्यक्षेत्र असलेली सर्वजण पधरा दिवसांसाठी एकत्र आली होती वयाचा फरकही बराच होता पण हे अतर केव्हाच कमी झाल होत न्यूझीलडच्या पचाहत्तरी गाठलेल्या जोडप्याची फिरकी घ्यायलाही दोन छोटया जैन मुलींना सकोच वाटत नसे या मूळ भारतीय असलेल्या, पण इंग्लंडमध्ये लहानाच्या मोठ्या झालेल्या, हिंदी भाषेचा आणि सस्कृतीचा मागमूसही न राहिलेल्या या विशीच्या आतल्या तरुणी उगाचच आम्हाला आमच्या ग्रुपमधल्या वाटू लागल्या होत्या त्याची इग्लिश बोलण्याची पद्धत आमच्या पुणेरी इग्रजीला पेलवत नव्हती तरीसुद्धा सोमवारचा उपवास किंवा मगळवारची चतुर्थी ह्या जिव्हाळ्याच्या विषयावर चर्चा व्हायची उपवासाला 'फास्ट' म्हणाव की 'फिस्ट' यावर दुमत व्हायच, पण उपवास करण किती महत्त्वाचं आहे हे दोघानाही पटलेल होत

आमच्या माग बसणार कोरियन जोडपं आणि त्यांच्या दोन तरुण मुली सिगारेटी पिऊन धूर आमच्यावर सोडण्याच काम अव्याहत करायच्या नाकात जाणारा धूर रोखता रोखता पाण्यात सुरळी मारल्यासारखं त्यांच बोलण कानावर यायच आणि हसून हसून आमची मुरकुडी वळायची माझी बायको फोटो काढताना नेहमी सिरीयस चेहरा करून उभी राहायची आणि हास म्हटल की टी व्ही छाप हसायची त्यामुळे फोटो तितकेसे चागले येत नसत पुढे पुढे मी या कोरियन

जोडप्याचं साहाय्य घेतलं. साधारण त्याचं बोलणं बायकोच्या कानावर पडेल अशा बेताने बायकोला फोटोसाठी उभं करायचो आणि हास्याच्या फवाऱ्यानं फोटो छान यायचे.

जगामध्ये शिक्षकाचा पेशा करणारी माणसं कुठेही गेली तरी चटकन ओळखता येतात. साऊथ आफ्रिकेत स्थाईक झालेला पन्नाशीचा एक इंग्लिश माणूस आमच्या ग्रुपमध्ये होता. प्रत्येक विषयावर अधिकारवाणीने बोलण्याची त्याला खोड होती. रोममध्ये सेंट पीटर्सला गेल्यावर हे चर्च मोठं की लंडनचं वेस्ट मिनिस्टर मोठं यावर गाईडशी एवढा वाद झाला की शेवटी दोन्हीही आपआपल्या परींनी मोठी म्हणून अॅनाला समजूत काढावी लागली. शिक्षकाचा पेशा करणाऱ्या माणसाला आपल्यासमोर येणारा प्रत्येकजण विद्यार्थी असल्याचा भास होत असल्याने, ज्ञान देण्याचा अधिकार फक्त आपल्यालाच पोचतो, अशा थाटात सर्वसाधारण शिक्षक कोणत्याही विषयावर बोलत असतो. या शिक्षकाच्या लेक्चरबाजीला शेवटी सर्वजण इतके कंटाळले की त्याची बायको सोडून कोणीही त्याच्या वाऱ्याला राहीना.

आमची सर्वांची करमणूक व्हायची ती जॉली कपलमुळं. पॅट आणि लॅरी कूपर हे खरं या ऑस्ट्रेलियन जोडप्याचं नाव. पण जॉली कपल म्हणावं असं प्रत्येकाला ते आग्रहाने सांगत. जोडपं होतं पन्नाशी गाठलेलं पण उत्साह होता विशीच्या तरुणांना लाजवणारा. आयफेल टॉवरच्या पायथ्याशी प्रत्येकाला आपल्या-बरोबर डान्स करायलासुद्धा कमी केलं नाही. मला या काही पाश्चात्य लोकांचं मोठं कौतुक वाटतं. ते आपल्याभोवती मोठेपणाचा किंवा आढ्यतेचा बुरखा पांघ-रीत नाहीत. या गृहस्थाला विचारलं, 'तुला मुलं किती ?' त्यानं लगेच सांगून टाकलं, "दोन. एक मुलगा आणि मुलगी. मुलगा इलेक्ट्रीशिअन आहे आणि मुलीचं सलून आहे. आम्ही जावई जवळचाच शोधला आहे. म्हणजे जायला यायला बरं." किती साधेपणा, किती बाळबोध विचार.

नाहीतर आमच्याकडची तऱ्हा पाहा. "मुलगा काय करतो ?" "जालन्याला रेल्वेत मोठ्या हुद्द्यावर आहे." "असं का ?" पुढे काही दिवसांनी मला जालन्याला जायचा प्रसंग आला. तेथे गेल्यावर चौकशी केली तर तो 'वॉटरमन' ऊर्फ पाणक्या निघाला. हे जोडपं मोठं आनंदी आणि मनमिळाऊ होतं. बायकोने साडी नेसली की कौतुकाने चौकशी करायचे. याची किंमत किती, कशी नेसता, रोज नेसता का ? नाना प्रश्न. जेवणासाठी आपल्याजवळ जागा धरून ठेवायला तर कधीच विसरत नसत. मग बायकोच्या उपवासावरनं थट्टामस्करी सुरू व्हायची ती थेट स्कॉटीश लोक इंग्लिश लोकांपेक्षा किती सरस आहेत या सिरीअस विषयाकडे वळायची. तो मूळचा स्कॉटीश होता आणि याचं स्कॉटीश प्रेम जाज्वल्य होतं.

न्यूझीलंडच्या पच्चाहत्तरी गाठलेल्या दोन म्हाताऱ्याही आमच्यामध्ये होत्या.

प्रत्येक प्रेक्षणीय ठिकाण किंवा वस्तु निरखून पारखून बघण्यात सर्वांच्या पुढ त्याच्या जोडीला त्याचे मुव्ही कॅमेरे जेव्हा पहावे तेव्हा कॅमेरा ऑन केलेला बसमध्ये जाताना असो किंवा केवल कारमधून फिरतान। असो त्यांचे कॅमेरे सदा ऑन पुढे पुढे मला कॅमेऱ्यात फिल्म आहे की नाही याचीच शका यायची बहुतेक कुठल्यातरी सिनेमा कपनीकडून यांना फिल्म फुकट मिळाली असावी माझी एक फिल्म सपली की आता फक्त दोनच शिल्लक राहिल्या म्हणून पोटात गोळा उठायचा या दोघी जणींनी एका वाईन फॅक्टरीत फुकट मिळाली म्हणून इतकी प्यायली होती की तळ-घरात असलेल्या वाईन फॅक्टरीची फिल्म फ्लॅश नसतानाच कॅमेऱ्याने टिपली होती आणि सर्वांची हसून हसून मुरकुंडी वळली होती

आमच्याबरोबर विशीच्या आसपासची एक कॅनडियन मुलगी होती तिचा आवडता छद म्हणजे जागोजाग चेक फाडण आणि जो दिसेल ती वस्तू खरेदी करण हिन जागोजाग इतक्या प्रकारच्या टोप्या आणि पर्सेस खरेदी केल्या होत्या की टूरच्या शेवटी स्वत जवळ ठेवण अशक्य झाल्यान प्रत्येकाला एक एक भेट म्हणून देण्यातही तिला फिकीर वाटली नाही वाईन फॅक्टरीची भेट अनेक कारणानी पुन्हा पुन्हा आठवत होती आम्ही यथेच्छ वाईनपान करून जवळच असलेल्या हिरवळीवर लोळत होतो आणि या कॅनडियन तरुणीला कसरतीचे प्रयोग करण्याची हुक्की आली झाले, सर्वजण आपआपल्या परीने प्रयत्न करू लागले कोणी हातावर उलटे चालण्याचा प्रयत्न केला कोणी समरसॉल्ट मारून पाहिली मला आपणही मागे नाही हे दाखवण क्रमप्राप्तच होत मी शीर्षासन करायच ठरवल वाईनचा अमल एवढा होता की सरळ उभ राहण अवघडच जात होत पण मद्यपानानतर डोक अधिक चालत अस वाटून मी डोक्यावर उभ राहून दाखवायच ठरवल. झाले, सर्व-जण या अस्सल भारतीय प्रकाराबद्दल कुतूहलाने पाहू लागले 'आमचे हे किती प्रकारची आसन करतात, ती किती उपयोगी असतात, कोणत्या रोगावर कोणते आसन' वगैरे माहिती पुरवण्याच काम बायकोन आपल्याकडे घेतल मी हात खाली टेकले पण पाय वर जाईनात दोन तीन वेळा निष्फळ प्रयत्न केला शीर्षासनाला नुसतच डोक असून चालत नाही तर ते ताळ्यावर असायला लागत हे कळायला फार वेळ लागला नाही पुढील फजिती टाळण्याच श्रेय कॅनडियन मुलीनी घेतल तिन झटकन शीर्षासन करून दाखवल व भारतीय आसन कनडात किती उपयोगी आहेत हे बायकोला ऐकवल नीट येत नसलेली कोणतीही गोष्ट करायला पुढे बायकोने मला बदी घातली

आमच्याबरोबर एक अमेरिकन जोडपही होतं त्याच नुकतच लग्न झालेलं होत हे न्यूयॉर्कला राहणार जोडपं युरोप पहायला आल होत एकदा माझा एक मित्र आधी अमेरिकेला जाऊन मग युरोप पाहावयास गेला होता आणि खूप नाराज

झाला होता त्याला युरोपातली प्रत्येक गोष्ट अगदी छोटी आणि अमेरिकेपुढे अगदी नगण्य वाटायची युरोपचे रस्ते किती लहान, मोटारी किती छोटचा, इमारती किती भिकार असं सारखं म्हणायचा जेमिनी सर्कशीनंतर डोंबाऱ्याचे खेळ पहावे तसं त्याचं झालं होतं. हीच अवस्था या अमेरिकन जोडप्याची असावी नुकतच लग्न झाल्यामुळे ती एकमेकातच जास्त मश्गूल असायची नवऱ्यानी बायकोच्या डोळ्यात सर्व जग पहावं आणि बायकोने नवऱ्याच्या कानात ते भरवावं असं काहीसं त्याचं चाललं होतं. आम्ही एकदा नीसच्या किनाऱ्यावर चार-पाच जोडपी फिरायला गेलो होतो या दोघांनी किनाऱ्याचा रस्ता सापडेपर्यंत आमची साथ धरली पण आपला कार्यभाग उरकल्यावर आम्हाला टांग मारून केव्हा गूल झाले ते कळलेच नाही त्यांनी खरा अमेरिकन हिसका आम्हाला दाखवला होता आम्ही ते वाट चुकले असतील म्हणून सबंध नीस पायाखाली घातलं आणि दमून हॉटेलवर परत येतो तर ही जोडी बारमध्ये एकमेकांच्या गळयांत गळचा घालून काही घडलेच नाही अशा थाटात पडली होती

एका फ्रेंच जोडप्याजवळ आमची खूप दोस्ती झाली होती ही दोघजण म्हणजे उदात्त विचाराचं, आचाराचं मला मूर्तिमंत प्रतीक वाटली बोलण्यामध्ये विलक्षण गोडवा प्रत्येकाला काही ना काही मदत करण्याची धडपड कोणाचे सामान घेण्या-साठी हातभार लाव तर कोणासाठी कॉफीचा कप पुढे कर सदा हसतमुख आणि उत्साही यांच्याबरोबर त्यांची १५ वर्षांची मुलगी आणि १० वर्षांचा मुलगाही होता दोन्ही मुलं अतिशय देखणी होती मला आश्चर्य वाटायचं ते जेव्हा वाईन किंवा बिअर पिताना ही मुलं ती पिण्यासाठी उत्सुक असायची पण आई-वडील दटावायचे तेव्हा माझी समजूत होती की युरोपात मुलांना वाऱ्यावर सोडलेलं असतं काय चागलं काय वाईट हे मुलांनीच ठरवायचं पण माझा अनुभव वेगळा होता मोठी रोझा अंड्रे ड्रायव्हरशी थट्टामस्करी करायची तोपर्यंत ठीक असायचं पण अंड्रे जास्त लाडात येतोय असं या चाणाक्ष आई-वडिलांच्या लक्षात यायचं तेव्हा ते रोझाला ओरडायचे आम्हा दोघांना ही मुलं आणि त्यांचे प्रेमळ आई वडील खूप आवडायचे आमच्या जवळजवळ प्रत्येक फोटोत ही मुलं कुठून तरी डोकावायचीच

सर्वांत आम्हाला हैराण केलं ते एका केरळी जोडप्यानं हे जोडपं सिंगापूर-मध्ये स्थाईक झालं होतं ही दोघंजण इतकी भोठ्यांनी आणि भरभर बोलायची की, दरवेळी इंग्रजीचा मल्याळी गुंता सोडवण्यासाठी मला सारखं बायकोच्या मदतीला धावावयास लागायचं ही केरळी अम्मा प्रत्येक वेळी जेवताना इडली, डोसा, उप्पीट असल्या, येथे दुर्मिळ पदार्थांची बायकोला आठवण करून द्यायची आणि आमची युरोप टूर बेचव व्हायची मागे असंच सरसूच्या तेलाच्या वासाने आम्हाला काश्मीर टूर अर्धवट सोडून परत यावं लागलं होतं. मला काळजी वाटायची जर एका

बाजूला इडलीची प्लेट आणि दुसऱ्या बाजूला इटलीचं टूर तिकीट ठेवलं तर ह्या बायका कोणतं अधिक पसंत करतील याचा भरवसा नाही या पहिल्याच युरोप टूरचं वाटोळं होऊ नये म्हणून मी काळजी घ्यायचो जेवताना जॉली कपल आमची जागा धरून ठेवायचं म्हणून आम्ही बरेचसे सहीसलामत परत आलो

पण आमच्यावर खरी जबाबदारी होती ती मादामची मादाम आमच्या पुढच्याच सीटवर बसायची ही मूळ चिनीबाई अनेक वर्ष सिंगापूरमध्ये स्थाईक झालेली, पण तिला चीनचा अभिमान मोठा आमच्या चिनी डिशेस् किती चांगल्या हे रोज त्या बेचव जेवणावर ऐकायला लागायचं आमचं मुख्य काम तिच्या सिंगापूर डॉलरची काळजी घेण्याचं "गोखले, टेल मी, वन सिंगापूर डॉलर इज हाऊ मेनी लिराज ?" मला आधी लिराचा हिशेब पौंडात करायला लागायचा मग त्याचे मार्क करायचे तेव्हा मी रुपयांच्या जवळ यायचो आणि सिंगापूर डॉलर आणि लिराचा संबंध जुळायचा हे सगळं नकळत व्हायचं कारण मी भारतातून प्रथम जर्मनीत, नंतर इंग्लंड आणि मग इटलीत गेल्यामुळे तोच प्रवास हिशोब करतानाही व्हायचा मादामला लिराचं सिंगापूर डॉलरशी नातं कळल्यावर ती ठरवायची की, पिसाचा मनोरा रोममध्ये स्वस्त पडेल की सिंगापूरला मादामची प्रत्येक बारीकसारीक खरेदी म्हणजे माझा एक गणिताचा पेपर असायचा मादामला आम्हीच टूरवर आणलं आहे असा बऱ्याच जणांचा समज होता मादामचे फोटो काढण्याची आणि भारतात गेल्यावर ते एनलार्ज करून सिंगापूरला पाठवायची जबाबदारीही तिनं आमच्यावर सोपवली होती

एवढ्या पन्नास-पंचावन्न लोकांमध्ये भारतातून टूरला आलेले आम्ही तिघेजणंच होतो आम्ही दोघं आणि कोर्डेरिओ नावाचा एक मुंबईकर ख्रिश्चन कोर्डेरिओपेक्षा या माणसाचं नाव कामत असतं तर बरं झालं असतं असं आम्हा दोघांना उगाचच वाटायचं याच्या तोंडावरचे सोज्वळ भाव, मृदु आवाजात बोलण्याची पद्धत, कॉन्व्हेंटचा वास न येणारं याचं इंग्लिश हे सगळं पाहिल्यावर हा तुपात तळलेला, साखरेत घोळलेला माणूस ख्रिश्चन कसा असू शकेल याची आम्हाला शंका यायची माझी बायको कुजबुज करू लागली, "अहो, त्याला जरा विचारून पहा, हा नक्कीच कामत किंवा कुलकर्णी असावा" शेवटी बायकोला अनावर झालं तिनं धाडस केलं, "काहो, तुम्हाला एक विचारू का ? पण राग नाही ना येणार ? तुमचे पूर्वज गोव्याचे ब्राह्मण होते का ?" तो चपापला त्याला काहीच अर्थबोध होईना त्याने विचारले 'कशावरून?' "नाही, आम्ही पाहतो ते ख्रिश्चन इतके बाळबोध नसतात, पण तुम्ही जरा वेगळेच दिसता" तोंडातून शब्द सुटून गेले होते ते परत घेणं आता शक्य नव्हतं बायकोचा चेहरा पडला आपण असं बोलायला नको होतं या जाणिवेने तिच्या चेहऱ्यावरच्या हसूची जागा आसूंनी घेतली होती आणि आमचा व्हेनि-

सचा प्रवास त्या अथांग सागराला आणखी भरती आणण्यास कारणीभूत झाला अजूनही कोर्डेरिआशी बोलताना माझी बायको एखाद्या अपराध्यासारखी सामोरी जाते

बसने ओस्टेंडचा किनारा केव्हा गाठला, ते कळलच नाही काही तासा-पुरतीच आता सर्वांची सोबत होती प्रत्येक देशाचा आणि देशवासियाचा रंग आणि ढंग वेगळा होता पण गेल्या पंधरा दिवसात एक मोठ कुटुंब असल्यासारखे आम्ही राहत होतो काही तासानी एकमेकापासून इतके दूर फेकले जाणार होतो की पुन्हा उभ्या आयुष्यात भेटणार नाही याची खात्री होती माझ्या मनासमोर ते जॉली कपलन जेवणाची जागा आडवण, ते वाईनफॅक्टरीसमोरच स्वच्छंदी वागण, ती मादामची खरेदी असे सर्व सुखद क्षण भराभर यायला लागले आणि ते कधी संपूच नयेत अस वाटत होत हे अस व्हायला नको होत पण हे असच होणार याची सर्वांना खात्री होती इतक्यात ॲना तेथे आली बरोबर अँड्रेही होता त्यांची ड्यूटी संपली होती येथे दस टूर संपून बोटीने इंग्लडला परत जायचे होते ॲना, अँड्रेला निरोप द्यायचा होता ॲना अक्षरश रडत होती तिने प्रत्येकाची काळजी गेले पंधरा दिवस आईच्या मायेने वाहिली होती

टूर निर्विघ्न पार पडली म्हणून तिला समाधान होत, पण या क्षणाला तिच्या चेहऱ्याला वियोगाच्या दुःखान ग्रासल होत तिचा चेहरा काळवंडला होता प्रत्येकाच ती चुंबन घेत होती, पण या चुंबनान शरीर मोहोरण्याऐवजी त्याचा दाह होत होता ॲनाने आमच्यातून अस मधेच जाऊ नये अस प्रत्येकाला वाटत होत अँड्रेलाही हा प्रसंग नवीन नसला तरी बाका होता त्याने ॲनाला धीर दिला आणि अखेरचा निरोप घेतला आम्ही बोटीच्या केबिनमध्ये शिरेपर्यंत ती दोघ जागची हलली नव्हती केवळ पंधरा दिवसांसाठी आम्ही एकत्र आलो, पण पंधरा वर्षांची जवळीक साधल्यासारखे वाटले

गार वाऱ्याच्या झुळकीबरोबर बोटीत झोपेने केव्हा गाठले ते कळलेच नाही डोव्हरला आल्यावर ट्रेनच्या फलाटावर पाय ठेवला मात्र आणि ही पंधरा दिवसाची जवळीक भुर्रर्रदिशी कुठे उडून गेली ते कळलेच नाही जो तो गाडीत जागा मिळवण्यासाठी धावत सुटला होता या गाडीची किमया विलक्षण आहे काही तासांपूर्वीचे विरहाचे अश्रू या गाडीच्या धडधडीबरोबर केव्हाच हवेत विरून गेले प्रत्येकजण प्रवासी झाला बाप-लेकाचेच काय पण साधे माणसामाणसाचे नातेसुद्धा राहिले नाही प्रत्येकाला फक्त रेल्वेच्या डब्यातल्या दीड फूट जागेची काळजी होती मग त्यासाठी कोणी खिडकीतून सामान फेकत होते तर कोणी माणसांना तुडवून जात होते मला वाटत सर्व जगातल्या या रेल्वेगाड्या जर रद्द केल्या तर कदाचित माणूस माणसाला अधिक चांगला ओळखू शकेल

आता लडनचा दोन दिवसांचा मुक्काम आणि मग मायभूमीला परतायचे. मायभूमी सोडताना तिचं महत्त्व कळत नाही, पण तिच्यापासून दूर गेल की, तिच्या विरहाचा दाह मन होरपळून काढतो होमसिक म्हणजे काय होते या प्रश्नाचं उत्तर मला एकदा बडनॉयस्टॅडला मिळाल होत अक्षरश दोन दिवस मी बेचैन होतो अगात ताप असल्यासारखे वाटायचे, पण तो तपमापकात यायचा नाही तीच अवस्था या दोन दिवसात झाली होती आता हे अठ्ठेचाळीस तास सपता सपत नव्हते तस म्हटल तर लडनमधे अजून खूप पाहण्यासारखे होते पण कशातच मन लागत नव्हत तिकीटावरची तारीख आणि वेळ पुन पुन्हा तपासून पाहण्यातच थोडस बर वाटायच जरूर नसताना सामानाची दोन-तीन वेळा सोडासोड व बाधा-बांध केली होती भारतीय बॅगेने आयत्यावेळी दगा दिला होता तिला करकचून बाधण्यासाठी लडनहून दोर विकत घेतला भारतीय बेशिस्तीला काबूत ठेवण्यासाठी तोच एक चागला तोडगा होता भारतातून इकडे येताना जेवढी उत्सुकता होती, त्यापेक्षाही अधिक तळमळ परतण्यासाठी लागली होती अस का होत होतं याला काही नेमक कारण सागता येत नव्हत

अखेर तो सोन्याचा दिवस उजाडला लडनच्या ट्यूबाच अखेरच दर्शन घेतल लडनमधील माझा मित्र मला हीथरोवर सोडावयास आला होता निरोप घेताना त्याचे डोळे पाणावले होते जस आपल्या देशातली लोक भेटण्यासाठी यथाल भारताय चातकासारखी वाट पाहतात, तेवढीच ती सोडून जाताना हिरमुसली होतात त्यांचा रडवेला चेहरा पाहून हीथरोवरून मागे फिराव अस क्षणभर वाटल, पण याच माणसाने खूप कष्ट घेऊन आमच्यासाठी ब्रिटिश एअरवेजची तिकीट मिळवली होती आणि तीसुद्धा अगदी ठरल्याप्रमाणे सात सप्टेंबरची ही तारीख आम्ही युरोप टूरवर असतानाच मुलाना कळवली होती कोणताही पाहुणा ठरलेल्या वेळेवर आला नाही तर त्याला स्टेशनवर किंवा विमानतळावर रीसीव्ह करायला येणाऱ्या माणसाचा किती हिरमोड होतो हे मी स्वत अनेक वेळा अनुभवल होत त्यामुळे ठरल्या तारखेला भारतात परत जाण्याच महत्त्व मी जाणून होतो

सरकते जिने चालू नव्हते त्या लाबच लांब वॉकवेवरून चालताना पाय दुखून आले पाचची फ्लाइट होती आणि चार वाजून गेले होते पावल झपाझप उचलण भाग होत तीस किलोचा बोजा उचलण्याच बळ सपत आल होत युरोपची टूर सर्व दृष्टीने लक्षात राहण्याजोगी झाली होती चेकइन्साठी आत आलो तर विमान एक तास उशिरा असल्याचे कळले भारत आणखी जवळ आल्यासारखे वाटले विमान सज्ज झाल पट्टे बांधले गेले पंख सुरू झाले आणि ब्रिटिश एअरवेजच ते जंबो बोईंग आकाशात झेपावण्यासाठी निघाल

कुठतरी माशी शिकली विमानात काहीतरी बिघाड असल्याच सागण्यात

आलं विमान पुन्हा माघारी फिरलं पोटात धस्स झालं बायकोला कोणीतरी भविष्य सांगितले होते की, तुमच्या नशिबात विदेश गमन नाही हृदयाच्या कुठल्या-तरी खोल कप्प्यात तिने हे भविष्य उदराला पिंजऱ्यात अडकवताल तस इतके दिवस डांबून ठेवलं होतं ते उफाळून बाहेर आलं मोकाट सुटलं आणि उड्या मारायला लागलं मी त्याची शेपूट पकडून ताब्यात ठेवण्याचा व्यर्थ प्रयत्न केला शेवटी गंगा-यमुना वाहिल्या आणि त्या पुरात ते वाहून गेलं तब्बल दोन तासानी पुन्हा पट्टे बांधले लहानपणी विहिरीत उडी मारताना आम्ही असेच ओंडका बांधून बोकला-वर उभे रहायचो, पण धीर व्हायचा नाही पुन्हा माघारी फिरायचो तसंच काहीस विमानानी आमचं किंवा कोणीतरी विमानाचं करीत होतं अखेर एकदाचं उडालं आमच्या छातीच्या धडधडीमुळे त्याची धडधड ऐकू आली नाही एअर होस्टेसनी सरबत पाजलं आणि थोडस हलकं वाटलं

आता डोळे भारताकडे लागले होते. कधी एकदा मुंबईचा विमानतळ येतोय असं झालं होतं हा नऊ तासांचा प्रवास आता खूप मोठा वाटत होता दोन तास उशिरा सुटून देखील विमानाने ठरल्या वेळेप्रमाणे सकाळी ९ वाजता मुंबई विमान-तळ गाठला आम्ही मुंबईला वेळेवर पोचलो होतो

प्रकरण बारावे

# एक हुरहूर

मी मुंबई विमानतळावर पाय ठेवला आणि आपण उगाच परदेशात गेलो असं मला वाटू लागलं हा रोग पुढे बळावत गेला आणि त्यातून बाहेर पडायला तब्बल एक वर्ष लागलं

खरंच ! परदेशात जाणं सोपं आहे पण तेथून आल्यावर येथे पहिले चार-सहा महिने काढणं फार अवघड आहे. मी मुंबई विमानतळावर उतरलो आणि तो मला इतका गचाळ वाटला की याला विमानतळ म्हणावं की घोडयाचा तबेला परदेशांत जायच्या आधी हाच विमानतळ मला खूप भव्य वाटत असे आणि दिल्ली कलकत्याहून परत येताना मुंबईचा विमानतळ किती चांगला आहे या भावनेनी मी घरी येत असे तीच अवस्था माझी टॅक्सीत बसल्यावर झाली एवढ्याशा छोट्या टॅक्सीत चार माणसं बसू कशी शकतात हे माझं मलाच समजेना हायवेवरून जाताना तर हा चक्क 'हायवे' या इंग्रजी शब्दाचा अपमान आहे अशी मनाला हुरहूर वाटायची माझं घर, माझी गाडी, सर्वकाही मला अगदी छोट, मोडकळीस आलेलं आणि टाकाऊ वाटायला लागलं मी खूप अस्वस्थ झालो पहिले काही दिवस सगळीकडे नुसती घाण, विपन्नावस्थाच दिसायची मला काही सुचेना माझी विचार करण्याची ताकद संपली होती त्यात नातेवाईक आणि मित्रमंडळी प्रश्न विचारून सतावून सोडायची आपल्या व त्यांच्या राहणीमानातला फरक कोणता ? त्यांची शिक्षणपद्धती कशी आहे ? त्यांची खेडी कशी आहेत ? त्यांची कुटुंबव्यवस्था कशी आहे ? त्यांचे खाणे, त्यांचे पिणे, चालणे, बोलणे...मी अगदी भंडावून जायचो मला नीट उत्तर देता यायचं नाही एकदा वाटायचं, चक्क सांगून टाकावं,

' याला उत्तर एकच ', चक्क एक मोठा बुलडोझर, हो, एक मोठा बुलडोझर एका बुलडोझरने इथली घाण साफ करा आणि नव्याने जगावयास सुरुवात करा मी मन अवरावयाचो मला उत्तर सापडावयाच नाही

मला सारासार विचार करायला तब्बल दोन-तीन महिने लागले कल्पना-शक्तीला चाळवायला तर तब्बल सहा महिने लागले असतील

मग मी उगाचच स्वप्न रंगवायला लागायचो आपण असं केलं तर ! दहा वर्षांसाठी आपण युद्धजन्य परिस्थिती पुकारायची जर्मनीसारखं करायचं सगळ्याचे बँक अकाऊंट जप्त करायचे मालमत्ता सरकारजमा करायची माणशी शंभर रुपये द्यायचे जेवायचा शिधा फुकट द्यायचा आणि प्रत्येकाने फक्त काम करायचे भरपूर काम असं फक्त पाच वर्ष केलं तरी देशाची भरभराट होईल अरे पण हे जमायचं कसं ? आपल्यात जर्मनीसारखी शिस्त कुठाय ? आपल्याला सिनेमाच्या रांगेत नीट उभं नाही राहता येत तर आपण ब्रेडच्या रांगेत काय उभे राहणार ? मनाचा गोंधळ उडायचा उत्तर सापडायचं नाही मग आधी शिस्त की आधी कायदा गुंतागुंत वाढायची परदेशांत जाऊन मी मनाची गुंतागुंत वाढवली याचं मला दुःख व्हायचं

माझ्यासारख्या सामान्य माणसाची ही अवस्था तर मग देशाच्या प्रगतीसाठी तळमळणाऱ्या सच्च्या देशभक्तांचं काय होत असेल? स्वातंत्र्यानंतर टिळक, सुभाष-बाबूसारखे जाज्वल्य देशभक्त असते आणि त्यांनी आजच्या दिवसांत परदेशची वारी केली असती तर त्यांचं काय झालं असतं ? माझ्या मनाचा कमकुवतपणा मला जाणवत होता पण मी विचार थांबवू शकत नव्हतो

एक विचार येई, केवळ तीस-चाळीस वर्षांपूर्वी जर्मनी, जपान भुईसपाट झाले होते भीक मागण्यासाठी ओरडण्याइतकी ताकदसुद्धा त्यांच्यात राहिली नव्हती हीच अवस्था पन्नास वर्षांपूर्वी अमेरिकेची होती लोक युद्धाला कंटाळले होते ' आता नुसते जगा आणि जगू द्या ' असं विनवून सांगत होते, त्याच लोकांनी एवढ्या थोड्या अवधीत कसं जगावं हे सगळ्या जगाला दाखवून दिलं ही किमया होती त्यांना युद्धाने शिकवलेल्या शिस्तीची संकटाने दिलेल्या सामर्थ्याची आपल्यालाही असंच काहीतरी केलं पाहिजे

समजा, प्रत्येक शहरातल्या पाच अग्रगण्य कारखान्यांनी असं ठरवलं की, पुढील पाच वर्षं संप, टाळेबंदी, मंदकाम वगैरे काही नाही पाच वर्षं प्रत्येकाने भरपूर काम करावयाचे अगदी मालकानेसुद्धा आणि जो नफा होईल त्याचा योग्य वाटा मालकाने त्याच्या कर्मचाऱ्यांना द्यायचा दोघांनी एकमेकांना विश्वासात घ्यायचं आहे नव्हे, ही पाच वर्षं म्हणजे केवळ एकमेकांचा एकमेकावर विश्वास हेच मूलतत्त्व मालकाने कर्मचारी किती कामचुकार आहे याची छाननी करायची

नाही आणि कामगाराने मालक किती नफा कमावतो याची चिंता करायची नाही माझी अशी खात्री आहे की उत्पादनवाढीतील फायदा मालक आणि मजूर दोघांनाही भरपूर होईल

आपल्याकडील बरेच तटे एकमेकांविषयी असलेल्या अविश्वासातून उद्भवतात एकदा का या अग्रगण्य कारखान्याच्या प्रगतीची प्रचीती इतरांना आली की आपोआप बाकीचे कामगार आणि मालक या योजनेचे स्वागत करतील फक्त फाटा द्यावयास हवा तो तथाकथित पुढाऱ्यांना पण पुढारी नसेल तर लोकांच्या मनातले प्रश्न समजावयाचे कसे ? अगदी सोपा उपाय सूचना पेटीद्वारे, आणि त्याच सर्वमान्य उत्तर शोधण्यासाठी गुप्त मतदान अर्थात हे मोठ्या प्रश्नासाठी छोटे प्रश्न पाच वर्षांसाठी खुटीला टांगून ठेवायचे आणि समजा या पाच वर्षांत उत्पादन वाढल आणि भरपूर नफा झाला तर तो लगेच वाटून नाही टाकायचा त्याचा बराचसा भाग मोठ्या योजनांसाठी (welfare schemes) बाजूला काढून ठेवायचा उदा कारखान्यांजवळ राहण्यासाठी घर, स्वस्त वस्तु विकत मिळण्यासाठी ग्राहक भांडार वगैरे वगैरे म्हणजे बरेच प्रश्न आपोआप सुटतील. आपल्याकडचे बरेच प्रश्न आपण स्वत:च गेल्या वीस-पचवीस वर्षांत निर्माण केले आहेत कारखाना एकीकडे तर घर दुसरीकडे घराचा आणि वाहतुकीचा दोन्ही प्रश्न आज सगळ्या शहरांची घडी विस्कटण्याच मूळ कारण आहे

कारखान्याचा प्रश्न सुटला अशा कल्पनेने मी सुखावलो जपानमध्ये म्हणे संपकाळातसुद्धा कारखाने चालूच असतात या जपान्यांनी तर कहरच केला आहे दुसऱ्या महायुद्धात पर्ल हार्बरवर चाल करून अमेरिकेच धाबं दणाणल. आणि आता युरोपच्या मार्केटात जपानी वस्तचा महापूर आणून सगळ्याच्याच नाकात दम आणला आहे जर्मनीत पहाव तिथे जपानी वस्तू कॅल्क्युलेटर्स, कॅमेरे, प्रोजेक्टर्स इतकंच काय पण जपानी मोटारगाड्यासुद्धा पण येवढ्या छोट्या देशाला हे जमत कस ? तर म्हणे संप, टाळेबंदी यांना येथे मज्जाव आहे संपकाळातसुद्धा उत्पादन चालू ठेवायच आणि उत्पादित होणारा माल सरकारजमा करायचा मालक व मजूर याचा तंटा लवादाकडे सोपवायचा आणि तट्याचा निकाल ज्याच्या विरुद्ध लागेल त्याने लवादाने सांगितल्याप्रमाणे नुकसानभरपाई करायची एकतर उत्पादनामध्ये खंड नाही आणि नुकसानभरपाई करावी लागेल या भीतीन फालतू तट्यांचा बखेडा नाही

जी गोष्ट कारखान्याची तीच खेडेगावाची प्रत्येक तालुक्यातल एक खेडेगाव पाच वर्षांसाठी निवडायच सबध तालुक्याचे फड त्या पाच वर्षांसाठी या खेडेगावाला वापरावयाचे तेथे सुसज्ज शाळा काढावयाची, वीज, पाणी, संडास वगैरे मूलभूत सोयी उपलब्ध करावयाच्या तेथे कारखाना काढावयास सर्व सवलती

'याला उत्तर एकच', चक्क एक मोठा बुलडोझर, हो, एक मोठा बुलडोझर एका बुलडोझरने इथली घाण साफ करा आणि नव्याने जगावयास सुरुवात करा मी मन अवरावयाचो मला उत्तर सापडावयाच नाही

मला सारासार विचार करायला तब्बल दोन-तीन महिने लागले कल्पना-शक्तीला चाळवायला तर तब्बल सहा महिने लागले असतील

मग मी उगाचच स्वप्न रंगवायला लागायचो आपण अस केल तर ! दहा वर्षांसाठी आपण युद्धजन्य परिस्थिती पकारायची [illegible]

[illegible] अकाऊंट जप्त करायचे मालमत्ता सरकारजमा करायची माणशी शभर रुपये द्यायचे जेवायचा शिधा फुकट द्यायचा आणि प्रत्येकाने फक्त काम करायचे भरपूर काम अस फक्त पाच वर्ष केल तरी देशाची भरभराट होईल अरे पण हे जमायच कस ? आपल्यात जर्मनीसारखी शिस्त कुठाय ? आपल्याला सिनेमाच्या रांगेत नीट उभ नाही राहता येत तर आपण ब्रेडच्या रांगेत काय उभे राहणार ? मनाचा गोंधळ उडायचा उत्तर सापडायच नाही मग आधी शिस्त की आधी कायदा गुंतागुंत वाढायची परदेशात जाऊन मी मनाची गुंतागुंत वाढवली याच मला दुःख व्हायच

माझ्यासारख्या सामान्य माणसाची ही अवस्था तर मग देशाच्या प्रगतीसाठी तळमळणाऱ्या सच्च्या देशभक्ताच काय होत असेल? स्वातंत्र्यानंतर टिळक, सुभाष-बाबूसारखे जाज्वल्य देशभक्त असते आणि त्यांनी आजच्या दिवसात परदेशची वारी केली असती तर त्याच काय झाल असतं ? माझ्या मनाचा कमकुवतपणा मला जाणवत होता पण मी विचार थांबवू शकत नव्हतो

[illegible] तीस-चाळीस वर्षांपूर्वी जर्मनी, जपान भुईसपाट झाले होते भीक मागण्यासाठी ओरडण्याइतकी ताकदसुद्धा त्यांच्यात राहिली नव्हती हीच अवस्था पन्नास वर्षांपूर्वी अमेरिकेची होती लोक युद्धाला कंटाळले होते 'आता नुसते जगा आणि जगू द्या' अस विनवून सांगत होते, त्याच लोकांनी एवढ्या थोड्या अवधीत कस जगाव हे सगळ्या जगाला दाखवून दिल ही किमया होती त्यांना युद्धाने शिकवलेल्या शिस्तीची संकटाने दिलेल्या सामर्थ्याची आपल्यालाही असच काहीतरी केल पाहिजे

समजा, प्रत्येक शहरातल्या पाच अग्रगण्य कारखान्यांनी अस ठरवल की, पुढील पाच वर्षं संप, टाळेबंदी, मंदकाम वगैरे काही नाही पाच वर्षं प्रत्येकाने भरपूर काम करावयाचे अगदी मालकानेसुद्धा आणि जो नफा होईल त्याचा योग्य वाटा मालकाने त्याच्या कर्मचाऱ्यांना द्यायचा दोघांनी एकमेकांना विश्वासात घ्यायच आहे नव्हे, ही पाच वर्षं म्हणजे केवळ एकमेकांचा एकमेकांवर विश्वास हेच मूलतत्त्व मालकाने कर्मचारी किती कामसुकार आहे याची छाननी करायची

नाही आणि कामगाराने मालक किती नफा कमावतो याची चिंता करायची नाही माझी अशी खात्री आहे की उत्पादनवाढीतील फायदा मालक आणि मजूर दोघां-नाही भरपूर होईल

आपल्याकडील बरेच तटे एकमेकाविषयी असलेल्या अविश्वासातून उद्भव-तात एकदा का या अग्रगण्य कारखान्यांच्या प्रगतीची प्रचीती इतराना आली की आपोआप बाकीचे कामगार आणि मालक या योजनेचे स्वागत करतील फक्त फाटा द्यावयास हवा तो तथाकथित पुढाऱ्यांना पण पुढारी नसेल तर लोकांच्या मनातले प्रश्न समजावयाचे कसे ? अगदी सोपा उपाय सूचना पेटीद्वारे, आणि त्याच सर्वमान्य उत्तर शोधण्यासाठी गुप्त मतदान अर्थात हे मोठ्या प्रश्नांसाठी छोटे प्रश्न पाच वर्षांसाठी खुटीला टांगून ठेवायचे आणि समजा या पाच वर्षांत उत्पादन वाढल आणि भरपूर नफा झाला तर तो लगेच वाटून नाही टाकायचा त्याचा बराचसा भाग मोठ्या योजनासाठी (welfare schemes) बाजूला काढून ठेवायचा

उदा कारखान्याजवळ राहण्यासाठी घर, स्वस्त वस्तू विकत मिळण्यासाठी ग्राहक भांडार वगैरे वगैरे म्हणजे बरेच प्रश्न आपोआप सुटतील आपल्याकडचे बरेच प्रश्न आपण स्वत च गेल्या वीस-पचवीस वर्षांत निर्माण केले आहेत कारखाना एकीकडे तर घर दुसरीकडे घराचा आणि वाहतुकीचा दोन्ही प्रश्न आज सगळ्या शहरांची घडी विस्कटण्याच मूळ कारण आहे

कारखान्याचा प्रश्न सुटला अशा कल्पनेने मी सुखावलो जपानमध्ये म्हणे संपकाळातसुद्धा कारखाने चालूच असतात या जपान्यांनी तर कहरच केला आहे दुसऱ्या महायुद्धात पर्ल हार्बरवर चाल करून अमेरिकेच धाब दणाणल आणि आता युरोपच्या मार्केटात जपानी वस्तूचा महापूर आणून सगळ्यांच्याच नाकात दम आणला आहे जर्मनीत पहाव तिथे जपानी वस्तू कॅल्क्युलेटर्स, कॅमेरे, प्रोजेक्टर्स इतकच काय पण जपानी मोटारगाड्यासुद्धा पण येवढ्या छोट्या देशाला हे जमत कस ? तर म्हणे संप, टाळेबंदी यांना येथे मज्जाव आहे संपकाळातसुद्धा उत्पादन चालू ठेवायच आणि उत्पादित होणारा माल सरकारजमा करायचा मालक व मजूर याचा तंटा लवादाकडे सोपवायचा आणि तट्याचा निकाल ज्याच्या विरुद्ध लागेल त्याने लवादाने सांगितल्याप्रमाणे नुकसानभरपाई करायची एकतर उत्पा-दनामध्ये खड नाही आणि नुकसानभरपाई करावी लागेल या भीतीन फालतू तंट्यांचा बखेडा नाही

जी गोष्ट कारखान्याची तीच खेडेगावांची प्रत्येक तालुक्यातल एक खेडेगाव पाच वर्षांसाठी निवडायच संबंध तालुक्याचे फंड त्या पाच वर्षांसाठी या खेडे-गावाला वापरावयाचे तेथे सुसज्ज शाळा काढावयाची, वीज, पाणी, संडास वगैरे मूलभूत सोयी उपलब्ध करावयाच्या तेथे कारखाना काढावयास सर्व सवलती

घ्यायच्या प्रत्येकाला या कारखान्यात काम द्यावयाचे एवढेच काय पण कारखान्यात काम करणाऱ्या प्रत्येकाला गणवेश द्यावयाचा त्याला अभिमान वाटला पाहिजे की मी काहीतरी मोठं काम करतोय म्हणून त्या खेड्याच्या सीमा निश्चित करावयाच्या आणि त्यातली वस्ती मर्यादित ठेवायची घरटी एका माणसाला काम मिळेल याची काळजी घ्यायची आणि नफ्याचा ठराविक भाग त्या खेड्याच्या उन्नतीकरताच वापरावयाचा मग या कारखान्याचेच अंग म्हणून गावातील भातशेती, जंगल यांची निगा राखण्याची जबाबदारी या कारखान्यांवर सोपवावयाची कुटुंबनियोजनाची जबाबदारीसुद्धा कारखान्याचीच गावातील सार्वजनिक रस्ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी गावकऱ्यांची जर्मनीमध्ये अजूनही खेडेगावात आपल्या घरासमोरील रस्ता प्रत्येकाने साफ करण्याचा शिरस्ता आहे सकाळी उठून पहावे तो सुंदर सुंदर तरुणी, वयोवृद्ध रहिवासी, जे इतरवेळी आलीशान गाड्यातून हिंडत असतात, ते रस्ता झाडताना दिसतात जंगलांनी कुठे वाढाव, शेतीनी कुठे थांबाव हे आखून द्यायच ग्रीनमधला केवळ एक शेतकरी येवढ्या प्रतिकूल हवामानातसुद्धा सबंध गावाला भाजी पुरवत असल्याचे मी पाहिले होते

कल्पनांची भरारी मी आवरू शकत नव्हतो सर्व प्रश्नाच उत्तर सापडल्यासारख मला वाटत होत लोकाच मला हसू येई तेथे इतकी सुबत्ता कशी ?' 'त्याच्या प्रगतीच मूळ कशात आहे ?' या सगळ्या प्रश्नांच मूळ तुमच्या-आमच्यात आहे असं ओरडून सांगावस वाटे त्याच मूळ तेथल्या शिक्षणपद्धतीत नाही की कायदेकानूत नाही आणि निवडणुक पद्धतीत तर मुळीच नाही ती राबवणाऱ्या तुमच्या-आमच्यात आहे मला वाईट वाटायच ते या सगळ्याच उत्तर माहीत असलेले आपण वेड पांघरून पेडगावला जातो आणि उत्तर शोधण्यासाठी गावभर भटकतो मला दि वि गोखल्यांच्या 'युद्धनेतृत्वातला' अमेरिकेबद्दलचा तो उतारा आठवला (पान २१४,

अर्थात सर्व गोष्टी कारखान्यावर संपवून स्वस्थ बसणारा तो मनुष्य (प्रेसिडेंट रूझवेल्ट) नव्हता तें स्वत झपाट्याने कामाला लागले डोनाल्ड नेल्सन या कल्पक तंत्रज्ञाची, युद्ध मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली संपविरोधी कायदे झाले मालक व कामगारांनी उत्पादनात अडथळे आणले तर कारखाने लष्कराने ताब्यात घेण्याची व्यवस्था झाली सामुदायिक उत्पादनाच्या नव्यानव्या युक्त्या अवलंबिण्यात आल्या कामाचे तास वाढले, पगार गोठवण्यात आले व प्रत्येकाच्या देशभक्तीला आवाहन करण्यात आले परिणामी जे उत्पादन झाले, त्याने साऱ्या जगाला चकित केले नि शत्रूला पराभूत केले १९४१ सालच्या अखेरीस अमेरिका युद्धात उतरली त्यानंतर अवघ्या एक वर्षात म्हणजे १९४२ साली, अमेरिकन शस्त्रास्त्रोत्पादनाने जर्मनी, जपान व इटली यांच्या संयुक्त उत्पादनाएवढी

मजल मारली व १९४३ साली ती त्यांच्या कितीतरी पुढे गेली. १९४५ साली युद्ध संपले त्यावेळी अमेरिकन उत्पादनाचे काही आकडे पुढीलप्रमाणे होते विमाने– २ लक्ष ९६ हजार, रणगाडे– ८७ हजार, ट्रक्स– २४ लक्ष ३४ हजार, तोफा– ३ लक्ष १५ हजार, नि व्यापारी जहाजे– २ कोटी ८० लक्ष टन. ब्रिटिशांना प्रचंड उत्पादनाचे जे तंत्र जमलेले नाही ते अमेरिकेला समजले आहे ही त्याची केवळ फुशारकी नव्हती अमेरिका युद्धात उतरण्यापूर्वी एक जहाज बांधण्यास ३० आठवडे लागत अमेरिकन तज्ज्ञांनी तो वेळ अवघ्या ७ आठवड्यांवर आणला ”

अमेरिकेच्या युद्धापूर्वीच्या परिस्थितीपेक्षा मला आपल्याकडची आजची परिस्थिती गंभीर वाटली नाकर्तेपणाचा महाभयंकर बाँब आपल्या देशावर पडला आहे असा भास मला झाला आणि सर्वांत दुःखाची गोष्ट होती ती असं काही झालंच नाही, या भ्रमात आपण वावरत आहोत हा बाँब आपल्या न कळत आपल्याला पोखरून काढत आहे आणि एक दिवस सबंध देश वाळूने पोखरून काढलेल्या घरासारखा कोसळून पडेल अशी मला भीती वाटू लागली त्यापेक्षा प्रत्येक वासा कापून काढा आणि त्याला नव्याने बसवा तरच काहीतरी निभाव लागेल असं ओरडून सांगावंस वाटलं

मला बरेच जण विचारायचे, “ का हो, आपल्या कामगारात आणि तेथील कामगारात काय फरक हो ?” मला सांगताना अभिमान वाटायचा की, “ कामातील कौशल्यात म्हणाल तर काडीचाही फरक नाही ” पण खंत वाटायची की हे कौशल्य कामात न वापरता काम कमी कसं होईल याकडे वापरलं जातं याची तेथल्या कर्मचाऱ्यात आणि आपल्या कर्मचाऱ्यांत काय फरक ? फरक इतकाच की तेथील कर्मचारी आपल्या टेबलावरचे काम चोख ठेवण्याचा प्रयत्न करतो तर आपले श्रम दुसऱ्याच्या टेबलावरच्या कामासंबंधी उठाठेवी करण्यात वाया जातात प्रत्यक्ष काम करण्यापेक्षा अमुक काम अमक्यानेच का करावयाचे, तमूक पद्धतीनेच का करावयाचे याची चिंता आम्हाला जास्त ”

निसर्गाच्या दृष्टीने पहावे तर आपल्याकडील निसर्ग किती दयाळू फार थंडी नाही की फार उन्हाळा नाही सूर्यप्रकाश भरपूर पण याचा उपयोग आळसाकडे अधिक शिवाय आपण दुर्बलतेच्या पोटी जन्माला आलेल्या शांतीचे उपासक आणि आळसापोटी जन्माला आलेल्या नासक्तीचे स्तुतीपाठक ह्या सर्वांची भर नाकर्तेपणाच्या जोपासनेतच खर्च होते

हे सगळं सुधारायचं असेल तर एकट्या सरकारला दोष देण्यात अर्थ नाही सुरवात केली पाहिजे लहान लहान घटकापासून मग ते एक खेडेगाव असो की एक कारखाना असो सारासार विचार करण्याची बुद्धी असलेला प्रत्येक माणस

ह्या कामाला हातभार लावू शकतो

ही सर्व कामे कारखान्यातर्फेच का करावयाची ? असा प्रश्न कोणालाही पडेल ते एवढ्यासाठीच की कोणतेही काम करताना शिस्त हवी आणि त्याच्यामागे प्रगतीचा आढावा घेण्याची वृत्ती हवी. ह्या दोन्ही गोष्टी कारखाना चालकांच्या नसानसांत भिनलेल्या असतात बरेच सरकारी व्यवसाय बुडीत चालतात आणि जनसेवेचे व्रत म्हणून आम्ही ते बुडित सुद्धा चालवतो अशी हाकाटी केली जाते पण ही शुद्ध फसवणूक आहे. अहो, ही असली भूतदया शेवटी भूत होऊन तुमच्या आमच्याच मानगुटीस बसते आणि करांच्या ओझ्याखाली सर्वांना वाकवते कोणताही व्यवसाय असो त्याला नफ्यातोटयाचे, उत्पादकता अनुत्पादकतेचे निकष लावावयासच हवे

जर एखाद खेडेगाव घटक म्हणून मानल तर कारखान्याचीच शिस्त त्या गावाला आली पाहिजे जस कारखान्यात एखाद्याने चोरी केली तर त्याला बडतर्फ केल जात तस या गावात चोरी करताना सापडलेल्या माणसाला त्या गावापुरते तरी हद्दपार केले पाहिजे

एकदा चागल काय आणि वाईट काम याचा जनतेसमोर आदर्श निर्माण झाला आणि वाईटामुळे सर्वसाधारण जनतेचेच नुकसान अधिक होते हे कळून चुकले की परदेशातल्या क्षुल्लक गोष्टीचे आपल्याला जे कौतुक वाटत ते वाटणार नाही उदा पेपर प्रत्येकजण पैसे टाकून स्वत च विकत घेतो किंवा बस किंवा ट्राममध्ये तिकीट चेकर नसतो

भरपूर खनिज सपत्ती, निसर्गाचा वरदहस्त, कामाचं कौशल्य हे सर्व असताना आजची आपल्या देशाची अवस्था अशी निराशजनक का हे आपणच आपल्याला घातलेल कोड आहे त्याच उत्तर आपल्याला माहीत आहे फक्त पाहिजे आहे ती सोडवण्याची जिद्द

मी खूप भरकटत चाललो होतो पण हाच माझी हुरहूर कमी करण्यावरचा एक इलाज होता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे